

# टागोरांच्या गोष्टी

अनुवाद : पद्मिनी बिनीवाले


काबुलीवाला

पुनरागमन

सुट्टी

पोस्टमास्तर

सुभा

मास्तरमहाशय

नवीन बाहुली

नयनजोडचे ठाकूर


अतिथी




ज्योत्स्ना प्रकाशन

# टागोरांच्या गोष्टी

पद्मिनी बिनीवाले



ज्योत्स्ना प्रकाशन

टागोरांच्या गोष्टी

ज्योत्स्ना प्रकाशन

प्रकाशक :
मिलिंद ल. परांजपे
ज्योत्स्ना प्रकाशन
'धवलगिरी' ४३०-३१ शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

मुंबई ऑफिस :
मोहन बिल्डिंग,
१६२ ज. शंकरशेठ मार्ग
गिरगाव, मुंबई ४०० ००४

© पद्मिनी बिनीवाले

दुसरी आवृत्ती : एप्रिल २००५

मुखपृष्ठ व आतील चित्रे :
श्री. राहुल देशपांडे

मुद्रक :
संदीप प्रिंटर्स
शनिवार पेठ
पुणे ४११०३०

ISBN : 81-7925-126-8

मूल्य चाळीस रुपये

प्रिय मिथिला, सिद्धार्थ –

तुमचं बालपण यात धरून ठेवलं आहे

– आजी

# प्रस्तावना

रवीन्द्रनाथ टागोर म्हटलं की आपल्याला आठवतो, तो त्यांचा 'गीतांजली' हा काव्यसंग्रह आणि या संग्रहाला मिळालेलं नोबेल पारितोषिक! पण रवीन्द्रनाथ केवळ कवीच होते, असं नाही. सर्वच वाङ्मयप्रकारांतून त्यांनी भरपूर लेखन केलं होतं. लघुकथा आणि शिशुगीतं या वाङ्मयप्रकारांना तर बंगाली वाङ्मयात त्यांनीच प्रारंभ केला आहे.

वयाच्या नवव्या वर्षापासून त्यांच्या साहित्यनिर्मितीला सुरुवात झाली. लहानपणापासूनच त्यांचं मन अतिशय संवेदनशील होतं. त्यांना निसर्गाची कमालीची ओढ होती. सकाळी उठले की, ते प्रथम बागेत जात. हिरव्यागार गवताच्या ओल्या वासानं त्यांचं मन प्रसन्न होई. मातीत एखाद्या झाडाचं बी पेरून रोपाची वाट पाहत बसण्याचा तर त्यांना छंदच होता. दुपारी घराच्या गच्चीवर उभं राहून आजूबाजूच्या घरांपुढच्या बागा, रस्ते, जवळच्या तळ्यावर स्नानासाठी येणारी माणसं, गल्लीबोळातून विशिष्ट प्रकारे ओरडणारे फेरीवाले या साऱ्यांचं ते बारकाईनं निरीक्षण करीत. रवीन्द्रांचं बालपण खऱ्याखुऱ्या अर्थानं रम्य होतं. त्यांचे वडील देवेन्द्रनाथ यांच्याबरोबर त्यांना खूप प्रवासही करायला मिळाला. हिमालयात हिंडताना बर्फाच्छादित हिमशिखरं आणि पर्वतराजीवरील सृष्टिसौंदर्याचा आस्वादही घेता आला; वडिलांबरोबर नौकाघरात राहायला मिळालं. गंगेकाठच्या घरी– पनिहाती या गावी– वास्तव्य असलं की, गंगेवरून येणाऱ्या-जाणाऱ्या बोटी बघत राहणं हा त्यांचा आवडता उद्योग होता. निसर्गातील घटकांशी संवाद साधण्याची लहानपणापासून त्यांना सवय लागली होती. त्याचे पडसाद त्यांच्या वाङ्मयात उमटलेले दिसतात.

त्यांच्या वडिलांनी त्यांच्याकडून साहित्याचा अभ्यास करवून घेतला होता. त्यांना ग्रह-नक्षत्रांची ओळख करून दिली होती. रवीन्द्रांचा आवाज गोड होता. मोठा भाऊ ज्योतिरिन्द्रनाथ यांच्याबरोबर बरेच वेळा त्यांची गाण्याची मैफलही जमत असे. त्यांच्या साहित्यनिर्मितीच्या मुळाशी या साऱ्या कला-विद्या होत्या.

आपल्याला जसं मोकळेपणी शिकायला मिळालं तसं ते सर्व मुलांना मिळावं, असं त्यांना वाटे. त्यांनी काढलेल्या 'शांतिनिकेतन' या आश्रमशाळेत मुलांचे वर्ग भरत ते मोकळ्यावर, झाडाखाली! शिक्षणाच्या बाबतीत 'छडी लागे छम छम' हे तत्त्व त्यांना मान्य नव्हतं. झाडं जशी सूर्यप्रकाश ग्रहण करून आपोआप वाढतात, तसं मुलांनी वाढावं ही त्यांची अपेक्षा होती.

त्यांनी मुलांसाठी विपुल प्रमाणात शिशुगीतं, कथा, नाटकं असं लेखन केलं. रवीन्द्रांच्या मनात नेहमी एक बाल रवीन्द्र लपलेला असे. म्हणूनच मुलांसाठी लिहिताना ते त्या विषयाशी अगदी समरस होऊन जात. रवीन्द्रांनी मुलांसाठी लिहिलेल्या नाटकांचे प्रयोग शांतिनिकेतनातले विद्यार्थी कितीतरी वेळा हौसेनं करत. त्यावेळी रवीन्द्रही त्यांच्यात सहभागी होत. मुलांविषयी लिहिताना मुलांच्या भावभावनांशी ते एकरूप होत. लहान मुलांच्या मनातलं दुःख, आनंद, औत्सुक्य यांपाशी ते अगदी सहज पोहोचत. थोडक्यात, रवीन्द्रनाथ फुलामुलांचे कवी आणि लेखक होते, असं म्हणायला हरकत नाही.

या पुस्तकातून कुमारांना आवडतील अशा रवीन्द्रांच्या नऊ कथांचा परिचय मी करून दिला आहे. या कथा वाचून एखाद्या वाचकाला रवीन्द्रनाथांबद्दल ओढ निर्माण झाली व त्यांचं बंगाली साहित्य वाचण्याची पुढे कधीतरी इच्छा झाली, तर माझा हेतू सफल झाला, असं मला वाटेल.

**पद्मिनी बिनीवाले**

# अनुक्रमणिका

१. काबुलीवाला ........ ७
२. पुनरागमन ........ १६
३. सुट्टी ........ २५
४. पोस्टमास्तर ........ ३२
५. सुभा ........ ३८
६. मास्तरमहाशय ........ ४४
७. नवीन बाहुली ........ ६१
८. नयनजोडचे ठाकूर ........ ६५
९. अतिथी ........ ७३

# १. काबुलीवाला

आमची पाच वर्षांची छोटी मिनी सारखी बडबड करत असे. तिला क्षणभरही गप्प बसवत नसे. बोलता यायला लागल्यापासून जागी असेल तेव्हा तिची सारखी बडबड चालायची. तिची आई तिला बऱ्याचदा दटावून गप्प बसवत असे, पण मला मात्र ते कधीच शक्य झालं नाही. मिनी गप्प बसली की, मलाच चैन पडत नसे. मला ते अस्वाभाविक वाटे. त्यामुळे माझ्याशी तिच्या गप्पागोष्टी मोठ्या उत्साहानं चालत.

एके दिवशी सकाळी मी लिहीत बसलो होतो. माझ्या कादंबरीच्या सतराव्या प्रकरणाला मी सुरुवात करतो न करतो, तोच मिनी आली आणि म्हणाली, ''बाबा, रामदयाळ दारवान कावळ्याला 'कौवा' म्हणतो. त्याला काही कळतच नाही! हो ना?''

एखाद्या गोष्टीला वेगवेगळ्या भाषांत वेगवेगळी नावं असतात, हे मी तिला समजावून सांगणार होतो, तेवढ्यात तिचं पुन्हा चालू झालं – ''अहो बाबा! भोला म्हणतो, हत्ती आकाशात सोंड उंच करून पाणी फेकतो ना, म्हणून पाऊस पडतो. अय्या! बाबा, काहीतरीच ना! भोला किती खोटं बोलतो!'' यावर मी काही बोलण्यापूर्वीच तिनं लगेच दुसरा प्रश्न विचारला, ''बाबा, आई तुमची कोण लागते हो?''

मला या प्रश्नाचं मोठं हसू आलं. तिची गंमत करण्यासाठी मी म्हणणार होतो – मेहुणी! पण असं काही न बोलता मी म्हटलं, ''मिनी, तू भोलाबरोबर खेळ जा. मी आता कामात आहे.''



ती माझ्या पायाशी टेबलाच्या बाजूला बसून, दोन्ही पाय आणि हात हलवत अगडम् बगडम् करत खेळू लागली.

माझ्या कादंबरीचा नायक प्रतापसिंह, त्याचवेळी नायिका कांचनमालेला घेऊन अंधाऱ्या रात्री किल्ल्याच्या उंच खिडकीतून खालच्या नदीत उडी घेत होता...

आमचं घर रस्त्याला लागून होतं. अगडम् बगडम् खेळत बसलेली मिनी अचानक खिडकीकडे धावली आणि मोठमोठ्याने हाका मारू लागली, ''काबुलीवालाऽ! एऽ काबुलीवाला ऽ !''

ढगळ मळके कपडे, डोक्यावर पगडी, काखेत झोळी आणि हातात द्राक्षांच्या दोन-चार पेट्या घेतलेला एक धिप्पाड पठाण मंद मंद पावलं टाकत रस्त्यावरून चालला होता. त्याला पाहून मिनी इतकी आनंदित झाली होती की, तिनं त्याला जोरजोरात हाका मारण्याचा सपाटाच लावला होता. मला कळून चुकलं, की काखेत झोळी घेतलेलं हे संकट आता माझ्यापुढे उपस्थित होणार आणि माझ्या सतराव्या प्रकरणाचं गाडं इथेच थांबणार!

मिनीच्या हाका ऐकून काबुलीवाला मागे वळून हसला आणि आमच्या घराच्या दिशेनं यायला निघाला. मात्र त्याला खरंच येताना पाहून मिनी श्वास रोखून जी घरात पळाली, ती आत कुठं दडून बसली कोण जाणे! बहुधा तिला भीती वाटत असावी की, काबुलीवाल्याच्या झोळीत तिच्यासारखी दोन-चार पोरं कोंबलेली असतील!

काबुलीवाला आला आणि हसत हसत मला सलाम करून उभा राहिला. इथे माझ्या कादंबरीतील प्रतापसिंह आणि कांचनमाला भलतेच संकटात सापडलेले होते; पण मिनीनं हाका मारून त्याला बोलावलेलं असल्यामुळे त्याच्याकडून काहीच न घेणं बरं दिसलं नसतं.

मी थोडी खरेदी केली. मग अब्दुर रहमान, इंग्लंड-रशिया संबंध, भारताच्या सीमेचं रक्षण अशा काही विषयांवर आमच्या थोड्या गप्पा झाल्या.

निघताना त्यानं विचारलं, ''बाबू, तुमची छोटी बच्ची कुठं दिसत नाही? कुठं गेली ती?''

मिनीच्या मनातली काबुलीवाल्याची भीती घालविण्यासाठी मी तिला आतून बोलावून घेतलं. ती येऊन मला बिलगली आणि एकदा काबुलीवाल्याकडे आणि एकदा त्याच्या झोळीकडे भीत भीत पाहू लागली. तो झोळीतलं खिसमिस, अक्रोड काढून तिला देण्याचा प्रयत्न करू लागला, पण ती काही केल्या ते घेईना. उलट अधिकच संशयानं मला बिलगली. काबुलीवाल्याशी आमची पहिली ओळख ही अशी झाली.

एके दिवशी, सकाळच्या वेळी काही कामासाठी मी घराबाहेर पडलो. बघितलं तर घरासमोरच्या बाकावर मिनी बसली होती. तोंडानं तिची काहीतरी बडबड चालली होती आणि तिच्या पायाशी बसून काबुलीवाला हसत हसत सारं ऐकत होता. अधूनमधून तोही आपल्या तोडक्यामोडक्या बंगालीत काहीतरी बोलत होता. मिनीच्या पाच वर्षांच्या आयुष्यात तिचं सारं बोलणं शांतपणे ऐकून

घेणारा, तिच्या वडिलांखेरीज एवढा सहनशील श्रोता तिला कधीच मिळाला नव्हता! जवळ जाऊन पाहिलं तर तिचा चिमुकला पदर बदाम, खिसमिस यांनी भरलेला! मी काबुलीवाल्याला म्हटलं, ''हे सगळं कशाला दिलंस तिला? असं काही तिला देत जाऊ नकोस.'' मी खिशातून अधेली काढून त्याला दिली. त्यानं निःसंकोचपणे ती घेतली आणि झोळीत टाकली.

घरी येऊन पाहातो तो त्या अधेलीवरून घरात रण माजलं होतं. मिनीची आई एक चकचकीत गोल नाणं मिनीपुढे धरून मिनीला दरडावून विचारत होती, ''कुठून आणलीस तू ही अधेली?''

''मला काबुलीवाल्यानं दिली,'' मिनी सांगत होती.

''तू काबुलीवाल्याकडे गेलीसच का? आणि ही अधेली का घेतलीस?'' मिनीची आई कडाडली.

''मी खरंच त्याच्याकडे नाही मागितली,'' मिनी रडत रडत सांगू लागली, ''त्यानं आपण होऊन दिली.''

मी पुढे झालो आणि मिनीला त्या संकटातून वाचविण्यासाठी बाहेर घेऊन गेलो.

मला नंतर कळलं, की मिनीची आणि काबुलीवाल्याची ही काही दुसरीच भेट नव्हती. गेले काही दिवस तो रोज येत होता आणि बदाम-पिस्त्यांच्या भेटी देऊन त्यानं तिच्याशी चांगली दोस्ती केली होती. त्या दोघांच्यात काही गमतीच्या गोष्टी जणू ठरून गेल्या होत्या. रहिमतला पाहिल्याबरोबर मिनी हसत हसत विचारी, 'काबुलीवाला! ओऽ काबुलीवाला! तुझ्या झोळीत काय आहे?'

एकेका शब्दावर अनावश्यक अनुस्वार देत तोही हसत सांगे, 'हाँ ऽ ऽ थीं!'


अर्थात, झोळीत हत्ती आहे असं सांगण्यातच त्यांची सारी गंमत लपली होती. यात फार काही विशेष होतं असं नाही, पण त्या दोघांना मात्र त्या गमतीदार उत्तराची खूप मजा वाटे; आणि शरद ऋतूतल्या प्रसन्न सकाळी मिनीचं न् तिच्यासाठी तिच्याएवढ्या झालेल्या काबुलीवाल्याचं मनमोकळं हसणं पाहून मलाही फार बरं वाटे. आणखी एक बातचीत त्या दोघांत नेहमी घडे. काबुलीवाला म्हणे, 'बच्ची, तू कधी सासरी जाऊ नकोस हं!'

आमच्या बंगालमध्ये त्यावेळी मुलींना लहानपणापासूनच 'सासर' हा शब्द अगदी चांगला माहीत असायचा. परंतु आम्ही जरा वेगळ्या विचारांचे असल्यामुळे 'सासर' या शब्दामागच्या अर्थाचा मिनीला अजून परिचय झालेला नव्हता. त्यामुळे रहिमतचा प्रश्न तिला नीट कळायचा नाही; पण प्रश्नाचं उत्तर न देता गप्प बसली तर ती मिनी कसली? तीच उलट रहिमतला विचारी, 'तू जाणार का सासरी?'

काल्पनिक सासुरवाडीपुढे मूठ उगारून रहिमत खोट्याखोट्या रागानं म्हणे, 'मी सासऱ्याला एक ठोसा मारणार!'

रहिमतचा आवेश पाहून, त्याच्या सासऱ्याची काय अवस्था होईल या कल्पनेनं करून मिनीची हसता हसता पुरेवाट होई.

शरद ऋतूचे दिवस होते. वातावरण प्रसन्न होतं. पूर्वी राजे लोक याच ऋतूत दिग्विजयासाठी बाहेर पडत. प्रवासाला हा काळ खरोखरच छान असतो. मी कलकत्ता सोडून कधीही कुठे जात नसे. मात्र स्वतः घरात बसून जगभर हिंडायला मनाला मोकळं सोडत असे. जणू मी घराच्या एका कोपऱ्यात बसलेला प्रवासी असे. परदेशाचं नाव ऐकल्यावर



माझं मन सैरभैर होई. रस्त्यात एखाद्या परदेशी माणसाला बघितल्याबरोबर तिथल्या नद्या, पर्वत, दूरदेशीच्या अरण्यातलं त्याचं झोपडं यांची चित्रं माझं मन रंगवू लागे आणि स्वतंत्र, स्वच्छंद जीवनाची कथा कल्पनेत आकार घेई.

एक प्रकारे मी इतका घरकोंबडा होतो, की माझा कोपरा सोडून बाहेर जायचं म्हणजे मला मोठं संकट वाटे! म्हणून तर सकाळच्या वेळी आपल्या खोलीत टेबलाजवळ बसून, काबुलीवाल्याबरोबर गप्पा करता करता माझा आपोआप प्रवास होऊन जाई. दोन्ही बाजूला काळपट, रक्तवर्णीय उंच उंच डोंगररांगा, मध्ये चिंचोळा वाळवंटी रस्ता, पाठीवर बोजा घेऊन जाणाऱ्या उंटांच्या रांगा, पगड्या घातलेले व्यापारी आणि प्रवासी– कुणी उंटांच्या पाठीवर, कुणी पायी, कुणाच्या हातात भाले, तर कुणाच्या हातात चकमकीच्या बंदुका... आपल्या मोडक्यातोडक्या बंगालीत पण घनगंभीर आवाजात काबुलीवाला अशा गोष्टी सांगे, की ती सगळी चित्रं माझ्या डोळ्यांपुढून सरकू लागत.

मिनीची आई अतिशय संशयखोर स्वभावाची! रस्त्यावर जरा कुठे आवाज झाला की तिला वाटे, जगातले सारे दारुडे आपल्या घराच्याच रोखानं धावत येत आहेत. तिच्या मते ही पृथ्वी चोर, डाकू, दारुडे, साप, वाघ, झुरळं, पिसवा, मलेरियाचे जंतू, तसंच गोरे लोक यांनी ठासून भरलेली होती. इतक्या वर्षांच्या अनुभवानंतरही तिच्या मनातली त्यांची भीती यत्किंचितही कमी झालेली नव्हती.

रहिमतच्या बाबतीतही मिनीची आई पूर्णपणे निर्धास्त नव्हती. ती मला वारंवार त्याच्यावर लक्ष ठेवायला सांगत असे. मी तिचं म्हणणं हसण्यावारी नेऊ लागलो की तीच मला उलट विचारी, 'कधी कुणी कुणाची मुलं चोरली नाहीत का? काबूल देशात गुलामांचा व्यापार चालतोच ना? एका आडदांड काबुलीवाल्याला एक छोटंसं मूल पळवून नेणं काय अवघड आहे?'

ही गोष्ट अशक्य नव्हती हे जरी मानलं, तरी ती विश्वास ठेवण्यासारखीही नव्हती. दुसऱ्यावर विश्वास ठेवण्याची सर्वांची क्षमता सारखी नसते. म्हणूनच माझ्या पत्नीला भीती वाटत होती, तरी काही दोष नसताना रहिमतला घरी येण्याची मनाई करणं मला जमलं नाही.

दरवर्षी साधारण माघ महिन्याच्या मध्याला रहिमत त्याच्या मुलखात जात असे. जाण्याआधी उधार दिलेले सगळे पैसे वसूल करण्याच्या कामात तो गुंतलेला असे. वसुलीसाठी त्याला घरोघर फिरावं लागे, तरीही तो दिवसातून एकदातरी मिनीला भेटून जाई. हे पाहिलं की वाटे, या दोघा दोस्तांत काहीतरी गुप्त कारस्थान शिजलेलं आहे! कारण ज्या दिवशी तो सकाळी येऊ शकत नसे, त्या दिवशी तो संध्याकाळी येई. अंधारात घराच्या कोपऱ्यात, अंगात ढगळ खमीज-पायजमा घातलेला आणि खांद्यावर झोळी अडकविलेला तो धिप्पाड काबुलीवाला पाहिला, की साहजिकच मनात एक शंकेची पाल चुकचुके. परंतु जेव्हा मिनी 'काबुलीवाला! काबुलीवाला!' करत धावत येई आणि अगदी भिन्न वयाच्या त्या दोस्तांत

नेहमीप्रमाणे हसतखेळत गप्पागोष्टी सुरू होत, तेव्हा साऱ्या शंका फिटून माझं हृदय आनंदून जाई.

एके दिवशी मी माझ्या छोट्या खोलीत बसून माझ्या पुस्तकाची प्रूफं तपासत होतो. थंडी संपत आली असली, तरी गेले दोन-तीन दिवस थंडीनं पुन्हा चांगलाच जोर धरला होता. हवेत गारठा होता. खिडकीतून घुसून आत आलेलं सकाळचं कोवळं ऊन टेबलाखाली माझ्या पायांना स्पर्श करत होतं. तो उबदार स्पर्श मोठा गोड वाटत होता. आठचा सुमार होता. डोक्याला मफलर बांधून सकाळी फिरायला गेलेली माणसं आता घराकडे परतली होती. अशा वेळी अचानक घरासमोरच्या रस्त्यावर कसली तरी गडबड झाल्याचं ऐकू आलं.

डोकावून पाहिलं तर रहिमतच्या दंडाला काढण्या बांधून दोन पहारेकरी त्याला धरून आणत होते. त्यांच्यामागून फाजील चौकस पोरांचं एक टोळकं चाललं होतं. रहिमतच्या कपड्यांवर रक्ताचे डाग होते, आणि एका पहारेकऱ्याच्या हातात रक्तानं माखलेला सुरा. मी बाहेर जाऊन पहारेकऱ्याला विचारलं, ''काय झालं?''

थोडं पहारेकऱ्यांकडून, थोडं रहिमतकडून समजलं ते असं की, एका शेजाऱ्यानं रहिमतकडून उधारीनं चादर घेतली होती, पण तो आता ते नाकारत होता. दोघांत बरीच बाचाबाची झाली आणि अखेर रहिमतनं त्याला सुऱ्यानं भोसकलं.

त्या माणसाला उद्देशून रहिमत अर्वाच्य शिव्या देत होता. तोच 'काबुलीवाला, ए काबुलीवाला' असं ओरडत मिनी बाहेर आली. क्षणभर रहिमतच्या चेहऱ्यावर कौतुकमिश्रित आनंद दिसला. आज त्याच्या खांद्यावर झोळी नव्हती. त्यामुळे नेहमीप्रमाणे त्या झोळीबद्दलची प्रश्नोत्तरं झाली नाहीत. एकदम पुढचाच प्रश्न आला,

''काबुलीवाला, सासरी चाललास?''

रहिमत हसला आणि म्हणाला, ''हो! तिकडेच चाललो!''

त्यानं पाहिलं, त्याच्या उत्तरानं मिनी हसली नाही, तेव्हा आपले हात तिला दाखवत तो म्हणाला, ''सासऱ्याला मारलं असतं, पण काय करू? माझे हात बांधले आहेत...''

भोसकण्याच्या गुन्ह्याखाली रहिमतला काही वर्षांची शिक्षा झाली.

काळ पुढे चाललाच होता. हळूहळू मला रहिमतचा विसर पडत गेला. आम्ही आमच्या दैनंदिन जीवनात असे गुंतलो होतो की, स्वतंत्र वृत्तीचा एक पर्वतप्राय पुरुष तुरुंगाच्या भिंतीआड वर्षांमागून वर्षं ढकलत आहे, याची आम्हाला जाणीवही उरली नाही.

मिनी तर आपल्या या मित्राला इतकी पटकन विसरली की, तिचं वागणं बघून शरम वाटावी! घोडागाडीच्या नवीन साइसाबरोबर तिची आता गट्टी जमली होती. वाढत्या वयाबरोबर ती नवीन मैत्रिणी जोडत होती. वडिलांच्या खोलीकडे तर ती आताशा फारशी फिरकतही नव्हती; त्यामुळे तिचा माझा संवाद अलीकडे फारच तुटक झाला होता!

आणखी काही वर्षं लोटली. आणखी एक शरदकाल आला. मिनीचं लग्न ठरलं. दुर्गापूजेच्या

सुट्टीत तिचा विवाह होणार होता. दुर्गेबरोबरच आमची ही आनंदमयी आमचं घर सुनं करून पतिगृही जाणार होती.

आजची सकाळ फार सुंदर होती. पावसानंतर शरदातलं ऊन गाळलेल्या सोन्यासारखं दिसत होतं. कलकत्त्याच्या गल्लीबोळातली मोडकी-तोडकी, जीर्णशीर्ण घरंसुद्धा त्या उन्हात विलक्षण सुंदर भासत होती.

आज मिनीचं लग्न होतं. रात्र संपते न संपते तोच आमच्या दारी सनई वाजू लागली. त्या सुरांनी हृदयात काहूर माजलं होतं. मन आतल्या आत रडत होतं. भैरवीचे करुण स्वर माझ्या मिनीच्या विरहाचं दुःख शरदकालातील उन्हासारखं सारं जग व्यापून टाकत आहेत, असं वाटू लागलं.

सकाळपासून घरात गडबड सुरू झाली. लोकांची ये-जा चालू होती. अंगणात मांडव घातला जात होता. चारी बाजूंना आणि व्हरांड्यात लतावेली लावून आरास चालली होती. हातोड्यांचे ठक्ठक् आवाज येत होते. हाकाहाकीला तर सुमारच नव्हता!

मी माझ्या लिहिण्याच्या खोलीत बसून हिशेब करत होतो. अचानक रहिमत तिथे आला आणि सलाम करून उभा राहिला.

मी प्रथम त्याला ओळखलंच नाही! त्याची सगळी रयाच गेली होती. खांद्याला झोळी नव्हती, केसांची लांब झुलपं नव्हती. देहावर पूर्वीचं तेजही उरलं नव्हतं. शेवटी त्याच्या हसण्यावरून मी त्याला ओळखलं. मग विचारलं, ''रहिमत! केव्हा आलास सुटून?''

''काल संध्याकाळीच सुटका झाली,'' तो म्हणाला.

ते ऐकून मला कसंसंच वाटलं. आजपर्यंत खुनी माणसाला मी कधीच इतक्या जवळून पाहिलं नव्हतं. त्याला पाहून जीव चरकला. वाटलं, आजच्या शुभ दिवशी हा नसता आला तर बरं झालं असतं!

मी त्याला म्हटलं, ''आज आमच्या घरी कार्य आहे, मी जरा घाईत आहे. तेव्हा आज तू गेलास तर बरं होईल!...''

माझं बोलणं ऐकून तो तडक जायला निघाला, पण दाराजवळ जाऊन जरा घुटमळला आणि म्हणाला, ''एक वेळ मी बच्चीला पाहू शकणार नाही का?''

त्याला बहुधा लहानपणची मिनीच आठवत असावी. बिचाऱ्याला वाटत असावं, पूर्वीसारखी मिनी आताही 'काबुलीवाला, काबुलीवाला' करत धावत येईल, पूर्वीसारख्याच निर्वेधपणी त्यांच्या गप्पा होतील. पूर्वीचं नातं स्मरून त्यानं द्राक्षांची एक पेटी आणि कागदाच्या पुड्यात थोडे खिसमिस, बदाम आपल्या मित्राकडून घेऊन आणले होते. त्याची स्वतःची झोळी आता होतीच कुठे?

मी म्हटलं, ''आज सगळी कामात आहेत– तेव्हा कुणाचीच भेट होणार नाही.''

हे ऐकून तो काहीसा खिन्न झाला. क्षणभर थांबून त्यानं माझ्याकडे स्थिर नजरेनं पाहिलं आणि ''सलाम बाबू!'' म्हणून तो बाहेर पडला.

मला ओशाळल्यासारखं झालं. वाटलं, त्याला

परत बोलवावं. पाहतो तर तो आपणहूनच परत येत होता.

जवळ येऊन तो म्हणाला, ''ही द्राक्षं आणि खिसमिस मी बच्चीसाठी आणली आहेत. ती तेवढी तिला द्या!''

मी ते घेऊन पैसे देऊ लागलो, तर त्यानं एकदम माझा हात धरला. म्हणाला, ''आपण माझ्यावर खूप दया केलीत. त्याचं मला जन्मभर स्मरण राहील– मला पैसे देऊ नका, बाबू! तुमच्यासारखीच माझ्या मुलखात माझीही एक मुलगी आहे. तिला आठवतच मी आपल्या बच्चीसाठी काहीबाही आणतो. मी काही सौदा करण्यासाठी नाही येत इथे, बाबू!''

इतकं बोलून त्यानं आपल्या ढगळ खमीजात हात घालून छातीपासच्या खिशातून एक मळका कागद बाहेर काढला आणि मोठ्या काळजीपूर्वक कागदाची घडी उलगडून तो दोन्ही हातानं माझ्या टेबलावर पसरला.

त्या कागदावर एका चिमुकल्या हाताच्या पंजाचा ठसा होता– फोटो नव्हता, तैलचित्र नव्हतं, कसलातरी रंग लावून तो छाप कागदावर उमटवला होता. आपल्या मुलीची ती चिमुकली आठवण हृदयाजवळ जतन करत रहिमत कलकत्त्याच्या रस्त्यांतून मेवा विकत हिंडत असे. त्या छोट्याशा कोमल, नाजूक हाताच्या स्पर्शानं त्याच्या विरही हृदयात अमृताचा वर्षाव होत असे.

तो हाताचा ठसा पाहताच माझ्या डोळ्यांत पाणी आलं. तो एक मेवा विकणारा सामान्य काबुलीवाला आणि मी एक उच्चवर्णीय बंगाली हा भेदच मी विसरून गेलो. मला वाटलं, तो आणि मी सारखेच आहोत. जसा तो एक पिता, तसा मीही एक पिताच. पर्वतमय देशात राहणाऱ्या त्या छोट्या पार्वतीच्या हाताचा चिमुकला ठसा पाहून मला मिनीचं बालरूप आठवलं. मी लगेच मिनीला आत बोलावणं पाठवलं. घरातून तिच्या येण्याला खूप विरोध झाला, पण मी कोणाचंच ऐकलं नाही.

रेशमी वस्त्रं परिधान केलेली, कपाळाला चंदनाचा टिळा लावलेली, वधू-वेशातली मिनी लाजत माझ्याजवळ येऊन उभी राहिली.

तिला पाहून काबुलीवाला प्रथम गोंधळला– त्याला तिच्याशी पूर्वीसारखं बोलता येईना. पण मग हसून तो म्हणाला, ''बच्ची, सासरी चाललीस ना?''


मिनीला आता सासुरवाडीचा अर्थ कळला होता. आता पूर्वीसारखं तिलाही गमतीदार उत्तर देता आलं नाही. रहिमतचा प्रश्न ऐकून तिला आणखी लाजल्यासारखं झालं. ती तोंड फिरवून उभी राहिली. काबुलीवाल्याबरोबर झालेली मिनीची पहिली भेट मला आठवली आणि माझं मन गलबलून गेलं.

मिनी आत निघून गेली. एक दीर्घ निःश्वास टाकून रहिमतनं जमिनीवर बसकण मारली. त्याला कळून चुकलं की, त्याची बच्चीही मधल्या काळात अशीच मोठी झाली असणार! आता तिच्याशी नव्यानं ओळख करून घ्यावी लागणार, तिच्याशी बोलायची भाषा बदलावी लागणार. आता ती थोडीच पूर्वीसारखी असेल! या आठ वर्षांत किती पाणी वाहून गेलं असेल कोण जाणे!

शरद ऋतूतल्या सकाळच्या कोवळ्या उन्हात सनईचे सूर मिसळले होते. कलकत्त्याच्या एका गल्लीत बसून रहिमत बघता बघता मनानं पर्वतांच्या, वालुकामय अफगाणिस्थानातील चित्र पाहू लागला.

मी त्याला एक नोट दिली आणि म्हणालो, "रहिमत! तू आपल्या मुलखात आपल्या मुलीकडे जा! तुमच्या दोघांच्या, बापलेकीच्या भेटीनं माझ्या मिनीचं कल्याण होईल!"

हे पैसे दिल्यामुळे मला लग्नसमारंभाच्या खर्चात काटछाट करावी लागली. दिव्यांची रोषणाई करता आली नाही. वाजंत्रीही वाजवता आली नाहीत. घरातली बायकामाणसं खट्टू झाली. त्यांना कुठं माहीत होतं की, एका उज्ज्वल प्रकाशानं आमचा समारंभ आणखी मंगलमय झाला होता.



# २. पुनरागमन

राईचरण नोकर म्हणून बाबूंच्या घरी आला तेव्हा अवघा बारा वर्षांचा होता. यशोधर जिल्ह्यात त्याचं घर होतं. लांब केसांचा, मोठ्यामोठ्या डोळ्यांचा, सावळ्या रंगाचा, सडसडीत राईचरण जातीनं आपल्या धन्यासारखाच कायस्थ होता.

बाबूंच्या एक वर्षाच्या मुलाला– अनुकूलला– सांभाळायचं, त्याची देखभाल करायची हेच राईचरणचं मुख्य काम होतं.

अनुकूलला राईचरणनंच लहानाचं मोठं केलं. अनुकूल शाळेत जाऊ लागला, मग कॉलेजात गेला, पुढे शिकून-सवरून न्यायाधीश झाला, तोपर्यंत एकटा राईचरणच त्याची सर्व देखभाल करत असे.

पुढे अनुकूलबाबूंचं लग्न झालं. राईचरणची नवी मालकीण घरी आली. अनुकूलबाबूंवर राईचरणचा जेवढा अधिकार होता, त्यापेक्षा जास्त अधिकार अनुकूलच्या पत्नीला प्राप्त झाला होता. आता अनुकूलबाबूंची सर्व कामं तिनं स्वतःकडे घेतली होती. राईचरणला आता चुकल्याचुकल्यासारखं वाटत होतं.

परंतु थोड्याच दिवसांत अनुकूलबाबूंच्या पत्नीनं, नव्या मालकिणीनं, एका गोड मुलाला जन्म दिला आणि राईचरणला परत त्याच्या आवडीचं काम मिळालं. नवकुमारला सांभाळायचं काम राईचरणकडे आलं आणि त्याच्याकडून काढून घेतलेल्या हक्कांची भरपाई झाली.

राईचरण नवकुमारला तऱ्हेतऱ्हेनं जोजवत असे. त्याचे दोन्ही हात धरून त्याला वर उडवत असे. त्याच्या तोंडाजवळ तोंड नेऊन त्याच्यापुढे मान डोलावत असे. त्याच्यासारखा सूर धरून असंबद्ध बडबड करताना तर राईचरणला खूप आनंद वाटे. नवकुमारही राईचरणला पाहून आनंदित होत असे.

आता नवकुमार रांगत रांगत घराचा उंबरा ओलांडायला लागला होता. अशा वेळेस कोणी धरायला आलं की नवकुमार 'खीऽ खीऽ' करून हसे आणि एखाद्या सुरक्षित जागी लपून बसे. त्याचं हे चातुर्य पाहून राईचरणला खूप आश्चर्य वाटे. राईचरण नवकुमारच्या आईला अतिशय विश्वासानं, अभिमानानं एखादं गुपित सांगावं तसं सांगे, 'तुमचं पोर मोठेपणी जज्ज होणार आणि पाच हजार रुपये पगार मिळवणार!'

नवकुमारच्या वयाच्या दुसऱ्या कुणा मुलाच्या शहाणपणाबद्दल राईचरणला कोणी काही सांगू लागलं, तर त्याचा त्याच्यावर तिळमात्र विश्वास बसत नसे. पण भविष्यकाळात जज्ज होणाऱ्या नवकुमारबाबत मात्र त्याच्या दृष्टीनं काहीही अशक्य नसे.

हळूहळू नवकुमार पावलं टाकू लागला, डुलत डुलत चालू लागला. राईचरणच्या दृष्टीनं ती एक आश्चर्याचीच गोष्ट झाली. नवकुमार जेव्हा आईला

'आई', आत्याला 'आत्ती' आणि राईचरणला 'चन्न' म्हणू लागला, तेव्हा तर राईचरणचा आनंद गगनात मावेना! तो सगळ्यांजवळ त्याच्या बोबड्या बोलांचं कौतुक करत सुटला.

राईचरण म्हणे, "सगळ्याच मुलांप्रमाणे तो आईला 'आई' म्हणतो, आत्याला 'आत्ती' म्हणतो; पण मला मात्र तो 'चन्न' म्हणतो. घरात तसं कुणी म्हणत असतं, तर त्यांचं ऐकून नवकुमारबाबू तसं बोलतो, असं म्हटलं असतं. पण हे काही वेगळंच!"

खूप वर्षांनी राईचरणला तोंडात दोरी धरून घोडा व्हावं लागलं. कधी त्याला पहेलवान बनून त्याच्याशी कुस्ती खेळावी लागे. खेळता खेळता हरावंही लागे; जमिनीवर आपटावंही लागे. आपटला नाही तर नवकुमार नुसतं आकांडतांडव करी. राईचरण नवकुमारला खूप गोष्टीही सांगत असे.

याच वेळेस अनुकूलबाबूंची बदली पद्मा नदीकाठच्या एका जिल्ह्याच्या ठिकाणी झाली. कलकत्त्याहून येताना अनुकूलबाबूंनी नवकुमारसाठी एक बाबागाडी आणली. सॅटिनचा झब्बा, डोक्यावर जरीची टोपी, हातांत सोन्याची कडी आणि पायांत पैंजण घालून, नवकुमारला राईचरण मोठ्या हौसेनं गाडीतून फिरायला नेत असे.

पावसाळा सुरू झाला. पुरामुळे क्रुद्ध झालेली पद्मा नदी रानं, शेतं, गावंच्या गावं एकामागून एक गडप करत निघाली होती. वाळवंटं, कुरणं सारं काही पाण्यात बुडालं. अतिशय वेगात धावणाऱ्या प्रचंड लाटा नदीच्या पात्रात फेसाळत होत्या. काठ सोडून वाहणाऱ्या नदीच्या तुफान पाण्याचा झप्झप् आवाज आणि लाटांच्या गर्जना दाही दिशांत भरून राहिल्या होत्या.

एके दिवशी दुपारी पाऊस थांबला होता. मात्र आभाळात ढगांची दाटी होतीच. हवेत सुखद गारवा होता. अशा छान वातावरणात राईचरणच्या या छोट्या, विक्षिप्त धन्याला घरी मुळीच राहायचं नव्हतं. तो बाहेर जाण्यासाठी गाडीत चढून बसला. शेवटी राईचरण गाडी ढकलत त्याला नदीतीरावर घेऊन आला. अचानक पावसाचे मोठमोठे थेंब टपटपू लागले. समोरच्या तीरावरील वाळवंटात शुकशुकाट होता. सूर्यास्ताची वेळ झाली होती. त्या भयाण वातावरणात सारखं एका बाजूला बोट दाखवत नवकुमार वारंवार म्हणू लागला, "चन्न फू! चन्न फू!"

जवळच दलदलीच्या ठिकाणी असलेल्या कदंब वृक्षावर असंख्य फुलं फुलली होती. त्याकडे नवकुमारचं लक्ष गेलं होतं. दोन-चार दिवसांपूर्वी राईचरणनं काठी कापून, तिला कदंबाची फुलं लावून त्याला छानपैकी गाडी बनवून दिली होती. तिला दोरी बांधून ओढताना नवकुमारला खूप आनंद झाला. त्या दिवशी राईचरणला लगाम तोंडात धरून घोडा व्हावं लागलं नव्हतं; त्याची साईसपदावर बढती झाली होती.

नवकुमार कितीही रडला, त्यानं कितीही आरडाओरडा केला तरी राईचरणला फुलं तोडायला जावंसं वाटेना. आजूबाजूच्या गंभीर वातावरणाकडे बघत, नवकुमारचं लक्ष दुसरीकडे वळवण्याचा

प्रयत्न करीत तो म्हणाला, "तो बघ, तो पक्षी बघितलास? तो बघ तो उडाला, अरे गेला! ये रे पाखरा, ये!" हातवारे करत, सारखं काहीतरी बडबडत तो गाडी ढकलत राहिला.

परंतु जो मुलगा भविष्यकाळात न्यायाधीश होणार असं भविष्य वर्तवलं होतं, त्याला अशा उपायानं फसवणं कसं शक्य होतं? शिवाय पक्ष्यांना आकर्षण वाटावं असं तिथे आजूबाजूला झाडही नव्हतं. त्यामुळे राईचरणनं निर्माण केलेल्या काल्पनिक पक्ष्यांवर फार वेळ काम भागणार नव्हतं.

अखेर नाईलाज होऊन राईचरण म्हणाला, "बाळा! तू गाडीत बसून राहा, मी पटकन फुलं तोडून आणतो. मात्र नदीच्या पाण्याकडं जायचं नाही हंऽ! बघ गेलास तर!" एवढं बजावून त्यानं गुडघ्यापर्यंत धोतराचा काचा मारला आणि तो कदंबाच्या झाडाच्या दिशेनं निघाला.

परंतु ज्या वेळेस राईचरणनं ताकीद दिली, नवकुमारला पाण्याकडे जायचं नाही म्हणून बजावलं, त्याच वेळेस नवकुमारचं मन कदंबाच्या झाडावरून उडून खळाळत वाहणाऱ्या नदीच्या प्रवाहाकडे धावलं. त्यानं पाहिलं, नदीचं पाणी खळखळ करत धावत सुटलं होतं. जणू काही त्या हजारो खट्याळ लाटा लहान मुलांसारख्या खळखळून हसत, कोणत्यातरी अदृश्य राईचरणचा हात सोडून सैरावैरा धावत सुटल्या होत्या!

दुर्दैवानं त्या छोट्या मुलाचं मन ते पाणी पाहून इतकं अधीर झालं, की गाडीतून उतरून तो हळूहळू नदीच्या प्रवाहाकडे गेला. जाता जाता त्यानं एक गवताचं पातं तोडून घेतलं आणि ते मासे धरायचं जाळं आहे अशी कल्पना करून, पुढे झुकून तो मासे धरायला लागला. जणू त्या नदीच्या प्रवाहातील जलपऱ्या चित्रविचित्र आवाज करून त्याला आपल्या खेळघरात खेळायला बोलावत होत्या.

'धप्' करून कसलातरी आवाज झाला! पण पावसाळ्यात पद्मेच्या काठी असे कितीतरी आवाज होत असत. राईचरणनं ओंजळभर कदंबाची फुलं तोडली. झाडावरून उतरून तो हसतमुखानंच गाडीजवळ आला. बघतो तो तिथे कोणी नाही! त्यानं चारी दिशांना मोठ्या अपेक्षेनं भिरभिर पाहिलं, पण कुठेच कोणीही नव्हतं!

क्षणभर राईचरणचं रक्त गोठून गेलं. डोळ्यापुढे अंधारी आली. भोवतालचं सगळं गरगर फिरतंय असं भासू लागलं. त्याचं हृदय विदीर्ण झालं होतं. घरी लपून बसलेल्या नवकुमारला तो हाक मारी, तशी प्राण एकवटून त्यानं हाक मारली, "बाबूऽ ऽ! अरे माझ्या गुणी बाळाऽ ऽ!"

पण चन्नला कोणीच उत्तर दिलं नाही. लहान मुलाच्या खट्याळ हसण्याचा आवाज कुठे घुमला नाही. पद्मा नदी मात्र पूर्वीसारखीच खळखळ आवाज करत धावत होती. जसं काही घडलेलं तिला कळलंच नव्हतं. जणू काही लहान मुलाच्या मृत्यूसारख्या क्षुल्लक घटनेकडे लक्ष द्यायला तिला फुरसत नव्हती!

...संध्याकाळ झाली. काळजीत पडलेल्या नवकुमारच्या आईनं चारी दिशांना माणसं पाठवली. हातात कंदील घेऊन आलेल्या लोकांनी पाहिलं, तर

मध्यरात्रीच्या वादळी वाऱ्यासारखा, "बाबूऽ ऽ! अरे माझ्या बाळा ऽऽ!" अशा व्याकुळ आवाजात हाका मारत राईचरण नदीच्या काठाकाठानं फिरत होता. नवकुमारचा शोध घेऊन शिणलेला राईचरण अखेरीस पाय ओढत घरी परतला आणि मालकिणीच्या पायापाशी कोसळला. त्याला काहीही विचारलं तरी "मा–ठाकुराणी!... काय झालं मला काही माहीत नाही!..." एवढंच रडतरडत सारखं म्हणत होता.



हे नक्की पद्मा नदीचंच काम असणार हे सगळ्यांनाच कळून चुकलं; पण खेडेगावात काही संशयी वृत्तीचे लोकही असतात. त्यांच्या मनातली शंका काही दूर झाली नाही. त्यांच्याबरोबर मा-ठाकुराणीलाही वाटू लागलं, की राईचरणनंच बाळाची चोरी केली असणार. ती राईचरणला विनवणी करत म्हणाली, "तू त्याला आणून दे. तुला हवे तेवढे पैसे देऊ आम्ही." हे ऐकून तर राईचरण कपाळ बडवू लागला. रागाच्या भरात मालकिणीनं त्याला घराबाहेर हाकलून द्यायला सांगितलं.

आपल्या बायकोच्या मनात राईचरणबद्दल निर्माण झालेला संशय दूर करण्याचा अनुकूलबाबूंनी खूप प्रयत्न केला. ते म्हणाले, "अगं, राईचरण असलं क्रूर कर्म कशासाठी करील?"

"का नाही करणार? बाळाच्या अंगावर सोन्याचे दागिने होते ना?" मा-ठाकुराणी संतापून म्हणाली.

:२:

राईचरण गावी निघून गेला. इतकी वर्षं त्याला स्वतःला मूलबाळ नव्हतं. आता मूल होण्याची शक्यताही नव्हती. पण दैव कसं पाहा! वरील प्रकाराला वर्ष झालं नाही तोच त्याला एक मुलगा झाला; आणि मुलाच्या जन्मानंतर लगेचच राईचरणच्या पत्नीचा अंत झाला.

या बाळाबद्दल राईचरणच्या मनात एक प्रकारची चीड निर्माण झाली होती. त्याला वाटत होतं, हे बाळ जन्माला येऊन जणू काही आपल्या मनातलं नवकुमारबाबूचं स्थान घेऊ पाहतं आहे! धन्याचं मूल पाण्यात बुडवून आपण पुत्रसुख अनुभवणं हे घोर पाप आहे, असंच त्याला वाटे. राईचरण त्या मुलाचा राग-राग करी. त्याच्याकडे इतकं दुर्लक्ष करी, की त्याचा सांभाळ करायला राईचरणची बहीण नसती, तर ते फार दिवस जगलंही नसतं.

परंतु हळूहळू राईचरणचं मन बदललं. हे बाळही योग्य वेळी उंबरा ओलांडायला लागलं; खोडसाळपणा करून घराबाहेर जायला लागलं. त्याचं हसणं, रडणं, बघणं सारं काही नवकुमारबाबूसारखंच होतं. एखाददिवशी त्याच्या रडण्याचा आवाज ऐकून राईचरणच्या हृदयात कालवाकालव होई. त्याला वाटे, 'नवकुमारबाबू राईचरण दिसत नाही म्हणून त्याला शोधत मृत्यूच्या अज्ञात प्रदेशात आक्रंदन करतो आहे!'

राईचरणच्या बहिणीनं मुलाचं नाव फेलना ठेवलं होतं. काही दिवसांनी फेलना बोलायला लागला. तो त्याच्या आत्याला 'आत्ती' म्हणू लागला. ती परिचित हाक ऐकून राईचरणला वाटू लागलं, की नवकुमार आपल्या चन्नाची माया सोडून गेला नाही; परत जन्म घेऊन आपल्या घरी आला आहे.

आणि मग या विचाराला बळकटी देणाऱ्या अनेक गोष्टी त्याच्या मनात येऊ लागल्या. नवकुमारच्या मृत्यूनंतर लगेचच झालेला फेलनाचा जन्म, इतकी वर्षं त्याला मूलबाळ न होता उतारवयात त्याच्या पत्नीनं फेलनाला जन्म देणं, आत्याला 'आत्ती' म्हणणं– या साऱ्या गोष्टींमुळे

राईचरणच्या मनात आलेला विचार दिवसेंदिवस दृढ होत गेला. बाळ 'मा...मा', 'आत्ती...' म्हणत पावलं टाकू लागला, तेव्हा राईचरण चमकला! होय... हेच ते... अगदी तस्संच आहे सारं. त्याच्याच ह्या साऱ्या खुणा... हाच तो भविष्यातला जज्ज!– राईचरणची आता खात्रीच पटली.

अचानक त्याला आपल्यावरच्या त्या भयंकर आरोपाची आठवण झाली. 'होय...' तो आश्चर्यानं स्तिमित होऊन स्वतःशीच म्हणाला, 'आईचं हृदय होतं ते! खरं तेच बोलत होतं. मी तिच्या मुलाला चोरलं असंच म्हणत होती ना ती!' आजपर्यंत तो फेलनाशी जे वागला, त्याचा त्याला पश्चात्ताप होऊ लागला. आता तो फेलनावर जीव तोडून प्रेम करू लागला.

मग राईचरण फेलनाला, तो मोठ्या घरचा मुलगा असल्यासारखा वाढवू लागला. त्यानं त्याच्यासाठी सॅटिनचा झब्बा आणि जरीची टोपी आणली. आपल्या मृत पत्नीचे दागिने मोडून त्यानं फेलनाला दागिने केले. शेजारच्या मुलांबरोबर तो त्याला खेळू देईना. रात्रंदिवस स्वतःच त्याचा खेळगडी होऊन त्याच्याशी खेळू लागला. आजूबाजूची मुलं फेलनाला उपहासानं 'नबाबपुत्र' म्हणत. मोठ्या माणसांना राईचरणचं हे मुलाच्या बाबतीतलं वागणं वेडेपणाचं वाटे.

फेलनाचं शाळेत जाण्याचं वय झालं. तेव्हा घरदार, शेतं सारं विकून राईचरण त्याला कलकत्त्याला घेऊन गेला. त्यानं मोठ्या कष्टानं स्वतःसाठी एक नोकरी मिळवली, आणि फेलनाला विद्यालयात दाखल केलं. तो आपलं स्वतःचं कसंतरी भागवत असे, पण फेलनाला मात्र खाणंपिणं, कपडालत्ता या कोणत्याच बाबतीत काही कमी पडू देत नसे. तो मनाशी म्हणे, 'माझा बाळ, माझा छोटा धनी माझ्याकडे आला आहे. बाळा! माझ्याकडून कोणतंही दुर्लक्ष होऊन तुला त्रास होता कामा नये.'

अशा तऱ्हेनं बारा वर्षं उलटली. फेलना लिहिण्या-वाचण्यात, दिसण्या-वागण्यातसुद्धा चांगला होता. तो प्रकृतीनंही धष्टपुष्ट होता. केस, वेश चांगला ठेवण्याकडे त्याचं विशेष लक्ष असायचं. त्याची वृत्ती काहीशी सुखासीन आणि शौकीन होती. राईचरणविषयी त्याच्या मनात पिता म्हणून प्रेम असलं, तरी तो त्याला वडील म्हणून मान देत नसे. याचं मुख्य कारण म्हणजे राईचरण त्याच्याशी एखाद्या नोकराप्रमाणे वागत असे. शिवाय राईचरणची आणखी एक चूक म्हणजे, तो फेलनाचा बाप आहे, ही गोष्ट त्यानं सगळ्यांपासून गुप्त ठेवली होती.

ज्या छात्रालयात फेलना राहत होता, तिथल्या मुलांचा खेडवळ राईचरण म्हणजे चेष्टेचा विषय होता आणि राईचरणच्या पश्चात फेलनाही त्यांच्या सुरात सूर मिसळत नसेलच असं सांगता येणार नाही. तरीही प्रेमळ, निरागस राईचरणबद्दल सगळ्या विद्यार्थ्यांना मनोमन प्रेम होतं. तसा फेलनालाही राईचरण खूप आवडत असे, पण ती भावना वडिलांप्रमाणे नसून त्या आपलेपणात थोडी कृपेची छटा मिसळलेली होती.

राईचरण आता वृद्ध झाला होता. त्याचा धनी त्याच्या कामात सारख्या उणिवा काढत असे. खरं म्हणजे वयानं, कष्टानं त्याचं शरीर ढिलं पडलं होतं. तो कामातही पहिल्यासारखं लक्ष देऊ शकत नव्हता. कोणत्याही गोष्टीचं त्याला पटकन विस्मरण होई. परंतु कामाचा पूर्ण मोबदला देणारा मालक वार्धक्याची सबब मानणारा नव्हता. राईचरणनं शेतीवाडी विकून जे पैसे जमा केले होते, तेही आता संपत आले होते. चांगला कपडालत्ता मिळत नाही म्हणून फेलनाही आता चिडचिड करू लागला होता.

:३:

शेवटी एके दिवशी राईचरणनं मनाशी काही ठरवून आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. फेलनाला थोडे पैसे देऊन तो म्हणाला, ''मी एका महत्त्वाच्या कामाकरता काही दिवसांसाठी गावी जातो आहे. काम झालं की लगेचच परत येईन.''

राईचरण कलकत्त्याहून निघाला, तो थेट बारासत गावी गेला. अनुकूलबाबू तिथं न्यायाधीश होते.

त्या दिवशी संध्याकाळी अनुकूलबाबू ऑफिसातून थकून येऊन आराम करत होते. त्यांची पत्नी मा-ठाकुराणी एका संन्याशाजवळ बसून, त्याला खूप पैसे देऊन त्याच्याकडून पुत्रप्राप्तीसाठी औषध म्हणून कसलीशी मुळी आणि आशीर्वाद घेत होती. एवढ्यात अंगणातून आवाज आला, ''आई, कल्याण असो!''

''कोण आहे रे?'' अनुकूलबाबूंनी बसल्या जागेवरूनच विचारलं.

राईचरण पुढे येत म्हणाला, ''मी राईचरण.''

वृद्ध राईचरणला पाहून अनुकूलबाबूंचं हृदय भरून आलं. अनुकूलबाबूंनी आस्थेनं त्याची चौकशी केली आणि त्याला 'परत कामाला ये' म्हटलं.

म्लान हसत राईचरण म्हणाला, ''मला फक्त मा-ठाकुराणीच्या पाया पडायचं आहे.''

अनुकूलबाबू राईचरणला घेऊन घराच्या आतल्या बाजूला गेले. मा-ठाकुराणी काही राईचरणचं खुल्या मनानं स्वागत करू शकली नाही. राईचरणनं त्याकडे दुर्लक्ष केलं. हात जोडून तो म्हणाला, ''बाबू, मा-ठाकुराणी! मीच तुमच्या मुलाची चोरी करून त्याला घेऊन गेलो होतो. पद्मा नदीनं त्याला नेलेलं नाही; कृतघ्नपणा करणारा अधम माणूस मीच आहे.''

अनुकूलबाबू आश्चर्यानं म्हणाले, ''काय, म्हणतोस काय? कुठं आहे तो?''

''माझ्याजवळच आहे. मी त्याला परवा आणून देतो,'' राईचरण म्हणाला.

त्या दिवशी रविवार होता. कोर्टाला सुट्टी होती. अनुकूलबाबू आणि मा-ठाकुराणी दोघेही मोठ्या उत्कंठेनं सकाळपासून राईचरणची वाट पाहत होते. दहाच्या सुमारास राईचरण फेलनाला घेऊन आला.

मा-ठाकुराणीनं फेलनाला पाहिल्याबरोबर कसलाही विचार न करता त्याला जवळ घेऊन आपल्या मांडीवर बसवलं. ती आनंदानं इतकी वेडी झाली की, तिनं त्याला गोंजारलं. त्याचा माथा हुंगला. अतृप्त डोळ्यांनी ती त्याच्याकडे बघत

राहिली. क्षणात रडताना, क्षणात हसताना ती अतिशय व्याकूळ झाली!

मुलगा दिसायला देखणा होता. त्याचा वेशही मोठ्या माणसाच्या मुलाला शोभेल असाच होता. दारिद्र्याचं कुठलंही लक्षण तिथे नव्हतं. चेहऱ्यावर अतिशय लाजरे, विनयशील भाव होते. ते पाहून अनुकूलबाबूंचं हृदयही पुत्रप्रेमानं भरून आलं.

तरीही त्यांनी अतिशय शांतपणानं विचारलं, ''हा मुलगा आमचाच आहे याला पुरावा काय?''

राईचरण म्हणाला, ''अशा गोष्टीला पुरावा काय असणार? मी तुमच्या मुलाची चोरी करून घेऊन गेलो होतो, हे फक्त त्या परमेश्वराला माहीत आहे. या जगात ते बाकी कोणालाही माहीत नाही.''

मनावरचा भार हलका झाल्यावर अनुकूलबाबूंनी शांतपणे विचार केला – मुलाला पाहताक्षणी आपली पत्नी त्याला घट्ट धरून बसली आहे, अशा वेळेला पुरावे मागण्यात काय अर्थ आहे? आता त्यावर विश्वास ठेवणंच योग्य आहे. शिवाय हा जुना वृद्ध नोकर आपल्याशी खोटं कशाला बोलेल?

मुलाशी बोलताना अनुकूलबाबूंच्या लक्षात आलं, की लहानपणापासून राईचरणजवळ असल्यामुळे राईचरणला तो पिता समजतो, पण राईचरण मात्र त्याच्याशी नोकरासारखा वागतो.

तरीही आपल्या वृद्ध नोकराचा तो घोर अपराध ते विसरू शकत नव्हते. ते राईचरणला म्हणाले, ''राईचरण, तू मात्र तुझी सावलीसुद्धा इथं पडू देता कामा नयेस.''

गद्गद्लेल्या स्वरात राईचरण म्हणाला, ''प्रभू! एवढ्या म्हातारपणी मी कुठं जाऊ?''

मा-ठाकुराणी म्हणाली, ''राहू दे त्याला इथं. आपल्या मुलालाही बरं वाटेल. मी त्याला क्षमा करीन!''

पण न्यायपरायण अनुकूलबाबू म्हणाले, ''त्यानं जे कृत्य केलं आहे, ते क्षमा करण्यासारखं नाही.''

राईचरण अनुकूलबाबूंच्या पाया पडत म्हणाला, ''बाबू, हे काम मी नाही केलं, देवानं करवलं आहे.''

राईचरण आपलं पाप परमेश्वराच्या माथ्यावर मारतो आहे हे पाहून आणखी संतापत अनुकूलबाबू म्हणाले, ''एकदा ज्यानं विश्वासघात केला आहे, त्याच्यावर आणखी विश्वास ठेवण्यात काय अर्थ आहे.''

राईचरण धन्याचे पाय पकडत म्हणाला, ''धनी! विश्वासघात करणारा मी नव्हे...''

''मग कोण?'' अनुकूलबाबूंनी विचारले.

राईचरण म्हणाला, ''माझं दुर्दैव!''


पण त्याच्या बोलण्यानं कोणाचंच समाधान झालं नाही. राईचरण हताशपणे म्हणाला, ''आता या जगात माझं कोणी नाही.''

फेलनानं जेव्हा पाहिलं, की आपण बड्या न्यायाधीशाचा मुलगा असून आपल्याला राईचरणनं चोरी करून इतके दिवस मुलगा म्हणून स्वतःजवळ ठेवलं, तेव्हा मनातल्या मनात त्यालाही राईचरणचा रागच आला. तरीही तो उदार मनानं अनुकूलबाबूंना

म्हणाला, ''बाबा, त्याला क्षमा करा. त्याला घरी ठेवून घेतलं नाहीत, तरी दर महिन्याला त्याला काही पैसे पाठवा.''

त्यावर राईचरण काहीच बोलला नाही. एकदा त्यानं आपल्या मुलाकडे निरखून पाहिलं; धनी आणि मालकिणीच्या पाया पडून तो घराबाहेर पडला आणि जगातल्या असंख्य माणसांत मिसळून गेला.

महिनाअखेर अनुकूलबाबूंनी त्याच्या गावी त्याच्या पत्त्यावर पैसे पाठवले, पण ते पैसे परत आले; कारण त्या ठिकाणी राईचरण या नावाचा कोणी माणूस सापडलाच नाही.



## ३. सुट्टी

काही बंडखोर मुलं नदीकाठी खेळत होती. फटीक चक्रवर्ती त्यांचा पुढारी होता. खेळता खेळता अचानक फटीकच्या डोक्यात एक नामी कल्पना आली. नदीच्या काठावर ताल वृक्षाचा एक प्रचंड ओंडका पडला होता. होडीची डोलकाठी बनविण्यासाठी तो कोणीतरी तिथं आणून ठेवला असावा. त्याच्याकडे पाहत फटीक म्हणाला, ''आपण सगळ्यांनी हा नदीत ढकलून देऊ या!''

ज्या माणसाचा तो ओंडका होता, त्याला तो तिथे मिळाला नाही की, त्याचा कसा गोंधळ उडेल, तो कसा रागावेल आणि मग कशी खूप मजा येईल, या कल्पनेनंच मुलं हुरळली आणि सगळ्यांनी फटीकच्या बेताला लगेच संमती दिली.

सगळी मुलं जेव्हा शक्ती एकवटून तो ओंडका पाण्यात ढकलायला लागली, तेव्हा फटीकचा धाकटा भाऊ माखन संथ पावलं टाकत तिथे आला आणि गंभीर चेहरा करून त्या ओंडक्यावर जाऊन बसला. खेळाबद्दलचं त्याचं औदासीन्य पाहून मुलं बुचकळ्यातच पडली. एका मुलानं त्याला भीत भीत थोडंसं हलवलं; पण माखनवर त्याचा काहीसुद्धा परिणाम झाला नाही. तो जागचा मुळीसुद्धा हलला नाही. एखादा तत्त्वज्ञानी मनुष्य गंभीर चेहरा करून जगातील व्यवहारांबद्दल विचार करत बसतो, तसा माखन मुलांच्या उपद्व्यापाकडे तटस्थपणे पाहत बसला.

माखन आपल्या जागेवरून उठत नाही असं पाहून फटीक त्याच्याजवळ आला आणि हात उगारून म्हणाला, ''बघ, मार खाशील हं! आताच्या आता ऊठ!''

माखन उठला नाहीच. उलट त्यानं आपलं आसन आणखी ऐसपैस केलं.

आता फटीकला सगळ्यांच्या पुढ्यात आपला शब्द आणि मान राखण्यासाठी माखनला– आपल्या धाकट्या भावाला– एक थप्पड मारणं भाग होतं. पण पुढच्या परिणामांचा विचार करून तो गप्प बसला. त्याच्या सुपीक मेंदूत आणखी एक विचित्र कल्पना आली– तिनं माखनला जास्त त्रास झाला असता आणि त्याच्या मित्रांना आणखी गंमत वाटली असती. तो म्हणाला, ''बसू दे त्याला, त्याच्यासकट ओंडका पाण्यात ढकला!''

आपल्यासकट ओंडका पाण्यात ढकलणार यात माखनला आपला थोडा गौरवच वाटला आणि त्यामुळेच त्यातून उद्भवणाऱ्या आगामी संकटाची प्रथम त्याला कल्पना आली नाही.

मुलं परत 'धक्का मारा', 'जोरात ढकला' असं म्हणत, सारं बळ एकवटून ओंडका पाण्यात ढकलू लागली. ओंडका जरा एका बाजूला वळला न वळला तोच, माखनसकट त्याचं सारं तत्त्वज्ञान, गौरवाची भावना, सारं गांभीर्य जमीनदोस्त झालं.

खेळाच्या सुरुवातीलाच एवढी गंमत आलेली

पाहून सर्व मुलं आनंदानं आरडाओरडा करायला लागली. पण पुढे काय वाढून ठेवलं आहे याची कल्पना आल्यामुळे फटीक मात्र अस्वस्थ झाला.

माखन उठला आणि फटीकच्या अंगावर धावून गेला. वेड्यासारखा तो फटीकला वाटेल तिथं मारत सुटला. त्याच्या नाकावर, गालावर त्यानं बोचकारलं आणि तो घराच्या दिशेनं जाऊ लागला. अर्थातच, खेळ संपुष्टात आला.

फटीकनं पायाजवळची गवताची काडी खस्स्‌कन ओढली आणि ती चघळत तो काठाला बांधलेल्या एका होडीवर जाऊन बसला.

त्याचवेळी काही उतारू घेऊन आलेली एक बोट काठाला लागली. काळ्या मिशा आणि पांढरे केस असलेले एक मध्यमवयीन गृहस्थ किनाऱ्यावर उतरले. फटीकजवळ येऊन त्यांनी फटीकला विचारलं, ''चक्रवर्तींचं घर कुठाय रे?''

फटीकनं हातातली काडी चावत काहीतरी सांगायचं म्हणून सांगितलं, ''ते तिकडे.'' पण घर नक्की कोणत्या दिशेला आहे, ते मात्र त्या गृहस्थांना समजू शकलं नाही.

त्यांनी परत विचारलं, ''कुठं आहे?''

''माहीत नाही–'' होडीवर पाय आपटत फटीकनं तिरसटल्यासारखं उत्तर दिलं आणि तो परत काडी चघळू लागला.



इतक्यात घराकडून एक नोकर आला आणि म्हणाला, ''फटीकदादा, तुला आई बोलावतेय.''

''मी नाही येत!'' फटीक रागानं म्हणाला.

यावर नोकरानं जोर करून त्याला उचललं. फटीकनं खूप हातपाय झाडले; पण काही उपयोग झाला नाही. नोकर त्याला उचलून घरी घेऊन आला.

फटीकला पाहताक्षणी त्याची आई संतापून म्हणाली, ''फटीक, तू परत माखनला मारलंस?''

फटीक म्हणाला, ''मी नाही मारलं!''

''परत वर खोटं बोलतोस?'' आई कडाडली.

फटीक चिडून म्हणाला, ''सांगितलं ना, मी मारलं नाही म्हणून! विचार माखनला.''

माखनला विचारल्यावर माखन पूर्वीच्या आपल्या तक्रारीचं समर्थन करण्यासाठी म्हणाला, ''हो! मारलं!''

आता मात्र फटीकला त्याचं खोटं बोलणं सहन होईना. तो माखनच्या अंगावर धावून गेला आणि त्याला जोरात एक थप्पड लगावून देत म्हणाला, ''खोटं बोलतोस ना? घे! हे अजून एक!''

आईनं माखनची बाजू घेऊन रागानं फटीकला बाजूला ओढलं आणि त्याच्या पाठीत दोन-चार सणसणीत धपाटे मारले.

फटीकनं आईला बाजूला ढकललं, तेव्हा आई संतापून ओरडली, ''गधड्या, तू आता मलाही ढकलायला लागलास?''

... आणि त्याच वेळी घाटावर भेटलेले ते पांढऱ्या केसांचे गृहस्थ घरात डोकावून म्हणाले, ''काय चाललंय?''

त्यांना पाहून फटीकच्या आईला आश्चर्य वाटलं आणि आनंदही झाला. ''अगं बाई! दादा! तुम्ही केव्हा आलात?'' खाली वाकून फटीकच्या आईनं आपल्या थोरल्या भावाला नमस्कार केला.

फटीकच्या आईचं लग्न झालं आणि विश्वंभरबाबू पश्चिमेकडच्या कोणत्या तरी शहरात काही व्यापारधंदा करण्यासाठी निघून गेले. त्या गोष्टीला बरीच वर्षं झाली. मधल्या काळात इकडे बऱ्याच गोष्टी घडल्या. फटीकच्या आईनं फटीकला आणि माखनला जन्म दिला. दुर्दैवानं काही दिवसांनी या मुलांच्या वडिलांचं निधन झालं. पण त्या कोणत्याच प्रसंगी विश्वंभरबाबू प्रत्यक्ष आले नव्हते. आज अनेक वर्षांनी कलकत्त्याला आलेले विश्वंभरबाबू खेड्यातील आपल्या बहिणीच्या गावी तिची चौकशी करण्यासाठी मुद्दाम आले होते.

मागील आठवणी काढण्यात काही दिवस मजेत गेले. जायच्या एक-दोन दिवस आधी विश्वंभरबाबू बहिणीशी मुलांच्या भवितव्याविषयी बोलू लागले; तेव्हा त्यांना फटीकचा दांडगटपणा, अभ्यासातलं दुर्लक्ष आणि माखनचं चांगलं वागणं, अभ्यासाची आवड यांबद्दल बरंच काही ऐकायला मिळालं. ते ऐकून विश्वंभरबाबूंनी फटीकला आपल्याबरोबर घेऊन जाण्याची व आपल्या मुलांबरोबर शिक्षण देण्याची तयारी दाखवली. फटीकच्या आईनं या गोष्टीला अगदी सहजपणे संमती दिली. तिनं फटीकला विचारलं, ''काय रे, मामाबरोबर कलकत्त्याला जाशील का?''

तो आनंदानं म्हणाला, ''हो! जाईन की!''

फटीकच्या जाण्यानं त्याच्या आईची त्याच्या त्रासातून सुटका होणार होती. कारण तो केव्हा माखनला पाण्यात ढकलेल– त्याचं डोकं फोडेल याची तिला नेहमी चिंताच असे. तरीही फटीक कलकत्त्याला जायला इतक्या झटकन आणि आनंदानं तयार झाला, हे तिच्या मनाला लागलंच.

''केव्हा जायचं? कुठं जायचं?'' – असं वारंवार विचारून फटीकनं मामाला अगदी हैराण करून सोडलं. अतिउत्साहामुळे त्याला रात्री धड झोपही लागली नाही.

गावाला जायच्या आनंदात फटीकनं आपली मासे पकडायची काठी, पतंग, गोट्या सारं काही माखनला बक्षिस देऊन टाकलं.

कलकत्त्याला तो मामाच्या बरोबर मामाच्या घरी गेला. मामीला भेटण्याची त्याची ही पहिलीच वेळ होती. त्याला पाहून मामी खट्टू झाली. कारण फटीकमुळे आता खाणारं एक तोंड वाढणार होतं. घरातल्या माणसांत एकाची भर पडणार होती. कुटुंबाच्या खर्चाच्या हिशेबात तिनं आपल्या तीन मुलांची व्यवस्था कशीबशी लावली होती. त्यात आणखी एका तेरा वर्षांच्या, अपरिचित, अशिक्षित, खेडवळ मुलाला आणून सोडल्यानं सारं हाताबाहेर जाणार होतं. या वयातसुद्धा आपला नवरा पुढचामागचा विचार करून पाऊल उचलत नाही, या विचारानं ती हैराण झाली.

तेरा-चौदा वर्षांचा मुलगा म्हणजे एक अडगळीचाच विषय. तो तसा सुखकरही नाही आणि उपयोगाचाही नाही. त्याच्यावर लहान मुलाप्रमाणे प्रेम करता येत नाही आणि त्याचं सारखं आपल्याबरोबर असणंही बरं वाटत नाही. त्याच्या तोंडून लहान मुलासारखं लाडंलाडं बोलणंही बरं वाटत नाही आणि तो मोठ्या माणसासारखं बोलला तर शिष्ट वाटतो. या वयात बालपणातला खेळकरपणा निघून गेलेला असतो. आवाजातलं माधुर्य जाऊन आवाजही फुटायला लागलेला असतो. लहान मुलाचं चुकलं तर मोठी माणसं त्याला क्षमा करायला तयार असतात, पण या वयाच्या मुलाला कुणी फारसं समजून घेत नाही. कोणत्याच वयाच्या माणसांत तो व्यवस्थित सामावला जात नाही हे त्याला माहीत असतं, म्हणून तो काहीसा बावचळलेला असतो. परंतु याच वयात मूल प्रेमाचं भुकेलं असतं. मनात एक प्रकारची कातरता आलेली असते. अशा वेळेला त्याच्यावर कुणी मनापासून प्रेम केलं किंवा मैत्री केली तर तो त्या व्यक्तीसाठी वाटेल ते करायला तयार होतो. परंतु या वयाच्या मुलांशी माणसं जरा कडकच वागतात. नाहीतर ते फाजील लाड ठरतात आणि ते त्या मुलांच्या दृष्टीनंही हितकारक नसतं. साहजिकच इतरांच्या रागावण्यामुळे, चिडण्यामुळे या मुलांना रस्त्यावरच्या बेवारशी कुत्र्यासारखं केविलवाणं वाटू लागतं.

अशा वयात मुलानं स्वतःच्याच घरी असणं चांगलं; परक्या घरी, परक्या लोकांच्या सान्निध्यात राहणं म्हणजे संकटच. भोवतालचं स्नेहहीन, शुष्क वातावरण काट्यासारखं बोचत राहतं. या वयात

स्त्रिया म्हणजे तर स्वर्गलोकीच्या देवताच वाटत असतात आणि म्हणून स्त्रीनं केलेली उपेक्षा त्यांना सहन होत नाही.

आपल्या मामीला आपण घरात नको आहोत, ही गोष्ट फटीकच्या जिव्हारी लागली होती. त्यामुळेच मामीनं कधी त्याला एखादं काम करायला सांगितलं, तर त्याला इतका आनंद होई, की त्या आनंदाच्या भरात तिनं सांगितल्यापेक्षा कितीतरी अधिक काम तो करी आणि नेमकी अशा वेळी ''पुरे! पुरे! खूप झालं, जा आता स्वतःचं लेखन-वाचन कर!'' असं तुसड्यासारखं बोलून मामी त्याच्या उत्साहावर बोळा फिरवी.

घरात अशी अपमानास्पद वागणूक; दुसरीकडे कुठे मोकळ्यावर जावं म्हटलं तरी जाणार कुठे? त्याला अगदी कोंडल्यासारखं होई. मग त्याला गावच्या आठवणी येत. आपण कसे गावी मोकळ्या माळावर पतंग उडवत असू, नदीकिनाऱ्यावर मनाला येतील ती गाणी गात स्वैर भटकत असू, छोट्या छोट्या ओढ्यात सूर मारून पोहत असू– सारं त्याला आठवत राही. त्याला आपली मित्रमंडळी, त्यांच्या खोड्या काढणं, त्यांच्यावर केलेली दादागिरी– सारं काही आठवे. पण त्याला सर्वांत जास्त आठवण यायची ती आईची. सतत त्याला रागावणारी आई. पण आपली आई मनात आपल्याबद्दल काहीतरी गैरसमज घेऊन बसलेली आहे...! आईच्या आठवणीनं तो बेचैन होई!

पक्षी, प्राणी यांच्यांतील प्रेम, त्यांचं वागडणं, एकमेकांसाठी आक्रोश करणं हे सारं पाहून तो व्याकूळ होई. विशेषतः संध्याकाळ दाटून आली, गाईचं वासरू हंबरू लागलं, की 'आई आई' करून त्याचं अंतर्मनही आक्रंदून उठे. त्याची ती अवस्था कोणालाच कळत नव्हती. पण ते अशक्त, बुजरं, निराश पोर आतल्या आत रडत होतं.

अखेर एके दिवशी धीर एकवटून त्यानं मामाला विचारलं, ''मामा, आईकडे केव्हा जायचं?''

''शाळेला सुट्टी लागली की!'' मामा म्हणाले.

दुर्गापूजेची सुट्टी कार्तिक महिन्यात मिळणार; म्हणजे त्याला तर अजून खूप अवकाश आहे!

त्याच अवधीत फटीकचं अभ्यासाचं पुस्तक हरवलं. एरवी पुस्तक असूनही त्याला अभ्यास नीटसा जमत नव्हता. आता तर पुस्तकच हरवलं. मास्तर रोज त्याचा अपमान करू लागले, त्याला बेदम मार बसू लागला. शाळेत त्याच्या मामेभावंडांना त्याला आपला भाऊ म्हणायची लाज वाटू लागली. त्याचा अपमान झालेला पाहून इतर मुलांपेक्षा त्यांनाच जास्त आनंदाच्या उकळ्या फुटू लागल्या.

सगळं असह्य झाल्यावर एक दिवस फटीक अपराधीपणानं भीत भीत मामीला म्हणाला,

''माझं पुस्तक हरवलंय...''

तिरस्कारानं मामी म्हणाली, ''चांगलं झालं! आम्ही तुला एका महिन्यात पाच वेळा तर काही पुस्तक विकत आणून देऊ शकणार नाही.''

फटीक गप्पपणे तिथून चालता झाला. आपण दुसऱ्याला खर्चात पाडतो आहोत याची त्याला

जाणीव झाली; आणि त्याच्या मनात स्वाभिमान जागृत झाला. दैन्य, अवहेलना यामुळे आपलं जिणं त्याला मातीमोल वाटू लागलं.

त्यानंतर एकदा शाळेतून येताना त्याचं डोकं दुखू लागलं. त्याला थंडी वाजून सडकून ताप भरला. आता मामीला आपला त्रास होणार, ती आपल्यावर आणखी संतापणार हे त्याच्या लक्षात आलं. या अवस्थेत आपली आई सोडून दुसऱ्या कोणातरी बाईकडून सेवा करून घ्यायची त्याला लाजही वाटू लागली.

दुसऱ्या दिवशी फटीक कुठेच दिसला नाही. चारी बाजूच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे चौकशी करूनही काही पत्ता लागेना. श्रावणाचा महिना होता. रात्रभर मुसळधार पाऊस कोसळत होता. त्याला शोधण्यासाठी गेलेली माणसं चिंब भिजून गेली. तरीही जेव्हा फटीकचा कुठेच पत्ता लागला नाही, तेव्हा विश्वंभरबाबूंनी पोलिसात खबर दिली.

सबंध दिवस तसाच गेला. संध्याकाळच्या वेळेस एक गाडी विश्वंभरबाबूंच्या घरापुढे येऊन थांबली. त्या वेळेससुद्धा रप्रप् पाऊस पडतच होता. रस्त्यात गुडघागुडघा पाणी साचलं होतं.

दोन पोलीस गाडीतून उतरले. त्यांनी फटीकला गाडीतून उतरवून घेतलं. हाका मारत, फटीकला घेऊन ते विश्वंभरबाबूंपुढे आले. फटीक नखशिखांत चिंब भिजला होता. त्याचं सगळं अंग चिखलानं माखलं होतं. अंगात सणसणीत ताप असल्यामुळे त्याचा चेहरा आणि डोळे लालबुंद झाले होते. त्याचं सर्वांग थरथरत होतं.

विश्वंभरबाबू फटीकला जवळ घेऊन आतल्या बाजूला गेले.

त्याला पाहून मामी म्हणाली, "केवढा त्रास या मुलाचा! द्या त्याला त्याच्या घरी पोहोचवून."

तो सबंध दिवस वाईटच गेला. रात्री कोणाचं खाण्यापिण्याकडे लक्ष नव्हतं. स्वतःच्या मुलांवरही मामी चिडचिड करत राहिली.

फटीक रडतरडत उठून बसला आणि म्हणाला, "मी माझ्या आईच्या घरीच निघालो होतो... त्यांनी मला परत आणलं...!"

फटीकचा ताप खूपच वाढला. रात्रभर तो तापाच्या ग्लानीत बडबडत होता. विश्वंभरबाबू डॉक्टरला घेऊन आले.

फटीकनं आपले लालबुंद डोळे मोठ्या कष्टानं उघडले. छताकडे बघत असहाय्यपणे विचारलं, "मामा, सुट्टी सुरू झाली का?"

विश्वंभरबाबूंनी त्याच्या मनातले विचार ओळखले. खाली वाकून त्याच्या कानाजवळ तोंड नेत मृदू स्वरात ते म्हणाले, "फटीक! बाळा, मी तुझ्या आईला आणायला माणसं पाठवली आहेत."

दुसरा दिवस कसातरी गेला. डॉक्टरांनी गंभीर चेहरा करून सांगितलं, "अवस्था कठीण आहे."

विश्वंभरबाबू काळजी करत फटीकच्या बिछान्याशी बसून राहिले होते. ते क्षणाक्षणाला फटीकच्या आईची वाट पाहत होते.

फटीक खलाशांसारखा सूर धरून बरळू लागला, "एक फूट– मिळालं नाही, दोन फूट– मिळालं नाही." कलकत्याहून येताना थोडं अंतर

स्टीमरमधून यावं लागे. खलाशी दोरी टाकून अंतर मोजताना फटीकनं ऐकलं होतं. आता तेच तो अतिशय करुण स्वरात बोलत होता. जणू तो आपल्याच जीवनसागराचा तळ शोधत होता!

एवढ्यात वादळी वाऱ्यासारखी फटीकची आई घरात शिरली आणि आक्रंदून शोक करू लागली. विश्वंभरबाबू तिची समजूत घालू लागले, पण ती फटीकला कवटाळून, ''फटीक, माझ्या राजा, माझ्या बाळा...'' करून रडू लागली.

फटीक हळूहळू कुशीवर वळला. शून्यात दृष्टी लावून अगदी हळू आवाजात म्हणाला, ''आई, मला आता सुट्टी लागली!...''



# ४. पोस्टमास्तर

नोकरीच्या आरंभी प्रत्येक पोस्टमास्तरला उलापूरच्या पोस्टात काम करावंच लागे. उलापूर गाव अगदी खेडं होतं. गावाजवळ एक निळीची वखार होती. त्या वखारीच्या इंग्रज साहेबानं अनेक खटपटी-लटपटी करून हे पोस्ट ऑफिस स्थापन केलं होतं.

आमचे पोस्टमास्तर वयानं तरुण आणि कलकत्त्याचे राहणारे होते. वाहत्या पाण्यातल्या मासळीला डबक्यातल्या पाण्यात सोडलं तर कसं होईल, तसंच पोस्टमास्तरना उलापूरला येऊन झालं होतं. गावाच्या एका बाजूला अंधाऱ्या घरात, गवताच्या छपराखाली त्यांचं ऑफिस आणि राहायची जागा होती. जवळच एक पाण्याचं बारकंसं तळं आणि त्याच्या आजूबाजूला दाट जंगल होतं. निळीच्या वखारीतील लोकांना कामामुळे एकतर कधी रिकामा वेळ मिळत नसे आणि ते कामगार पोस्टमास्तरांसारख्या प्रतिष्ठित माणसांत मिसळण्यायोग्यही नव्हते.

कलकत्त्यासारख्या शहरातून आलेल्या तरुणाला खेडेगावातील माणसांत मिळूनमिसळून वागणं जमत नसे. एकतर तो शिष्टासारखा वागे, नाहीतर बुजल्यासारखं करी. याच कारणानं पोस्टमास्तरचा गावातल्या लोकांशी कधी फारसा परिचय झालाच नाही. काम थोडं आणि बोलायला कोणी नाही, त्यामुळे त्याच्या आयुष्याला कमालीचा एकटेपणा आला. अशा एकटेपणात तो कधीकधी कविता करत असे. कवितेत तो 'निसर्गाची मुक्त उधळण पाहाताना आयुष्य मोठं सुखानं चाललं आहे' असं वरवर म्हणे, पण मनातल्या मनात मात्र त्याला वाटे की, अरेबियन नाईटस्‌मधल्या सुरस कथेतल्यासारखा एखादा राक्षस येऊन त्यानं एका रात्रीत फांद्या-पानांसकट सगळी झाडं तोडून पक्का रस्ता तयार केला किंवा इथून दिसणारं हे मोकळं आकाश उंच उंच इमारती उभारून झाकून टाकलं, तर किती बरं होईल! शहराच्या भासानं आपल्याला नवजीवनच प्राप्त होईल!

पोस्टमास्तरला पगार अगदी बेताचा होता. त्याला आपला स्वयंपाक स्वतःलाच करावा लागे. गावातली रतन नावाची, आई-बाप नसलेली एक अनाथ मुलगी त्याचं कामधाम करून देई आणि त्यानं दिलेलं उरलंसुरलं खाऊन आपला उदरनिर्वाह करी. रतन बारा-तेरा वर्षांची होती. तिला आपलं असं कोणीच नव्हतं; त्यामुळे तिचं लग्न होण्याचीही फारशी शक्यता नव्हती.

संध्याकाळी गावातल्या घरांतून धुराची वलयं उठत, झाडापानांत रातकिड्यांची किरकिर सुरू होई, दूर अंतरावर नशापाणी केलेले बाऊल उंच स्वरात गाणी गात, त्यावेळी बांबूच्या पानांची थरथर पाहून कवी-हृदयाच्या या माणसाच्या मनात भीतीची कंपनं उठत. घराच्या कोपऱ्यात एक लहानसा दिवा

पेटवून पोस्टमास्तर हाक मारी, 'रतन!' पोस्टमास्तर हाक मारेल म्हणून रतन दारात वाट पाहत बसलेलीच असे, पण तरीही ती हाकेसरशी घरात येत नसे. थोड्या वेळानं आत येऊन विचारी, "बाबू, कशाला हाक मारलीत?"

पोस्टमास्तर विचारी, "रतन, तू काय करतेस?"

रतन म्हणे, "चूल पेटवायला हवी ना! स्वयंपाकाची तयारी..."

पोस्टमास्तर म्हणे, "तुझं स्वयंपाकाचं काम होईल नंतर... आधी जरा मला तंबाखू भरून दे पाहू चिलमीत..."

रतन पटकन दोन्ही गाल फुगवून फू-फू करून फुंकर घालत चिलीम पेटवून आणी. रतनच्या हातातली चिलीम घेत पोस्टमास्तर तिला विचारीत, "रतन, तुला तुझी आई आठवते का गं?"

तसं खूप काही सांगण्यासारखं असे. पण काही तिला आठवत असे, काही आठवत नसे. आईपेक्षा वडिलांची तिच्यावर जास्त माया होती. तिला वडील थोडे थोडे आठवत. ते काम करून संध्याकाळी घरी येत. त्यातल्या एक-दोन संध्याकाळच्या गोष्टी तर स्पष्टपणे आठवत होत्या तिला... त्या गोष्टी सांगता सांगता रतन पोस्टमास्तरच्या पायापाशी जमिनीवर येऊन बसे. तिला आठवे, तिला एक छोटा भाऊ होता. फार वर्षांपूर्वी पावसाळ्याच्या दिवसांत, एके दिवशी डोहाच्या काठावर दोघंजणं मिळून, झाडाच्या तुटलेल्या फांदीचा गळ करून मासे पकडायचा खेळ खेळली होती. अनेक लहानमोठ्या आठवणींपेक्षा तिच्या मनात हीच आठवण वारंवार जागी होई.... अशा गप्पागोष्टी करता करता खूप रात्र होई. मग आळसामुळे पोस्टमास्तरना स्वयंपाक करण्याची इच्छा राहत नसे. सकाळचं शिळं तोंडीलावणं असे. रतन चूल पेटवून ऊनऊन रोट्या शेकून आणी. तेवढ्यावरच दोघांचं भागून जाई.

कधीकधी ऑफिसच्या कोपऱ्यातल्या एका लाकडी स्टुलावर बसून पोस्टमास्तर आपल्या घरच्या आठवणी काढत राही. छोटा भाऊ, आई, मोठी बहीण यांच्या गोष्टी... नोकरीच्या परक्या गावी एकटं असताना त्यांच्या आठवणींनं त्याचं हृदय कातर होई. पण ज्या गोष्टी तो ऑफिसातल्या कोणाजवळ बोलू शकत नव्हता, त्या या लहान, अशिक्षित मुलीजवळ बोलायला त्याला काही वाटत नसे. याचा परिणाम असा झाला की, रतन पोस्टमास्तरशी बोलताना त्याच्या घरच्या लोकांचा उल्लेख 'आई', 'दीदी' अशा परिचित नावांनीच करी. एवढंच नव्हे, तर तिनं आपल्या हृदयपटलावर त्यांच्या काल्पनिक मूर्तीही रेखाटल्या होत्या.

एके दिवशी पावसाळ्यातील दुपारी आभाळ स्वच्छ होतं. उबदार वारा वाहत होता. भिजलेलं गवत आणि झाडंपानं यांच्यावर ऊन पडल्यामुळे एक प्रकारचा उबदार ओला गंध वातावरणात दरवळला होता. कुठलातरी हट्टी पक्षी आपल्या एकसुरी तक्रारखोर आवाजात ओरडून, दुपारच्या नैसर्गिक दरबारात कारुण्य निर्माण करत होता. पोस्टमास्तरला त्या वेळी काही काम नव्हतं. पावसानं भिजलेल्या झाडांची वाऱ्यावर हलणारी मऊ मुलायम पालवी

आणि आकाशात दिसणारे पावसाचे उरलेसुरले ढग नजर खिळवून ठेवत होते. ते सारं पाहत असताना पोस्टमास्तरच्या मनात येत होतं, आपल्याजवळ अगदी आपली अशी कुणी व्यक्ती असती तर? जरा वेळानं त्याला वाटलं, तो करुण आवाजात ओरडणारा पक्षीसुद्धा असंच काहीतरी बोलत असावा. कुणाला खरं वाटलं नसतं, पण एका खेडेगावात, अगदी तुटपुंज्या पगारावर काम करणाऱ्या पोस्टमास्तरच्या मनात त्या गंभीर, निस्तब्ध दुपारी, सुट्टीच्या वेळात असे विचार येत होते, हे नक्की!

एक दीर्घ सुस्कारा टाकून पोस्टमास्तरनं हाक मारली, ''रतन!''

रतन त्या वेळी पेरूच्या झाडाखाली बसून कच्चे पेरू खात होती. धन्याची हाक ऐकून ती त्वरेनं धावतच आली.

धापा टाकत म्हणाली, ''दादाबाबू! मला हाक मारलीत?''



पोस्टमास्तर म्हणाले, ''हे बघ रतन, मी तुला लिहायला-वाचायला शिकवणार आहे आता!''

पोस्टमास्तर दुपारभर रतनला जवळ बसवून अ, आ, इ, ई शिकवू लागले. थोड्याच दिवसांत तिला जोडाक्षरंही वाचता येऊ लागली.

श्रावण महिना होता. पावसाला खंड पडत नव्हता. तलाव, डबकी, नाले पाण्यानं भरून गेले होते. रात्रंदिवस बेडकांचा आवाज आणि पावसाची रिप् रिप् ऐकू येत होती. गावात रस्त्यावरची ये-जा जवळजवळ बंद झाली होती. बाजारात जायचं तरीही होडीतून जावं लागत होतं.

एके दिवशी सकाळी खूप पाऊस पडत होता. पोस्टमास्तरांची विद्यार्थिनी धन्याची हाक येईल या अपेक्षेनं दारात बसून राहिली होती. पण रोजच्यासारखी त्यांची हाक न आल्यानं आपलं पाटी-पुस्तक घेऊन ती हळूच आत गेली. पाहिलं तर पोस्टमास्तर खाटेवर झोपले होते. झोप लागली आहे असं समजून ती परत फिरली, एवढ्यात तिनं हाक ऐकली, ''रतन–'' रतन घाईघाईनं मागं फिरली आणि म्हणाली, ''दादाबाबू! झोपला होतात का?''

पोस्टमास्तर म्हणाले, ''अगं, मला बरं वाटत नाही. जरा कपाळावर हात ठेवून पाहा ना!''

जोरदार पाऊस पडत असताना, आजारी अवस्थेत त्या एकाकी पोस्टमास्तरला कोणाचा तरी स्पर्श हवासा वाटत होता. आपली आई, बहीण कोणी जवळ असती तर किती बरं झालं असतं, अशी त्याला इच्छा झाली. पण त्याची ही इच्छा अगदीच असफल झाली नाही. रतननं लगेचच आपलं लहानपण झुगारून त्याच्या आईची भूमिका स्वीकारली. तिनं वैद्याला बोलावून आणलं. वैद्यानं सांगितल्याप्रमाणे वेळच्या वेळी औषधपाणी दिलं. रात्रभर रतन पोस्टमास्तरच्या उशाशी जागत बसली. वैद्याच्या सांगण्यानुसार तिनं त्याला पथ्याचं खाणंही करून दिलं आणि अधूनमधून सारखं विचारत राहिली, ''अहो दादाबाबू! आता जरा तरी बरं वाटतंय का?''

बऱ्याच दिवसांनंतर पोस्टमास्तरना बरं वाटलं. त्यांच्या क्षीण शरीरानं अंथरूण गुंडाळून ठेवलं. त्यांनी मनानं ठरवून टाकलं, आता इथं राहणं बस झालं! काहीतरी करून बदली करून घ्यायची. गावच्या रोगट हवामानाचा उल्लेख करून, त्यांनी ताबडतोब वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे बदलीसाठी अर्ज केला.

शुश्रूषेतून मोकळी झालेली रतन परत दाराजवळ आपल्या नेहमीच्या जागेवर जाऊन बसू लागली. परंतु आता तिला पूर्वीसारखी त्यांची हाक येईना. अधूनमधून तीच आत डोकावून पाही. पोस्टमास्तर अतिशय विषण्ण मनःस्थितीत खुर्चीवर बसलेले असत किंवा खाटेवर झोपलेले असत. रतन जेव्हा त्यांच्या हाकेची वाट पाहत असे, तेव्हा पोस्टमास्तर आपण केलेल्या बदलीच्या अर्जाच्या उत्तराच्या प्रतीक्षेत असत. रतन दाराजवळ बसून पोस्टमास्तरनी पूर्वी शिकवलेल्या धड्यांची पुनःपुन्हा पारायणं करी. आता दादाबाबूंनी हाक मारली तर पूर्वी शिकवलेल्या जोडाक्षरांचा गडबड घोटाळा होऊन जाईल, अशी तिला भीती वाटे.

पाच-सहा दिवसांनंतर रतनला एका संध्याकाळी पोस्टमास्तरांची हाक ऐकू आली. धडधडत्या अंतःकरणानं घरात प्रवेश करून रतन अधीरपणे म्हणाली, "दादाबाबू! मला हाक मारलीत?"

पोस्टमास्तर म्हणाले, "रतन, उद्याच निघणार मी!"

"कुठं जाणार दादाबाबू?" रतननं विचारलं.

"घरी जाणार," पोस्टमास्तर म्हणाले.

"परत केव्हा येणार?" रतननं विचारलं.

"आता नाही येणार," पोस्टमास्तरनी सांगितलं.

रतननं अधिक काही विचारलं नाही. पोस्टमास्तरनी आपणहूनच तिला सांगितलं की, बदलीसाठी आपण केलेला अर्ज नामंजूर झाला, म्हणून राजीनामा देऊन आपण घरी जात आहोत.

बराच वेळ कोणीच काही बोललं नाही. कोपऱ्यात दिवा मिणमिणत होता आणि गळक्या छपरातून पावसाचं पाणी मातीच्या घड्यावर टप् टप् टप् करत पडत होतं.

जरा वेळानं रतन उठली आणि जड पावलांनी रोट्या करायला निघून गेली. आज नेहमीसारखं तिचं काम पटकन आवरलं नाही. ती विचार करत होती. मनात अनेक भावनांची दाटी झाली होती. जेवण झाल्यावर तिनं पोस्टमास्तरना विचारलं, "दादाबाबू, मला तुमच्या घरी घेऊन जाल?"

पोस्टमास्तर हसले. म्हणाले, "ते कसं शक्य होईल?"

सबंध रात्रभर, जागेपणी आणि स्वप्नातही तिला सारखा पोस्टमास्तरांच्या हसण्याचा आवाज आणि त्यांनी उच्चारलेले ते शब्द ऐकू येत होते. 'ते कसं शक्य होईल?'– त्या शब्दांनी जणू तिला झपाटलं होतं.

सकाळी उठून पोस्टमास्तरनं पाहिलं, तर त्यांच्या स्नानाचं पाणी काढून तयार होतं. कलकत्त्यापासून त्यांना विहिरीच्या ताज्या पाण्यानं अंघोळ करायची सवय होती, हे रतनला माहीत होतं. केव्हा निघणार हे तिनं त्यांना विचारलं नाही, पण तिनं रात्रीच नदीवर जाऊन त्यांच्यासाठी पाणी भरून आणलं होतं.

पोस्टमास्तरनी अंघोळ झाल्यावर रतनला हाक मारली. रतन काहीच न बोलता घरात आली आणि धन्याच्या हुकमाच्या अपेक्षेनं त्याच्या तोंडाकडे पाहत उभी राहिली. पोस्टमास्तर म्हणाले, "रतन, माझ्याजागी जो माणूस येतोय, त्याच्याजवळ मी तुझ्याविषयी बोलेन. तुझी माझ्यासारखीच काळजी घेतील ते. मी जातोय म्हणून तू काळजी करू नकोस."

पोस्टमास्तर हे अगदी मनापासून, मायेनं बोलले हे खरं असलं, तरी त्या पोरीचं मन कोणाला समजणार? आतापर्यंत कितीतरी वेळा धन्याचा ओरडा तिनं मुकाट्यानं सहन केला होता; पण त्याचे हे प्रेमळ शब्द मात्र तिला मुळीच सहन झाले नाहीत. तिचं हृदय भरून आलं. काहीशा उद्वेगानं ती म्हणाली, "नको नको, तुम्ही कोणालाही काहीही सांगू नका. मला आता इथं राहायचंच नाही."

पोस्टमास्तरनी रतनचं हे रूप कधीच पाहिलं नव्हतं. ते अवाक् झाले.

नवीन पोस्टमास्तर आले. त्यांना कामाचा सर्व ताबा देऊन जुने पोस्टमास्तर परत जाण्यास निघाले. जायच्या वेळेस रतनला हाक मारून म्हणाले, "रतन, मी तुला कधीच काही दिलं नाही. आज थोडे पैसे देऊन जातो, त्यात तुझं थोडे दिवस भागेल."

प्रवासापुरते पैसे खिशात ठेवून बाकीचे सारे पैसे त्यांनी बाहेर काढले. तेव्हा त्यांच्या पायावर लोळण घेत रतन म्हणाली,

"दादाबाबू, तुमच्या पाया पडते, पाया पडते तुमच्या. मला काही देऊ नका आणि माझ्यासाठी कोणाला काही सांगूही नका." एवढं बोलून ती तेथून पळत सुटली.

भूतपूर्व पोस्टमास्तरनी एक निःश्वास टाकला. हातात वेताची बॅग घेतली, खांद्याला छत्री अडकवली आणि हमालाच्या डोक्यावर पत्र्याची पेटी देऊन हळूहळू ते घाटाच्या दिशेनं गेले.

ते होडीत चढले आणि होडी सुरू झाली. वर्षाकाळामुळे भरलेली नदी धरणीच्या अश्रुपातासारखी अनावर वाहत होती. पोस्टमास्तरांच्या मनात खोलवर एक कळ उठली. त्या सामान्य खेडवळ बालिकेच्या चेहऱ्यावर जणू विश्वातली प्रचंड वेदना प्रतिबिंबित झालेली आहे, असं त्यांना वाटू लागलं. क्षणभर त्यांना तीव्रतेनं वाटलं, परत जावं आणि त्या अनाथ मुलीला आपल्याबरोबर घेऊन यावं; परंतु तेवढ्यात शिडात वारा भरला. मुसळधार पावसामुळे नदीचा प्रवाह वेगानं वाहू लागला. गाव मागे पडलं आणि नदीकाठचं स्मशान दिसू लागलं. नदीच्या प्रवाहाबरोबर वाहत जाणाऱ्या पोस्टमास्तरांच्या उदास मनात आता तत्त्वज्ञानात्मक विचारांचा उदय झाला– या जीवनात किती ताटातुटी होतात, किती मृत्यू होतात! मग मागे फिरण्यात तरी काय अर्थ? या जगात कोणी कुणाचा नाही!

पण रतनच्या मनाला मात्र अशा तात्त्विक विचारांचा स्पर्शही झाला नाही. ती पोस्ट ऑफिसला रडतरडत फेऱ्या घालत होती. कदाचित तिच्या मनाला एक क्षीण आशा वाटत असावी, की अजूनही दादाबाबू परत येतील! याच विचाराने तिचे पाय त्या जागी जणू खिळून राहिले होते.

किती वेडा असतो माणूस! त्याच्या मनातले भास मावळत नाहीत. युक्तिवाद पटत नाहीत. प्रत्यक्षावर विश्वास न ठेवता– प्राणपणानं तो खोट्याला हृदयाशी कवटाळून ठेवतो. ज्या वेळेस पाश तुटून जातात, हृदयातलं रक्त आटून जातं, त्याचवेळी परत दुसऱ्या कुठल्या तरी भासात अडकण्यासाठी त्याचं मन व्याकूळ होऊ लागतं!

# ५. सुभा

मुलीचं नाव सुभाषिणी ठेवताना ती पुढं मुकी होईल हे कोणाच्या मनात येईल? तिच्या दोन मोठ्या बहिणींची नावं सुकेशिनी आणि सुहासिनी अशी होती. त्या नावांशी मिळतंजुळतं नाव असावं म्हणून तिच्या वडिलांनी तिचं नाव सुभाषिणी ठेवलं. सगळी तिला सुभा म्हणत असत.

मोठ्या दोघी बहिणींची लग्नं, नवरा शोधणं, हुंड्याची जमवाजमव या नेहमीच्या अडचणींना तोंड देत का होईना पार पडली होती. पण सुभा म्हणजे आईवडिलांच्या मनावरचं एक असह्य ओझं होतं.

जी बोलू शकत नाही, तिला काही समजतही नाही असंच इतरांना वाटे आणि ती माणसं तिच्या पुढ्यातच तिच्या भविष्यातील दुर्दैवाचा ऊहापोह करत. आपण म्हणजे आईवडिलांना मिळालेला एक शाप आहोत, हे तिला लहानपणीच कळून चुकलं होतं. त्यामुळे ती सगळ्यांच्या नजरेआड राहण्याचा सतत प्रयत्न करी. ती मनात म्हणे, सगळ्यांनी मला विसरून गेलं पाहिजे; मी ते सहन करीन. पण दुःख कोणाला विसरता येतं? तिच्या संदर्भात तिच्या आईवडिलांना रात्रंदिवस टोचणी लागलेली असे. विशेषतः तिची आई आपल्या आयुष्यातील एक उणीव म्हणूनच तिच्याकडे बघत असे. मुलांपेक्षा मुली जास्त आईजवळ वाढत असतात. मुलीतील उणीव म्हणजे आईला स्वतःचाच कमीपणा वाटतो. सुभाचे वडील वाणीकंठ यांचं सुभावर इतर दोघीजणींपेक्षा जास्त प्रेम होतं. पण आईला मात्र हा एक कलंक वाटत असे; आणि ती तिच्याबाबत फार उदासीन असे.

सुभाला बोलता येत नसलं तरी ती काही आंधळी नव्हती. एखादी गोष्ट मनात आली की तिच्या काळ्याभोर टपोऱ्या डोळ्यांच्या पापण्या थरथरत आणि कोवळ्या पालवीसारखे तिचे ओठ कंप पावत.

मनातल्या सगळ्या भावना शब्दांत व्यक्त करणं सोपं नसतं; पण डोळे मात्र ते काम फार समर्थपणे करतात. डोळ्यांत मनाचं हुबेहूब प्रतिबिंबच उमटलेलं असतं. हृदयातल्या भावनांची डोळ्यांतच उघडमीट चालू असते. अंतःकरणातले भाव डोळ्यांतच प्रकाशमान होतात किंवा लुप्त होतात. ज्यांना जन्मापासून बोलणं म्हणजे केवळ ओठांची थरथर एवढंच माहीत असतं, ते डोळ्यांची भाषा शिकतात– त्यांची अभिव्यक्ती अतिशय संपन्न, सखोल, अंतःस्पर्शी असते, जी आकाशासारखी स्वच्छ असते. मुक्या व्यक्तीला निसर्गाप्रमाणे एक भारदस्त व्यक्तिमत्त्व असतं. सुभाचं तसंच होतं. म्हणून तर इतर मुलंमुली तिला दबकून असत. ती तिच्याशी खेळतही नसत. निर्जन दुपारीसारखी ती निःशब्द आणि एकाकी होती.

सुभा राहत होती ते चण्डीपूर गाव बंगाल प्रांतातील एका छोट्या नदीच्या तीरावर वसलं होतं.

एखाद्या मध्यमवर्गीय गृहस्थाच्या मुलीसारखीच ती नदी होती. ती कृश नदी दुथडी भरून कधीच वाहत नसे, परंतु निरलसपणे सातत्यानं तिचा प्रवाह पुढे जात असे. दोन्ही तीरांवरील ग्रामस्थांच्या जीवनाचा ती एक भाग होती. दोन्ही तीरांवर घरं वसलेली होती, तसेच दाट छायावृक्षही होते. दोन्हींच्या मधून, आपल्या पदावरून खाली उतरून निघालेल्या ग्रामदेवतेसारखी ती नदी वेगानं आणि आनंदानं अनेक कल्याणकारी कामं करत धावत होती.

सुभाच्या वडिलांचं– वाणीकंठांचं– घर नदीच्या एका तीरावर होतं. काठावरच्या बांबूच्या वखारी, गवताच्या झोपड्या, गाईंचे गोठे, चिंचेची झाडं आणि मोठमोठ्या आमराया होडीतून जाणाऱ्या लोकांची दृष्टी आकर्षून घेत असत. या साऱ्या वैभवात मुकी सुभा कोणाच्या लक्षात येत होती की नाही कोणास ठाऊक! पण कामकाजातून वेळ मिळेल तेव्हा सुभा नदीतीरावर जाऊन निश्चल बसत असे.

निसर्ग तिच्याशी बोलत असे; तिच्यातील मुकेपणाची उणीव भरून काढत असे. नदीच्या पाण्याचा खळखळाट, लोकांचा कोलाहल, नावाड्यांचं गाणं, पक्ष्यांचं ओरडणं, झाडांचा मर्मर ध्वनी ही जशी तिच्या हृदयाची स्पंदनं होती, तशीच ती तिची भाषाही होती. तिचे बोलके डोळे निसर्गाशी याच भाषेत बोलत.

मध्यान्ह-प्रहरी जेव्हा नावाडी जेवायला जात, घराघरांतून माणसं वामकुक्षी करत, पक्ष्यांचा कोलाहल थांबलेला असे, रिकाम्या होड्या काठावर बांधून ठेवलेल्या असत, सर्व जग आपले व्यवहार थांबवून भयावह निःस्तब्ध रूप धारण करत असे, तेव्हा तळपत्या आकाशाखाली एक मौन निसर्ग प्रकृती आणि एक मुकी मुलगी समोरासमोर निःशब्द बसलेल्या असत. एक रखरखीत उन्हात आणि एक छोट्याशा झाडाच्या सावलीत.

परंतु सुभाला कोणी मित्रच नव्हते असं मुळीच नव्हे. गोठ्यात दोन गायी होत्या; एकीचं नाव सर्वश्री आणि दुसरीचं पांगुली. त्यांनी सुभाच्या तोंडून आपली नावं कधीच ऐकली नव्हती; परंतु तिचा पदरव त्यांच्या ओळखीचा होता, तिच्या कंठातून येणारा करुण उत्कट स्वर त्यांच्या परिचयाचा होता. शब्दांपेक्षाही त्या स्वराचा अर्थ त्यांना अधिक कळत असे. सुभा कधी त्यांचे लाड करीत असे, कधी रागावत असे, कधी त्यांना विनवत असे. माणसांपेक्षाही ते मुके जीव तिला अधिक समजून घेत.

गोठ्यात जाऊन सुभा जेव्हा आपल्या दोन्ही हातांचा विळखा सर्वश्रीच्या मानेभोवती घालून तिच्या तोंडावर आपला गाल घासू लागे, तेव्हा ती प्रेमळ नजरेनं सुभाकडे पाही आणि पांगुली तिचं मुख चाटू लागे. सुभा दिवसातून तीन-चार वेळा नियमितपणे गोठ्यात जात असे. घरात जेव्हा तिला कोणी टाकून बोले, तेव्हा ती तिच्या या मुक्या मैत्रिणींकडेच धाव घेई. जणू काही तिच्या कटाक्षातून त्यांना तिच्या मनातलं दुःख कळणार असे. त्या दोघीही तिच्या अंगावर आपलं अंग घासून तिच्या हातावर आपली शिंगं घासून निःशब्दपणे तिचं दुःख हलकं करण्याचा प्रयत्न करीत. सुभाकडे गायींप्रमाणे

शेळीचं आणि मांजराचं पिलूही होतं. त्यांच्याबरोबर सुभाची गाढ मैत्री नसली तरी त्या दोघांना मात्र सुभाबद्दल तेवढंच प्रेम होतं. संधी मिळेल, तेव्हा मांजरीचं पिलू सुभाच्या मांडीवर अधिकारानं झोपे. सुभा आपली कोमल बोटं त्याच्या केसांतून फिरवू लागली की ते झोप आल्याचा बहाणा करी.

माणसातलाही एक मित्र तिला मिळाला होता. मात्र त्याच्याबरोबर सुभाची नेमकी मैत्री काय होती हे सांगणं कठीण होतं. कारण तो मित्र बोलका होता, ही मुकी होती. दोघांना बोलायला भाषा सापडली नव्हती.

तो होता गोसावी जातीचा एक छोटा मुलगा. त्याचं नाव प्रताप! तो अगदी आळशी होता. खूप प्रयत्न करून त्याचे आईवडील थकले होते. तो चरितार्थासाठी कामधंदा करून काही मिळवेल ही आशाच त्यांनी सोडून दिली होती. आळशी माणूस स्वतःच्या माणसांना उपद्रवी ठरतो, पण इतरांच्या मात्र तो फायद्याचा असतो; कारण कोणतंही काम काढलं की त्याला हक्कानं राबवता येतं. खेडेगावातून अशी एक-दोन माणसं तरी असतातच. जिथं कामाला माणसं कमी पडतात, तिथं ती धावतात.


मासे पकडणं हा प्रतापचा आवडता छंद होता. त्याचा बराचसा वेळ त्यात जाई. दुपारच्या वेळी तो नदीवर हेच काम करत असलेला दिसे. सुभाची आणि त्याची पुष्कळ वेळा भेट होई. तो कसाही असला तरी त्यालाही मित्र आवडत आणि मासे पकडताना सुभासारखी अबोल मुकी मैत्रीण त्याला छानच वाटे. मुक्या सुभाबद्दल प्रतापला आदर होता. सगळी सुभाला 'सुभा' म्हणत, तर प्रताप तिला 'सू' म्हणून हाक मारत असे.

सुभा चिंचेच्या झाडाखाली बसे. जवळच पाण्यात गळ टाकून प्रताप पाण्याच्या दिशेनं बघत काठावर बसून राही. प्रताप खाण्यासाठी नागवेलीची पानं घेऊन येत असे आणि सुभा ती त्याला साफ करून देत असे. पुष्कळ वेळ नुसतं इकडेतिकडे बघत बसल्यावर, तिला उत्कटपणी वाटे की, आपण प्रतापला खूप काहीतरी मदत करावी आणि दाखवून द्यावं की आपण जगाला अगदीच काही भारभूत होऊन राहिलेलो नाही; आपणही काही काम करू शकतो. पण करण्यासारखं तसं काहीच नसे. मग ती मनातल्या मनात परमेश्वराला विनंती करत असे की, असं काहीतरी घडावं की ज्यामुळे प्रतापही आश्चर्यानं म्हणेल की, 'सू, तू असं काही करशील असं स्वप्नातसुद्धा वाटलं नव्हतं !'

विचार करा. सुभा जलपरी असती तर पाण्यातून हळूहळू वर येऊन नागाच्या डोक्यावरचा दिव्य मणी तिनं काठावर आणून ठेवला असता. तो घेऊन प्रताप पाण्यात सूर मारून पाताळात गेला असता. तिथं त्यानं सोन्याच्या पलंगावर, चांदीच्या राजवाड्यात दुसरं-तिसरं कोणी नाही, तर सुभाच झोपलेली पाहिली असती. सुभाच त्या रत्ननगरीच्या राजाची राजकन्या... पण ते अशक्य आहे. तसं अशक्य काहीच नसतं, पण सुभा जन्माला आली होती मध्यमवर्गीय वाणीकंठांच्या घरी. त्यामुळे त्या गोसाव्याच्या मुलाला– प्रतापला– कसं आश्चर्यचकित करावं, हेच तिला कळत नव्हतं.

सुभा हळूहळू मोठी होत होती. वयाबरोबर तिला समज येत होती. पूर्ण चंद्राला पाहून समुद्राच्या अंतर्भागातून जशा लाटा उठत असतात, तशा तिला विविध गोष्टी नव्यानं जाणवत होत्या. ती स्वतःच स्वतःला प्रश्न विचारत होती; पण तिला समाधानकारक उत्तर मिळत नव्हतं.

एकदा पौर्णिमेच्या रात्री सुभा घराचं दार उघडून बाहेर आली. सुभासारखीच एकाकी असलेली पौर्णिमेची रात्र झोपलेल्या पृथ्वीकडे टक लावून पाहत होती. सुभाच्या हृदयात धडधडू लागलं. आनंद आणि दुःख अशा संमिश्र भावनांनी तिचं मन काठोकाठ भरून गेलं. तिला कमालीचं एकाकी वाटू लागलं. अंतःकरण जड झालं. त्या एकाकी रात्रीसमोर उभी होती एकाकी सुभा.



सुभाच्या लग्नाच्या संदर्भात तिच्या आईवडिलांना फार काळजी वाटे. सुभाचं वय वाढल्यामुळे लोक तिच्या आईवडिलांना नावं ठेवत असत. वाणीकंठांची सांपत्तिक स्थिती चांगली होती. दोन्ही वेळा मासे खाणं त्यांना शक्य होत होतं. अर्थातच त्यांना निंदकांचीही उणीव नव्हती.

नवराबायको दोघांचं बोलणं होऊन वाणीकंठ काही दिवसांसाठी परगावी गेले. परत आल्यावर बायकोला म्हणाले, 'आपल्याला कलकत्त्याला गेलं पाहिजे !'

त्या परक्या ठिकाणी जायची त्यांनी तयारी केली. धुक्यात लपेटलेल्या पहाटेसारखं सुभाचं अंतःकरण दुःखानं जड झालं होतं. कसली तरी भीती गेले काही दिवस तिच्या मनात गोळा होत होती. ती सारखी आपल्या आईवडिलांच्या जवळ घोटाळत होती. आपले विशाल डोळे विस्फारून काहीतरी जाणण्यासाठी ती त्यांच्याकडे पाहत होती. पण त्यांनी तिला एका शब्दानंही काही सांगितलं नाही.

एके दिवशी दुपारी मासे पकडता पकडता प्रताप म्हणाला, "सू, एकदाचा त्यांनी तुला नवरा शोधला. आता तू सासरी जाणार, पण मला पूर्णपणे विसरू नकोस हं!" सुभा अवाक् झाली. बाण लागलेल्या पक्ष्यानं पारध्याकडे व्याकूळ नजरेनं पाहावं आणि मी तुझं काय वाकडं केलं होतं म्हणून विचारावं, तशा विद्ध नजरेनं सुभानं प्रतापकडे पाहिलं. त्या दिवशी ती झाडाखाली थांबली नाही.

वाणीकंठ वामकुक्षी करून हुक्का पीत बसले होते. सुभा खोलीत आली आणि त्यांच्या पायाशी बसून स्फुंदून स्फुंदून रडू लागली. वाणीकंठ एका बाजूला तिला समजावत होते आणि एकीकडे आपले अश्रू पुसत होते.

दुसऱ्या दिवशी कलकत्त्याला जायचं निश्चित झालं. सुभा गोठ्यातल्या आपल्या बालमैत्रिणींचा निरोप घ्यायला गेली. तिनं आपल्या हातानं त्यांना खाऊ घातलं. त्यांच्या गळ्याला हातांचा विळखा घातला. त्यांच्या डोळ्यांत पाहताना तिच्या डोळ्यांतून अश्रू ओघळू लागले. बाहेर फिकट चांदणं पडलं होतं. सुभा खोलीबाहेर पडली. नदीकाठच्या झाडाखालच्या तिच्या आवडत्या जागी तिनं धाड्कन अंग टाकलं. जणू काही मूक धरणीमातेला मिठी मारून ती सांगत होती, 'आई, तू मला दूर लोटू नकोस, तू मला तुझ्या मिठीत घे.'

कलकत्त्याला गेल्यावर एके दिवशी सुभाच्या आईनं खूप काळजीपूर्वक सुभाला सजवलं. रंगीबेरंगी फिती बांधून तिचे केस बांधले आणि खूप दागिने घालून जणू एक प्रकारे तिचं मूळचं सौंदर्यच नष्ट केलं. नवऱ्यामुलाकडच्या लोकांना तिच्या रडण्यानं संशय येईल असं वाटून ती सुभाला रागावत राहिली, पण तिच्या अश्रूंनी आईच्या रागावण्याला जुमानलं नाही.

नवरामुलगा सुभाला बघायला आला. सुभाचे आईवडील काळजीनं उतावळे झाले होते. आतल्या बाजूला सुभाची आई सुभाला जोरजोरात सूचना देत होती. त्यामुळे बाहेरच्या खोलीत येताना सुभाला आणखी रडू फुटलं. आलेला नवरामुलगा तिला

आपादमस्तक न्याहाळून 'अगदीच काही वाईट नाही,' एवढंच म्हणाला.

सुभाला खूप रडताना पाहून नवऱ्यामुलाला वाटलं, मुलगी मनानं खूप हळवी दिसते आहे. जी आईवडिलांना सोडून जाताना एवढी दुःखीकष्टी झाली आहे, ती आपल्यावरही नक्कीच प्रेम करील.

एका शुभ दिनी सुभाचं लग्न झालं.

आपल्या मुक्या मुलीला दुसऱ्याच्या हाती सोपवून सुभाचे आईवडील परतले.

तीन-चार दिवसांतच सुभाचा मुकेपणा सगळ्यांच्या लक्षात आला. तिचे डोळे इतरांना खूप काही सांगत होते; पण ते कोणालाच समजू शकलं नाही. ती सगळीकडे आशेनं बघत होती. पण कोणाशीच संवाद साधू शकत नव्हती. तिच्या जन्मापासून तिची मुकी भाषा जाणणारं तिचं असं कोणीच तिच्याजवळ नव्हतं. तिच्या हृदयात मूक आक्रंदन चालू होतं. पण ज्याला अंतःकरण आहे त्यालाच ते कळणार होतं!

काही दिवसांनी सुभाच्या नवऱ्यानं जिचे नाक, कान, डोळे शाबूत आहेत, अशा एका मुलीची बारकाईनं परीक्षा करून तिच्याशी लग्न केलं आणि तिला सुभाची सवत म्हणून घरी आणलं... सुभाच्या मूक आक्रंदनाला अंतच उरला नाही!



## ६. मास्तरमहाशय

अधर मुजुमदार यांचे वडील एका कंपनीत कारकुनाच्या जागी काम करता करता मोठ्या हुद्यावर चढले होते. त्यांनी बराच पैसा कमावून ठेवला होता. त्यांच्या पश्चात त्यांनी कमावलेला पैसा व्याजी लावून अधरबाबू जगत होते. अधरबाबूंचे वडील खूप दानधर्म करीत. संकटाच्या वेळी लोक त्यांच्याकडे मदतीसाठी धाव घेत, याचा त्यांना मोठा अभिमान वाटे. अधरबाबू मात्र लोकांशी फारसा संबंध ठेवत नसत. आपल्या संपत्तीची ते फार काळजी घेत. त्यांनी टोलेजंग इमारत बांधली होती. घोडागाडी ठेवली होती. पण कर्जाऊ पैसे घ्यायला येणाऱ्यांखेरीज त्यांच्या घराला कोणाचे पाय लागत नसत. त्यांच्या संसारात एकंदरीतच काटकसर असे. गावातल्या फुटबॉल क्लबच्या मुलांना कितीही प्रयत्न केले तरी त्यांच्याकडून वर्गणी म्हणून एक छदामही मिळवता येत नसे.

अचानक अधरबाबूंच्या संसारात एका छोट्या पाहुण्याचं आगमन झालं. अधरबाबूंच्या पत्नीनं एका मुलाला जन्म दिला. मुलगा अगदी आईच्या वळणावर गेला होता. मोठे डोळे, तरतरीत नाक, गौर वर्ण. जो तो म्हणे, 'मुलगा नव्हे हा! साक्षात् कार्तिकेय!'

अधरबाबूंचा जिवलग स्नेही रतिकांत म्हणे, 'बड्या घराण्यातला मुलगा जसा असायला हवा तसाच आहे हा.'

मुलाचं नाव वेणुगोपाल ठेवलं. इतके दिवस अधरबाबूंची बायको ननीबालाला घरखर्चाच्या बाबतीत नवऱ्याच्या विरुद्ध दोन शब्द बोलणं शक्य नसे. कधी काळी एखादी आवडती गोष्ट घेण्याबाबत किंवा काही देण्याघेण्याबाबत त्या पतिपत्नीत बोलाचाली होत असे, पण शेवटी नवऱ्याचा कंजुषपणा पाहून ती माघार घेई.

आता मात्र अधरबाबूंना ननीबालाला गप्प करणं शक्य नव्हतं. वेणुगोपालसाठी एकेक खर्च वाढतच होता. त्याच्यासाठी पायातले पैंजण, हातातली कडी, गळ्यातला हार, टोपी, देशी-विलायती नाना रंगाचे कपडे, या साऱ्या मागण्या कधी गप्प राहून, कधी रडून-कढून, तर कधी वादावादी करून ननीबाला पूर्ण करून घेई. वेणुगोपालसाठी एखादी वस्तू– तिची गरज असू दे, नसू दे– ननीबालाला हवी म्हणजे हवीच असे. ती न देऊन किंवा पुढे केव्हा तरी देण्याचे आश्वासन देऊन आता चालत नसे.

वेणुगोपाल हळूहळू मोठा होत होता. वेणूसाठी खर्च करण्याची अधरबाबूंनाही आता सवय झाली होती. त्याच्यासाठी त्यांनी लठ्ठ पगार देऊन, बऱ्याच परीक्षा दिलेले एक वृद्ध मास्तर ठेवले. त्या मास्तरांनी गोड बोलून, आपल्या शिस्तशीर वागण्यानं वेणूला वश करण्याचा खूप प्रयत्न केला;

पण वेणू त्याला भुलला नाही.

ननीबाला अधरबाबूंना म्हणाली, ''असला कसला तुमचा मास्तर? त्याला बघितल्या बघितल्या पोर अस्वस्थ होतं. द्या घालवून त्या मास्तरला!''

अर्थातच म्हाताऱ्या मास्तरांना निरोप दिला गेला. आता वेणुगोपाल स्वतःच मास्तरांची परीक्षा घेऊ लागला. जे मास्तर त्याला पसंत नसत, त्यांचा सारा अभ्यास आणि पदव्या फुकट जात.

एके दिवशी अंगावर एक मळकं उपरणं पांघरलेला आणि पायात फाटका जोडा घातलेला हरलाल उमेदवार म्हणून उपस्थित झाला. हरलालच्या विधवा आईनं लोकांकडे स्वयंपाकपाणी आणि दळणकांडण करून हरलालला कसंबसं मॅट्रिकपर्यंत शिकवलं होतं. त्यानंतर कलकत्त्यातील कॉलेजात पुढलं शिक्षण घेण्याची प्रतिज्ञा करूनच हरलालनं घर सोडलं होतं. तेव्हापासून वेळच्या वेळी खाणंपिणं न मिळाल्यानं त्याचा चेहरा शुष्क झाला होता; मात्र त्याचं विशाल कपाळ बघणाऱ्याच्या नजरेत भरल्याशिवाय राहत नसे.

दारावरच्या रखवालदारानं हरलालला विचारलं, ''काय हवंय?'' हरलाल भीत भीत म्हणाला, ''मालकांना भेटायचंय.'' रखवालदार म्हणाला, ''तुम्ही त्यांना भेटू शकणार नाही.'' यावर काय उत्तर द्यावं हे न सुचल्यानं हरलाल तिथेच घोटाळत राहिला. त्याच वेळेस सात वर्षांचा वेणुगोपाल बागेतला खेळ संपवून देवडीवर आला. घोटाळणाऱ्या हरलालला पाहून रखवालदार परत एकदा म्हणाला, ''बाबू, तुम्ही जा इथून.''

रखवालदाराचं बोलणं ऐकून वेणूला चीड आली. तो म्हणाला, ''मुळीच जाणार नाहीत ते!'' वेणुगोपाल हरलालचा हात धरून त्याला माडीवर बसलेल्या वडिलांकडे घेऊन गेला.

अधरबाबू वामकुक्षी करून गच्चीतल्या वेताच्या खुर्चीत पाय हलवत बसले होते. म्हातारा रतिकांत जवळच एका लाकडी स्टुलावर बसून हळूहळू गुडगुडी ओढत होता.

रतिकांतनं विचारलं, ''तुमचं शिक्षण किती झालंय?''

मान खाली घालून हरलाल म्हणाला, ''मॅट्रिक झालोय.''

भुवई चढवत रतिकांत म्हणाला, ''फक्त मॅट्रिक पास? मला वाटलं, कॉलेजात शिकतोयस. वयानं काही तू लहान दिसत नाहीस.''

आश्रितांना आणि आश्रयासाठी येणाऱ्यांना छळण्यात रतिकांतला मोठा आनंद वाटत असे. हरलाल काहीच बोलला नाही.

रतिकांत वेणूला लाडानं जवळ ओढून घेण्याचा प्रयत्न करत म्हणाला, ''किती एम. ए., बी. ए. आले आणि गेले, कोणीही पसंत पडला नाही. आता काय शेवटी सोनाबाबू मॅट्रिक झालेल्या मास्तराजवळ शिकणार?''

हरलालला वाटलं, आपली उमेदवारी असफल होणार! तो काही करून बाहेर सटकू पाहत होता. इतक्यात अधरबाबूंच्याच मनांत आलं की, या मुलाला अगदी थोड्या पगारावर नोकरीला ठेवता येईल.

शेवटी हरलालची नोकरी पक्की झाली. हरलालनं अधरबाबूंच्या घरी राहायचं-जेवायचं आणि वेणूला शिकवायचं ठरलं. पगार म्हणून हरलालला पाच रुपये दरमहा मिळणार होते. घरी ठेवून घेण्यात अधरबाबूंनी जे औदार्य दाखवलं होतं, त्या बदल्यात हरलालकडून आणखी काही बारीकसारीक कामं करून घेण्याचा त्यांचा इरादा होता.

यावेळेस मात्र मास्तर टिकून राहिला. पहिल्यापासूनच वेणूचं आणि हरलालचं असं काही मेतकूट जमलं की जसे काही दोघं भाऊभाऊच! कलकत्त्यात हरलालचे कोणीच नातेवाईक नव्हते. त्यामुळे वेणूसारख्या सुंदर मुलानं जणू हरलालच्या हृदयाचा ताबाच घेतला होता!

दुर्दैवी हरलालचं यापूर्वी असं कुणाशीही नातं जुळलं नव्हतं. काहीतरी करून आपली परिस्थिती सुधारावी म्हणून त्यानं प्रयत्नपूर्वक पुस्तकं जमवून अभ्यासाला सुरुवात केली होती. गरिबीमुळे आईला कष्ट करावे लागतात, या विचारानं त्याचं सारं बालपण कुचंबणेत गेलं होतं. आज्ञा मोडून, दांडगाई करून एखादी गोष्टी जिंकण्याचं सुख बाळपणी त्याला कधीच मिळालं नव्हतं. त्यावेळीही तो कोणात मिसळत नसे. आपली फाटकी पाटी-पुस्तकं घेऊन अभ्यास करत राही. सारे बालसुलभ भाव दडपून मोठा होणारा हा मुलगा साहजिकच केविलवाणा होता...

वेणूमुळे मात्र हरलालच्या वृत्तीत खूप फरक पडला. वेणूबरोबर खेळताना, त्याला शिकवताना, तो आजारी पडला असता त्याची शुश्रूषा करताना त्याला वेगळंच समाधान मिळू लागलं. स्वतःच्या उन्नतीसाठी झटण्यापेक्षा दुसऱ्यासाठी काही करण्यातही आनंद असतो, असा आनंद मिळाला की माणसाला त्यावेळी दुसऱ्या कशाचीही गरज वाटत नाही, हेही त्याला कळून चुकलं.

हरलालच्या सहवासात वेणूही आनंदी झाला. घरात तसा तो एकटाच पडत होता. एक तीन वर्षांची आणि एक अगदी लहान अशा दोन बहिणी होत्या. पण त्या त्याच्या खेळातल्या जोडीदारणी म्हणून त्याला मान्य नव्हत्या. गावात त्याच्या वयाची मुलं नव्हती असं नाही; पण अधरबाबू स्वतःला गावातली बडी असामी समजत असत. गावातल्या इतर मुलांबरोबर वेणूला खेळू देणं त्यांना मान्य नव्हतं. त्यामुळे हरलाल हा वेणूचा एकमेव मित्र झाला. हरलालला एकट्यालाच वेणूची सारी दांडगाई सहन करावी लागे. ती सहन करता करता हरलालचा आणि वेणूचा स्नेह दिवसेंदिवस वाढतच गेला. रतिकांत म्हणे, 'आमच्या सोनाबाबूला हरलाल मास्तरनं पार बिघडवून टाकलंय.' अधरबाबूंना अधूनमधून हे गुरुशिष्याचे संबंध फार ठीक नाहीत, असं वाटे. परंतु वेणूपासून हरलालला वेगळं करणं आता कुणालाच जमणार नव्हतं.

वेणू आता अकरा वर्षांचा झाला. हरलाल कॉलेजची शिष्यवृत्ती मिळवून कॉलेजच्या तिसऱ्या वर्षात गेला होता. त्याला कॉलेजमध्ये एक-दोन मित्र मिळाले होते. पण वेणू त्याला इतर मित्रांपेक्षा जास्त

प्रिय वाटत होता. कॉलेजमधून आल्यावर तो वेणूला घेऊन कधी गोलदिघी तळ्यावर, तर कधी ईडन गार्डनमध्ये फिरायला जाई. त्या वेळी तो त्याला इतिहासातील वीरपुरुषांच्या कथा सांगे. कधी स्कॉटच्या कादंबरीतील प्रसंग सांगत असे. तो त्याच्या पुढ्यात खड्या सुरात इंग्रजी कविता म्हणून त्याचा अर्थ त्याला समजावून सांगे; तर कधी शेक्सपियरच्या ज्युलियस सिझर या नाटकातील ॲंटनीचं भाषण त्याच्याकडून पाठ करून घेई. स्वतःला जे आवडत असे ते वेणूला समजावून दिल्याशिवाय हरलालला राहवत नसे.

वेणू शाळेतून आल्यावर पटकन खाणंपिणं उरकून हरलालकडे धाव घेई. त्याची आई ननीबाला कोणत्याही उपायांनी त्याला थांबवू शकत नसे. त्यामुळे ती हरलालवर नाराज झाली होती. आपली नोकरी टिकविण्यासाठी हरलाल वेणूला वश करण्याचा प्रयत्न करतो आहे, असं तिला वाटू लागलं. एके दिवशी तिनं हरलालला बजावलं, ''तुम्ही वेणूचे मास्तर आहात. त्याला फक्त सकाळ-संध्याकाळ एक-दोन तास शिकवायचं एवढंच तुमचं काम; मग सारा वेळ तुम्ही त्याच्याबरोबर कशाला राहता? आजकाल तो आपल्या आईवडिलांना पार विसरून गेला आहे. हे कसलं शिक्षण! आमचा वेणू बड्या घरचा मुलगा आहे. त्याच्याशी तुमच्यासारख्या मास्तरची एवढी सलगी बरी नव्हे...!''

ननीबालाचं बोलणं ऐकून हरलालला धक्का बसला. गहिवरलेल्या स्वरात तो म्हणाला, ''माताजी, यापुढे मी वेणूला फक्त शिकवेन; त्याव्यतिरिक्त त्याच्या सहवासात राहणार नाही.''

त्या दिवशी कॉलेज सुटल्याबरोबर वेणूशी खेळायला न जाता हरलाल कुठे कुठे भटकत राहिला, त्याचं त्यालाच समजलं नाही. संध्याकाळी तो जेव्हा शिकवण्यासाठी घरी आला, तेव्हा वेणू गाल फुगवून बसला होता. उशिराचं कारणही न सांगता हरलालनं वेणूला शिकवायला सुरुवात केली. अर्थातच त्या दिवशीची शिकवणीही नेहमीसारखी खेळीमेळीची झाली नाही.

हरलाल रोज पहाटे उठून आपला अभ्यास करत असे. वेणू उठून तोंड धुऊन धावत हरलालकडे येई. बागेमधील हौदातील माशांना चुरमुरे खाऊ घालणं हे त्यांचं रोजचं काम होतं. बागेच्या कोपऱ्यात दगड रचून छोटंसं घर बांधण्यातही वेणू रमून जात असे. उन्हं आली की हरलाल आणि वेणू घरात जात आणि वेणू हरलालजवळ शिकायला बसे.

त्या दिवशी वेणू नेहमीपेक्षा लवकर उठला. आदल्या दिवशी हरलालनं सुरू केलेल्या गोष्टीचा शेवट ऐकण्यासाठी तो अधीर झाला होता. पण शिकवणीच्या खोलीत येऊन पाहतो तो तिथे हरलाल नव्हता! वेणूनं नोकराला विचारलं, तर त्यानं मास्तर बाहेर निघून गेल्याचं सांगितलं.

शिकवणीच्या वेळी वेणू कधी नव्हे इतका गप्प होता. हरलाल कुठं गेला हेही त्यानं विचारलं नाही; आणि हरलालही वेणूची नजर टाळत होता. पुस्तकात बघत तो वेणूला यांत्रिकपणे शिकवत राहिला.

वेणू घरात जाऊन आईजवळ जेवायला बसला, तेव्हा आईनं विचारलं, ''अरे वेणू, तुला काल संध्याकाळपासून झालंय तरी काय? तोंड वाकडं करून बसला आहेस! धड जेवतही नाहीस, झालंय काय?''

वेणूनं काहीच उत्तर दिलं नाही. जेवण झाल्यावर जेव्हा आईनं त्याला जवळ घेऊन अंगावरून मायेनं हात फिरवला, तेव्हा मात्र त्याला रडू अनावर झालं. तो हुंदके देत म्हणाला, ''मास्तरमहाशय...''

''मास्तरमहाशय काय?'' आईनं विचारलं.

मास्तरमहाशयांनी काय केलं हे वेणूला काहीच सांगता येत नव्हतं. ते पाहून ननीबाला म्हणाली, ''वेणू, मास्तरमहाशयांनी माझ्याविरुद्ध तुला काही सांगितलं का?''

वेणू काहीच बोलू शकला नाही.

मध्यंतरी घरातून अधरबाबूंचे काही कपडेलत्ते चोरीला गेले होते. पोलिसात वर्दी दिली होती. पोलिसांनी झडती घेता घेता हरलालची पेटी तपासली. ते पाहून रतिकांत म्हणाला, ''चोरीचा माल कुणी पेटीत ठेवेल का?''

अधरबाबूंनी हरलाल मास्तरांना बोलावून सांगितलं, ''हरलाल, यापुढे तुला या घरात ठेवून घेणं मला सोयीचं वाटत नाही. तू दुसरीकडे जाऊन राहा आणि फक्त ठरल्यावेळी मुलाला शिकवायला येत जा; फार तर तुझा पगार दोन रुपयांनी वाढवून देईन.''

रतिकांत गुडगुडीचे झुरके घेत म्हणाला, ''हे तर फारच छान! दोघांच्याही दृष्टीनं!''

हरलालनं मान खाली घालून सारं ऐकून घेतलं. त्यावेळी तो काहीच बोलला नाही, पण खोलीत येऊन त्यानं अधरबाबूंना चिठ्ठी लिहून कळवलं की, वेणूला शिकवायला येणं यापुढे आपल्याला जमणार नाही.

वेणू शाळेतून आला तेव्हा त्याला मास्तरमहाशयांची खोली रिकामी दिसली. हरलालची जुनीपानी पेटीही तिथं दिसली नाही. कोपऱ्यात दोरी बांधलेली होती, पण तिच्यावर मास्तरमहाशयांचे कपडे किंवा पंचा नव्हता. टेबलावर कागद, पुस्तकं पसरलेली असत, तिथं आज फक्त काचेच्या बाटलीत एक सोनेरी मासा तरंगत होता. बाटलीवर वेणूच्या नावाची एक चिठ्ठी चिकटवलेली होती. जवळच एक सुंदर बांधणीचं चित्रांचं इंग्रजी पुस्तक होतं, ज्याच्या आतल्या पानावर वेणूचं नाव आणि खाली त्यादिवशीची तारीख टाकली होती. वेणू धावत धावत वडिलांकडे गेला आणि म्हणाला, ''बाबा, मास्तरमहाशय कुठं गेले?''

वेणूला जवळ ओढत अधरबाबू म्हणाले, ''ते काम सोडून निघून गेले.''

वडिलांच्या हातून स्वतःला सोडवून घेत बिछान्यावर अंग टाकून वेणू हमसाहमशी रडू लागला. काय करावं ते अधरबाबूंना सुचेना.

दुसऱ्या दिवशी साडेदहाच्या सुमारास कॉलेजला जावं की न जावं, असा विचार करत

हरलाल आपल्या खोलीत बसला होता. इतक्यात अधरबाबूंचा नोकर आणि त्याच्या मागोमाग वेणू आत आले. हरलालला पाहताच वेणू धावतच त्याच्याकडे गेला आणि त्याच्या गळ्यात हात टाकून रडू लागला. हरलालचा गळा दाटून आला. डोळ्यांत अश्रू जमा झाले. बोलायला लागलो तर डोळ्यांतून अश्रू ओघळतील या भीतीनं तो काही बोलला नाही.

वेणू म्हणाला, ''आमच्या घरी चला, मास्तरमहाशय...''

वेणूच्या घरी जाणं हरलालला आता अशक्य होतं. पण वेणूचा स्पर्श आणि त्याचे शब्द याची मात्र त्याला बरेच दिवस आठवण येत राहिली.

अनेक प्रकारे प्रयत्न करूनही हरलालचं अभ्यासात म्हणावं तसं लक्ष लागत नव्हतं. कशीतरी परीक्षा पास होता आली तरी त्याला शिष्यवृत्ती मिळण्याची आशा नव्हती. शिष्यवृत्ती मिळाली नाही तर त्याला शिक्षण चालू ठेवणं अशक्य होतं. शिवाय आईलाही थोडे पैसे पाठवावे लागणार होते. त्यामुळे तो नोकरीच्या शोधार्थ बाहेर पडला.

सुदैवानं एका इंग्रज व्यापाऱ्याला पहिल्या भेटीतच हरलाल पसंत पडला. त्यांनी हरलालला विचारलं, ''तुला कामाचा अनुभव आहे का? तुझ्याजवळ काही सर्टिफिकेटस् आहेत का?'' हरलाल म्हणाला, ''नाही.''

साहेब म्हणाले, ''ठीक आहे. तुला पंचवीस रुपये पगार मिळेल. काम शिकलास की पगार वाढवीन.'' हरलालच्या कपड्यांकडे बघत साहेब म्हणाले, ''तुला पंधरा रुपये आगाऊ देतो. ऑफिसला येण्यासाठी चांगले कपडे शिवून घे.''

साहेब हरलालला खूप राबवून घेत असे. बाकीचे लोक घरी गेले तरी हरलालची कामातून सुटका नसे. काही वेळा तर त्याला मालकाच्या घरी जाऊन काम करावं लागे. परंतु या साऱ्यामुळे हरलाल थोडक्या वेळात काम शिकला. इतर कारकुनांना हळूहळू त्याच्याविषयी असूया वाटू लागली. त्यांनी त्याच्याबद्दल उगीचच तक्रारी करण्यास सुरुवात केली, पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही.

हरलालला जेव्हा चाळीस रुपये पगार मिळायला लागला, तेव्हा त्यानं आपल्या आईला मुलखातून बोलावून घेतलं आणि एका छोट्या गल्लीत एक छोटंसं घर भाड्यानं घेतलं. आता त्याच्या आईचे कष्टही संपले. ती म्हणू लागली, ''हरलाल, आता मला लवकर सूनबाई आण बाबा!''

हरलाल आपल्या आईला वेणुगोपालबद्दल नेहमी सांगत असे. एक दिवस हरलालची आई म्हणाली, ''हरलाल, ज्या वेणुगोपालबद्दल तू रात्रंदिवस सांगत असतोस, त्याला एकदा घरी तरी आण बाबा! मला त्याला बघायची खूप इच्छा आहे.''

हरलाल म्हणाला, ''या छोट्याशा घरात त्याला कुठे बसवायचं आई? जरा मोठं घर घेतलं म्हणजे आणीन त्याला.''

हरलालच्या पगारात वाढ झाली. तो छोट्या गल्लीतल्या छोट्या घरातून एका मोठ्या घरात राहायला गेला. पण अजूनही त्यानं अधरबाबूंच्या घरी जाऊन वेणूला आपल्या घरी बोलावलं नव्हतं.

एक दिवस अचानक वेणूच्या आईच्या मृत्यूची बातमी त्याच्या कानावर आली. मग मात्र हरलालला राहावलं नाही. क्षणाचाही विलंब न करता तो वेणूच्या घरी गेला.

ते भिन्न वयाचे मित्र अनेक दिवसांनी एकमेकांना भेटले आणि मग त्यानंतर हरलाल अधूनमधून वेणूकडे जात राहिला.

वेणू मोठा झाला होता. त्याला आता मिसरूड फुटली होती. त्याच्या वागण्यात थोडा विलासीपणा आला होता. त्याचं मित्रमंडळही वाढलं होतं. त्यांना फोनोग्राफवर गाणी ऐकवण्यात वेणूला आनंद वाटायचा. खोलीतली मोडकी टेबल-खुर्ची आता नाहीशी झाली होती. आरसे, चित्रांच्या तसबिरी यांनी खोली सजून बसली होती. वेणू कॉलेजात जात होता, पण दुसऱ्या वर्षाची सीमा ओलांडण्याची त्याला घाई नसावी असं वाटत होतं.

आईच्या इच्छेप्रमाणे वेणूला घरी येण्याचं आमंत्रण द्यावं, असं हरलालला खूप वाटत होतं; पण अजूनही त्याला धीर होत नव्हता. शेवटी एक दिवस हरलालनं वेणूला घरी बोलावलं. वेणू हरलालच्या आईला पाहताक्षणीच खूप आवडला. तिनं त्याला मनापासून आशीर्वाद दिला आणि मायेनं खाऊ घातलं. वेणू मात्र अस्वस्थ होता. जेवण होताक्षणी आपल्या खिशातलं सोन्याचं घड्याळ काढून पाहत तो म्हणाला, ''मास्तरमहाशय, माझ्या घरी एक-दोन मित्र यायचे आहेत, मला गेलं पाहिजे.'' तुटक शब्दांत निरोप घेऊन तो दारापुढे उभ्या असलेल्या त्याच्या गाडीत बसलासुद्धा! गाडी दिसेनाशी होईपर्यंत हरलाल बघत राहिला आणि मग एक दीर्घ सुस्कारा टाकत स्वतःशीच म्हणाला, 'वेणूला परत कधीही बोलावणार नाही. त्याला कोणाच्या मायेची मुळीच गरज नाही; आणि किती झालं तरी मी एक सामान्य मास्तर!'

एक दिवस हरलाल ऑफिसातून घरी आला. अंधाऱ्या खोलीत कोणीतरी बसल्याचं त्याला दिसलं. आधी हरलालच्या लक्षात आलं नाही, पण परदेशी अत्तराच्या गंधानं त्याचं लक्ष वेधलं. त्यानं विचारलं, ''कोण आहे?''

''मी आहे मास्तरमहाशय!'' वेणूनं उत्तर दिलं.

''काय झालं वेणू?'' मास्तरमहाशयांनी चौकशी केली, ''केव्हा आलास?''

''मला येऊन खूप वेळ झाला,'' वेणू म्हणाला, ''तुम्हांला ऑफिसातून यायला इतका उशीर होतो हे माहीत नव्हतं मला.''

जिना चढून दोघं वर गेले. हरलालनं दिवा लावला. ''सर्व ठीक आहे ना वेणू? काही विशेष बातमी आहे का?'' हरलालनं वेणूला विचारलं.

''दिवसेंदिवस कॉलेज शिक्षण कंटाळवाणं होत चाललंय. कितीही प्रयत्न केले तरी परीक्षा पास होता येत नाही. माझ्यापेक्षा लहान असलेली मुलं

माझ्यापुढे निघून गेली याची मला लाज वाटते. बाबांच्या हे काही लक्षातच येत नाही.'' वेणूनं आपली हकिगत सांगितली.

''तुझी काय इच्छा आहे?'' हरलालनं त्याला विचारलं.

वेणूला विलायतेला जाऊन बॅरिस्टर व्हायचं होतं. अभ्यासात त्याच्याहीपेक्षा मागे असलेला एक मुलगा परदेशी जायला निघाला होता.

''तुझ्या बाबांना तू हे सांगितलंयस् का?'' हरलालनं चौकशी केली.

वेणू म्हणाला, ''पास झाल्याशिवाय विलायतेला पाठवायला बाबा अजिबात तयार नाहीत. त्याबद्दल ते एक शब्दही ऐकून घेत नाहीत आणि मी पास होणार नाही.''

हरलाल म्हणाला, ''चल, मी तुझ्या बाबांकडे येतो, त्यांच्याशी बोलतो... पाहू या काय म्हणतात ते.''

''नाही, मी मुळीच तिकडे येणार नाही!''

वडिलांशी भांडण करून वेणू इथं आला हे हरलालला आवडलं नाही. त्याला आपल्या घरी ठेवून घेणंही हरलालला प्रशस्त वाटेना. जरा राग निवळला की समजूत घालता येईल असं वाटून तो म्हणाला, ''तू जेवून आला आहेस का?''

''नाही, मला भूक नाही. मी आज जेवणार नाही...'' वेणूनं उत्तर दिलं.

''असं कधी झालंय?'' हरलाल म्हणाला आणि लगबगीनं आईकडे जाऊन म्हणाला, ''आई, वेणू आलाय. त्याला काहीतरी खायला दे.'' ते ऐकून आई खूश झाली आणि वेणूसाठी काही खाणं करायच्या तयारीला लागली.

हरलाल ऑफिसचे कपडे बदलून वेणूजवळ आला. वेणूच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाला, ''वेणू, वडिलांशी भांडून घर सोडून जाणं योग्य नाही. हे तू बरोबर नाही केलंस!''

''तुमच्याकडे माझी सोय होत नसेल तर मी सतीशकडे जाईन,'' वेणू ताडकन म्हणाला आणि रागारागानं जायला निघाला.

हरलाल त्याचा हात धरत म्हणाला, ''वेणू थांब, थोडं खाऊन जा.''

''नाही, मला नाही खायचं.'' हरलालचा हात हिसडून वेणू रागारागानं बाहेर जाऊ लागला. परंतु तेवढ्यात हरलालची आई जेवणाची थाळी घेऊन आली. तिनं बळेबळेच वेणूला खाली बसवलं. मोठ्या नाखुशीनं वेणू थाळीतलं अन्न चिवडू लागला.

इतक्यात दरवाजापाशी एक गाडी थांबली. प्रथम नोकर आणि नंतर दाणदाण जिना चढत अधरबाबू आले. वडिलांना पाहून वेणूचा चेहरा पडला. परकी माणसं आलेली पाहून हरलालची आई आत निघून गेली. हरलालकडे पाहत अधरबाबू रागारागानं म्हणाले, ''ही तुझी बुद्धी काय? रतिकांत मला पहिल्यापासून सांगत होता! पण तुझ्या पोटात एवढं काळंबेरं असेल, असं वाटलं नव्हतं. वेणूला जवळ करून आपला फायदा करून घ्यावा असा तुझा बेत असेल, पण मी ते कधीही होऊ देणार नाही. हे मुलाला फूस लावून पळवून नेणंच आहे.

पोलिसात वर्दी देऊन तुला तुरुंगात पाठवीन तेव्हाच गप्प बसेन!'' वेणूकडे बघून अधरबाबू म्हणाले, ''चल!'' एकही शब्द न बोलता वेणू वडिलांच्या मागोमाग गेला.

त्या दिवशी हरलालनं तोंडात अन्नाचा घासही घातला नाही.

ज्या ऑफिसमध्ये हरलाल काम करत होता, त्या ऑफिसचा डाळ-तांदुळाच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार होता आणि आता तो व्याप खूपच वाढला होता. त्यासाठी हरलालला बरीच रक्कम घेऊन शनिवारी सकाळच्या गाडीनं गावी जावं लागे. पैसे चुकते करण्यासाठी गावात एक केंद्र उभारलं होतं. गेल्या आठवड्याचा हिशेब चुकता करून चालू आठवड्यासाठी पैसे ठेवून यायचं असं त्या कामाचं स्वरूप होतं. हरलालकडून कोणताही जामीन न घेता, त्याच्या साहेबानं स्वतःच्या जबाबदारीवर त्याला हे काम देऊ केलं होतं.

माघापासून चैत्रापर्यंत ते काम चालू राहील, असा अंदाज होता. या कामामुळे हरलालला कामावरून यायला उशीर होत असे.

एके दिवशी हरलाल ऑफिसमधून आला असता त्याच्या आधीच वेणू येऊन बसलेला त्याला दिसला. हरलालची आई त्याला जेवून जाण्याचा आग्रह करत होती. हरलालचं मनही परत वेणूकडे ओढ घेऊ लागलं.

हरलालच्या आईच्या मनातही त्या मातृहीन वेणूबद्दल अपार माया निर्माण झाली होती. आपल्याला 'आई' म्हणून हाक मारण्यासाठी तो येतो, असं तिला वाटत होतं.

एकदा रात्री वेणू असाच हरलालची वाट बघत हरलालच्या घरी थांबला होता. हरलाल आल्यावर बऱ्याच उशिरापर्यंत ते दोघं बोलत बसले. वेणू सांगत होता, ''बाबा हल्ली इतके चिडखोर झाले आहेत की, आता त्या घरी राहाणं मला शक्य होणार नाही. शिवाय ते परत लग्न करण्याच्या विचारात आहेत. रतिबाबू त्यांच्यासाठी बायको शोधत आहेत. त्या दोघांची सतत त्याविषयीच बोलणी चालू असतात. पूर्वी मला घरी जायला जरा उशीर झाला की बाबा अस्वस्थ होत असत. आता मात्र दोन-चार दिवस घरी गेलो नाही तरी त्यांना काही वाटत नाही. कारण मी घरी नसलो की त्या दोघांना मोकळेपणानं बोलता येतं. हे लग्न झालं तर मी त्या घरी राहू शकणार नाही. तुम्हीच सांगा, मी काय करू? मला आता स्वतंत्र व्हायचंय.''

हरलालला खूप दुःख झालं. पण या आपल्या विद्यार्थ्याला आपण कशी मदत करणार, हे त्याचं त्यालाच उमजेना.

वेणू म्हणाला, ''काही झालं तरी मला विलायतेला जायचंच आहे. बॅरिस्टर होऊन आलो की या साऱ्यातून आपोआपच सुटेन.''

''पण अधरबाबू तुला जाऊ देतील का?'' हरलालनं विचारलं.

''मी गेलो तर त्यांना बरंच वाटेल. पण विलायतेच्या खर्चाचे पैसे त्यांच्या हातून सुटणार नाहीत. काहीतरी केलं पाहिजे,'' वेणू म्हणाला.

"कसलं कारस्थान?" वेणूचा विचार ऐकून हरलालनं हसून विचारलं.

"कोणाकडून तरी कर्जाऊ पैसे घ्यायचे आणि विलायतेला जायचं. घेणेदार मागे लागले की बाबा पैसे फेडतील. विलायतेला राह्यला लागलो की तिथल्या खर्चासाठी बाबांना पैसे पाठवावेच लागतील," वेणू म्हणाला.

"पण तुला कर्जाऊ पैसे कोण देणार?" हरलालनं प्रश्न केला.

"तुम्ही नाही का देऊ शकणार?" वेणूनं विचारलं.

"मी?" हरलाल आश्चर्यानं उद्गारला.

"तो नोकर तर रोज पैशाच्या पिशव्या घेऊन येतो तुमच्याकडे!" वेणू म्हणाला.

हरलाल हसून म्हणाला, "तो नोकर माझा नाही, तशाच त्या पैशाच्या पिशव्याही माझ्या नाहीत." आणि मग पैसे कसे रात्रीपुरते आपल्या घरी ठेवले जातात आणि सकाळी जिकडच्या तिकडे पोहोचवले जातात याविषयी हरलालनं वेणूला सारं समजावून सांगितलं.

"तुमचे साहेब मला कर्जाऊ पैसे देतील का?" वेणूनं विचारलं.

"तुझे वडील जामीन राहतील तर साहेब कर्जाऊ पैसे देतीलही," हरलाल म्हणाला.

"मग वडिलांनी जामीन राहण्याऐवजी पैसेच कर्जाऊ नसते का दिले?" वेणू म्हणाला.

अर्थात, तो विषय तिथेच संपला.

एकदा शुक्रवारी रात्री हरलालच्या घरासमोर एक घोडागाडी उभी राहिली आणि त्यातून वेणू उतरला. वेणू आला तेव्हा हरलाल आपल्या झोपायच्या खोलीत बसून ऑफिसातून आलेले पैसे मोजत होता. आज वेणूचा थाटमाट काही औरच होता. नेहमीच्या धोतर कुडत्याऐवजी त्यानं आज पारशी कोट-पाटलोण घातली होती. डोक्यावरही पारशी टोपी होती. दोन्ही हातांच्या बोटांत अंगठ्या चमकत होत्या, गळ्यात जाड सोन्याची साखळी रुळत होती, आणि शर्टला हिऱ्याची बटणं लावलेली होती.

पैसे मोजायचं थांबवून हरलालनं आश्चर्यानं विचारलं, "एवढ्या रात्री? काय आहे आज?"

"परवा बाबांचं लग्न आहे. त्यांनी माझ्यापासून ही गोष्ट लपवून ठेवलीय, पण मला त्याचा पत्ता लागला. मी बाबांना काही दिवस आमच्या बराकपूरच्या घरी राह्यला जातो म्हणालो, तेव्हा ते खूश झाले. आता मी तिकडेच चाललो आहे. तेवढी ताकद असती माझ्यात तर गंगेत जीवच दिला असता मी..." बोलता बोलता वेणूला रडू कोसळलं.

हरलालचं हृदय भरून आलं. वेणूचं कसं सांत्वन करावं हे त्याला कळेना. त्याचा हात हाती घेऊन तो म्हणाला, "काही खाऊन तरी आला आहेस का?"


"हो! पण आपल्याला जेवायचं नाही का?" वेणूनं विचारलं.

"नाही, हे पैसे मोजून तिजोरीत व्यवस्थित

ठेवल्याशिवाय मला इथून हलता येणार नाही,'' हरलाल म्हणाला.

वेणू म्हणाला, ''तुम्ही आधी जेवून घ्या. मला तुमच्याशी बरंच काही बोलायचं आहे. ताट वाढून आई तुमची वाट पाहते आहे.''

हरलालनं कसंबसं जेवण उरकलं. जेवण झाल्यावर तो वेणू बसला होता त्या खोलीत आला. पैशाच्या पिशव्या तिथेच पडल्या होत्या आणि ती तिघंजणं कितीतरी वेळ बोलत बसली. वेणूच्या आईच्या आठवणीही निघाल्या होत्या. मध्येच घड्याळाकडे बघत वेणू म्हणाला, ''चला, मला निघालं पाहिजे, नाहीतर माझी गाडी चुकेल.'' जाता जाता वेणूनं आपल्या अंगावरचे दागिने हरलालकडे ठेवायला दिले आणि तो म्हणाला, ''सध्या तुमच्याजवळ ठेवा, लागतील तेव्हा परत घेऊन



जाईन. ते माझ्या आईचे आहेत म्हणजे माझेच आहेत.''

हरलालनं ते सर्व दागिने एका चामड्याच्या बॅगेत ठेवले आणि ती बॅग पैशांच्या इतर बॅगांशेजारी तिजोरीत ठेवली.

तिजोरीची किल्ली उशीखाली ठेवून पैसे ठेवले होते त्याच खोलीत हरलाल झोपला. तो झोपेतही फार अस्वस्थ होता. त्याला वेडीवाकडी स्वप्नं पडत होती. दाराच्या पडद्याआडून वेणूची आई रागारागानं काही बोलते आहे, असा त्याला भास होऊ लागला. त्याला तिचा आवाज स्पष्टपणे ऐकू येत नव्हता, पण आवाजाबरोबरच तिच्या अंगावरील हिरे, माणकं, पाचूच्या दागिन्यांतून येणारे रंगीत किरण पडद्यातून घुसून बाहेर येत होते. हरलाल वेणूला हाक मारण्याचा प्रयत्न करत होता, पण काही केल्या त्याच्या घशातून आवाज फुटेना. इतक्यात मोठा आवाज झाला. दारावरचा पडदा फाटून गेला. हरलाल दचकून जागा झाला. आजूबाजूला काळोख होता. वाऱ्याच्या झोतानं खिडकीचे दरवाजे धडधडले आणि दिवा विझून गेला. हरलाल घामानं चिंब झाला. त्यानं दिवा लावला. घड्याळात पाहिलं तर सकाळचे चार वाजले होते. आता झोपण्यात अर्थ नव्हता. त्याला बाहेरगावी जायची तयारी करायला हवी होती.

हरलाल तोंड धुऊन आलेला पाहून आईनं विचारलं, ''उठलास बाबा?''

सकाळी उठल्या उठल्या आईला नमस्कार करायचा, असा हरलालचा रिवाज होता. हरलालला मनातल्या मनात आशीर्वाद देऊन आई म्हणाली, ''हरलाल, बाळा तू बायको आणायला चालला आहेस, असं मला स्वप्न पडलं. अरे, पहाटेची स्वप्नं काय खोटी होतात?''

हरलाल हसून आपल्या खोलीत गेला आणि तिजोरीतून पैशांच्या पिशव्या काढू लागला. परंतु – बाप रे!... त्याच्या हृदयाचे ठोके जणू बंदच पडले– पैशांच्या पिशव्यांपैकी तीन पिशव्या संपूर्ण रिकाम्या होत्या! आपल्याला भास होत असेल, असं वाटून त्यानं त्या तिजोरीवर आपटून पाहिल्या. पिशव्यांची तोंडं उघडून झाडल्यानंतर एका पिशवीतून दोन चिठ्ठ्या बाहेर पडल्या. दोन्ही वेणूच्या होत्या. एक वेणूनं आपल्या वडिलांना लिहिली होती आणि दुसरी हरलालला!

हरलालने घाईघाईनं चिठ्ठ्या उघडून पाहिल्या. हरलाल वाचू लागला, पण त्याला कसलाच बोध होईना. जणू काही हरलाल भाषा विसरून गेला होता! त्यानं दिव्याची वात मोठी केली. परंतु स्पष्ट असं काहीच कळत नव्हतं. तरीही पत्राचा मथितार्थ असा होता की, वेणू तीन हजाराच्या नोटा घेऊन विलायतेला निघाला होता. पहाटेच त्याची बोट सुटणार होती... 'वडिलांच्या पत्रात त्यांना सर्व स्पष्ट करून सांगितलंच आहे. ते कर्ज फेडतील, आणि आईचे जे दागिने मी तुमच्या कपाटात ठेवले आहेत, त्यांची किंमत मी घेतलेल्या पैशांपेक्षा कितीतरी जास्त आहे.' अशा शब्दांत वेणूनं पत्राचा शेवट केला होता.

हरलाल खोलीला कुलूप लावून भाड्याची गाडी करून घाईघाईनं गंगेच्या घाटावर निघाला. परंतु ज्या बोटीनं वेणू जाणार होता तिचं नावसुद्धा त्याला माहीत नव्हतं. मेटिया बुरजापर्यंत गेल्यावर हरलालला समजलं की, भल्या पहाटेच दोन बोटी इंग्लंडला रवाना झाल्या! त्यातल्या कोणत्या बोटीत वेणू होता याचा हरलालला कसा अंदाज करता येणार? आणि त्या बोटीपर्यंत तो पोचणार तरी कसा?

हरलाल परत घरी यायला निघाला तेव्हा उन्हं पडली होती. सगळं कलकत्ता शहर जागं झालं होतं. पण हरलालला काहीच धड दिसत नव्हतं; त्याच्या डोळ्यांपुढे अंधारी आली होती.

त्याला पाहून आईनं विचारलं, ''कुठे गेला होतास बाबा?''

''आई, तुझ्यासाठी सून आणायला गेलो होतो...''– असं शुष्क कंठानं म्हणता म्हणताच हरलाल बेशुद्ध होऊन पडला.

''अरे देवा!'' – म्हणत त्याच्या आईनं धावत जाऊन त्याच्या तोंडावर पाणी मारलं.

जरा वेळानं हरलाल शुद्धीवर आला. डोळे उघडून त्यानं सगळीकडे पाहिलं. आईला म्हणाला, ''घाबरू नकोस आई, मला जरा एकटंच बसू दे.''

खोलीत जाऊन हरलालनं दरवाजा आतून बंद करून घेतला. आईनं खोलीच्या दाराशीच बसकण मारली. फाल्गुन महिन्यातील कडक उन्हं तिच्या अंगावर पडली होती. खोलीच्या दारावर डोकं टेकून ती ''बाळा! बाळा!'' म्हणून हाका मारत होती.

नेहमीच्या वेळेला ऑफिसचा नोकर आला आणि हरलालला हाक मारत म्हणाला, ''बाबू! ताबडतोब निघालो नाही तर गाडी चुकेल.''

हरलाल आतूनच ओरडला, ''आज आपण रोजच्या वेळेला जाऊ शकणार नाही.''

''मग केव्हा जायचं?'' नोकरानं विचारलं.

हरलाल उत्तरला, ''ते मी तुला नंतर सांगेन.''

नोकर मान डोलवत, हात हलवत निघून गेला.

हरलाल मनाशी विचार करत राहिला. ही गोष्ट कोणाला सांगावी तरी चोरी! वेणूला तुरुंगात पाठवायचं?...

हरलालला दागिन्यांची आठवण झाली. आतापर्यंत तो दागिन्यांचं पूर्णपणे विसरून गेला होता. कुठेतरी आधार मिळाला असं वाटून त्यानं घाईघाईनं दागिन्यांची थैली घेतली, वेणूनं वडिलांना लिहिलेलं पत्र घेतलं आणि तो घराबाहेर पडला.

अधरबाबूंच्या घरी पोहोचण्यापूर्वी दुरूनच त्याला सनईचे सूर ऐकू आले. आज अधरबाबूंचा लग्नसमारंभ होता. पण आत डोकावताच त्याला समारंभाच्या उत्साहाबरोबरच एक विचित्र अस्वस्थता जाणवली. दरवाजावर कडक पहारा होता. नोकराचाकरांना बाहेर जाण्यास बंदी होती. सगळ्यांच्या चेहऱ्यावर भीतीचे व चिंतेचे भाव स्पष्ट दिसत होते. हरलालच्या कानावर आलं की, गेल्या रात्री घरातून बऱ्याच दागिन्यांची चोरी झाली होती. संशयावरून एकदोघा नोकरांना पोलिसांच्या ताब्यात दिलं जाणार होतं.

हरलाल दुसऱ्या मजल्यावर जाऊन बघतो तो अधरबाबू रागानं धुमसत होते. रतिकांत गुडगुडी ओढत होता. हरलाल अधरबाबूंना म्हणाला, ''मला आपल्याशी एकांतात काही बोलायचं आहे.''

अधरबाबू संतापून म्हणाले, ''मला तुमच्याशी एकांतात बोलायला अजिबात वेळ नाही. काय बोलायचं असेल ते इथेच बोला.''

हरलाल बहुधा काही कर्ज मागायला आला असणार असं त्यांना वाटत होतं.

रतिकांतनं सुचवलं, ''माझ्या पुढ्यात काही सांगायला हरलालला संकोच वाटत असेल तर मी इथून जातो बापडा!''

रतिकांत जायला निघाला, पण अधरबाबू ओरडले, ''ए, बैस इथं!''

बॅग पुढे करत हरलाल म्हणाला, ''काल रात्री वेणू माझ्याकडे हे ठेवून गेला...''

''काय आहे त्या बॅगेत?'' अधरबाबूंनी विचारलं.

''गुरुशिष्यांनी चांगलंच कारस्थान रचलंय!'' बॅगेत बघत अधरबाबू म्हणाले, ''तुला माहीत आहे, चोरीचा माल विकायला गेलास तर तुला पकडतील. माझ्याकडे आणून देऊन बक्षीस मिळवायचं आहे वाटतं!''

हरलालनं अधरबाबूंना वेणूचं पत्र दिलं. ते वाचून तर ते आणखी भडकून उठले. ते म्हणाले, ''मी पोलिसात वर्दी देईन. माझा मुलगा अजून सज्ञान झालेला नाही. तूच त्याला चोरी करायला शिकवून विलायतेला पाठवलं असणार. काय सांगावं, पाचशे रुपये देऊन त्याच्याकडून तीन हजाराची पावती घेतली असशील. मी मुळीच ते पैसे फेडणार नाही.''

हरलाल म्हणाला, ''मी त्याला पैसे कर्जाऊ दिले नाहीत.''

''मग त्याला इतके पैसे मिळाले कुठून, त्यानं काय तुमची तिजोरी फोडून पैसे घेतले?''

हरलाल गप्प बसला.

रतिकांत पुटपुटला, ''तीन हजार कशाला, पाचशे रुपये तरी त्यानं कधी पाहिले होते का विचारा त्याला!''

सगळ्या अपराधाचं ओझं स्वतःच्या डोक्यावर घेऊन हरलाल अधरबाबूंच्या घरातून बाहेर पडला. तो रस्त्यावर आला, तेव्हा त्याचं मन थिजून गेलं होतं. कसलं भय वाटून घेण्याचं किंवा विचार करण्याचं त्राणही त्याच्यात उरलं नव्हतं.

गल्लीत शिरता शिरता घरापुढे एक गाडी उभी असलेली त्याला दिसली. त्याला वाटलं वेणूच परत आला असावा. तो घाईघाईनं गाडीजवळ गेला. गाडीत ऑफिसचा एक इंग्रज साहेब बसला होता. हरलालला पाहून तो उतरला. हरलालचा हात धरून त्याच्याबरोबर घरात शिरत त्यानं विचारलं, ''आज गावाला का गेला नाहीस?''

सकाळी हरलालकडे आलेल्या नोकराला काही संशय आला होता, म्हणून त्यानं जाऊन मालकाला सांगितलं होतं.

हरलाल म्हणाला, ''तीन हजार रुपये सापडत नव्हते...''

"काय झालं नोटांचं?" साहेबानं विचारलं.

हरलाल काहीच न बोलता गप्प बसला.

"तू पैसे कुठे ठेवतोस दाखव बरं!" साहेब म्हणाला.

साहेबानं वर जाऊन पैसे मोजले. सगळ्या घराची झडती घेतली. आता मात्र हरलालच्या आईच्यानं राहावेना. तिनं रडकुंडीला येऊन साहेबासमोर हरलालला विचारलं, "हरलाल, काय झालंय रे?"

"आई, पैसे चोरीला गेले..." हरलालनं उत्तर दिलं.

"चोरीला गेले? कोणी केला रे हा सर्वनाश?" आई म्हणाली.

हरलाल म्हणाला, "आई, तू शांत रहा!"

साहेबानं उरलेले पैसे घेतले आणि हरलालला आपल्याबरोबर मोठ्या साहेबाकडे येण्यास सांगितलं.

आता मात्र आई त्या दोघांचा रस्ता अडवत म्हणाली, "माझ्या मुलाला कुठं नेता साहेब? पोटाला चिमटा घेऊन मी त्याला लहानाचा मोठा केलाय्... माझा मुलगा कधीही दुसऱ्याच्या पैशाला हात लावणार नाही."

हरलाल आईला म्हणाला "आई, तू काळजी करू नकोस. मी मोठ्या साहेबांना सगळं सांगून आता परत येतो."

"अरे बाळा, तू सकाळपासून काही खाल्लं नाहीस. थोडं खाऊन तरी जा!..." हरलालची आई कळवळून म्हणाली. पण त्यानं तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केलं आणि तो गाडीत बसून निघून गेला. दुःखानं विदीर्ण झालेली आई खाटेवर असहाय्यपणे पडून राहिली.

मोठ्या साहेबानं विचारलं, "खरं काय ते सांग, पैसे कुठे गेले?" पण काहीच न बोलता हरलाल फक्त, "मी पैसे घेतले नाहीत–" एवढंच सांगत राहिला.

साहेब म्हणाला, "तू पैसे घेणार नाहीस यावर माझा विश्वास आहे, पण कुणी घेतले हे तुला माहीत आहे का?"

काहीच उत्तर न देता हरलाल मान खाली घालून उभा राहिला.

"तुला कळून सवरून कुणी हे पैसे घेतले का?" साहेबानं चौकशी केली.

"माझ्या जिवात जीव असेपर्यंत असं कधीच घडणार नाही," हरलाल म्हणाला.

साहेब म्हणाला, "हरलाल, जामीन न मागता तुझ्यावर विश्वास ठेवून मी हे काम तुला दिलं. त्यासाठी ऑफिसमध्ये सगळ्यांचा विरोध पत्करला. तू मात्र मला खाली पाहायला लावलंस. आजचा सबंध दिवस मी तुला देतो. तीन हजार ही काही तशी फार मोठी रक्कम नाही. तू तीन हजार रुपये घेऊन आलास म्हणजे पूर्वीसारखं तुझं काम चालू होईल."

हरलाल मान खाली घालून ऑफिसच्या बाहेर पडला. त्यावेळेस अकरा वाजले होते. हरलालची अवस्था पाहून ऑफिसमधल्या इतर कारकुनांना खूप आनंद झाला.

'काय करू?... काय करू?...' हरलाल

स्वतःच्या मनाला परत परत तेच विचारत रणरणत्या उन्हात रस्तोरस्ती फिरत होता. उपाय सुचत नव्हता. त्याचं चालणं मात्र यांत्रिकपणे चालूच होतं.

हजारो लोकांना आश्रय देणारं कलकत्ता शहर त्याच्या दृष्टीनं एका घटकेत प्रचंड सापळ्यासारखं झालं होतं. त्याला कुणी ओळखत नव्हतं, कोणाच्या मनात त्याच्याविषयी तिरस्कार नव्हता, तरीही प्रत्येक माणूस आपला शत्रू आहे असं त्याला वाटत होतं. रस्त्यावर नेहमीची वर्दळ चालू होती. आजूबाजूचे लोक त्याला धक्के देऊन पुढे जात होते; ऑफिसातले कारकून बाहेर येऊन द्रोणातून पाणी पीत होते; पण त्याच्याकडे कोणाचंच लक्ष नव्हतं!

मैदानाच्या कडेला एक वाटसरू कपाळावर हात घेऊन झोपला होता. खटाऱ्यातून बायका कालीघाटावर चालल्या होत्या. एक माणूस पत्र घेऊन त्याच्याकडे आला व त्याला पत्ता विचारू लागला. अशा तऱ्हेनं दुपार संपत आली. हळूहळू एकामागून एक ऑफिसं बंद होऊ लागली. घराच्या दिशेनं गाड्या धावू लागल्या. ट्रॅममध्ये आपापल्या जागा पकडून सिनेमाच्या जाहिराती वाचत कारकून मंडळी घरी जाऊ लागली.

हरलालच्या मनात आलं, आता आपण कधीच या गर्दीचा हिस्सा होणार नाही. कामावाचून आपला दिवस जाणार. थकली भागली संध्याकाळ आपल्याला कधीच अनुभवायला मिळणार नाही. आता त्याला लवकर घरी पोहोचण्यासाठी घाईघाईनं ट्रॅम पकडण्याची गरज नव्हती. शहरातलं कामकाज, घरंदारं, सारे व्यवहार कधी हरलालला कठोर सत्यासारखे भेडसावत होते, तर कधी ते सारं त्याला स्वप्नवत् वाटत होतं.

रस्तोरस्ती गॅसचे दिवे पेटले. दिशादिशांत काळोख दबा धरून बसला होता. रात्र किती झाली याचा हरलालला पत्ता नव्हता. पोटात अन्नाचा कण नाही; कपाळाच्या शिरा ताड्ताड् उडत होत्या. विचार करून करून डोकं फुटायची वेळ आली होती. पायात चालण्याचं त्राण उरलं नव्हतं. मनाला एक सुन्नपणा आला होता. त्या सुन्नपणात एक नाव वारंवार ओठावर येत होतं, ''आई! आई! आई!'' आईच्या कुशीत शिरून झोपी जावं, ती झोप कधीच भंग पावू नये, असं हरलालला वाटत होतं.

घरी गेलं तर पोलीस येऊन आईसमोर आपला अपमान करतील, म्हणून तो घरी जायला धजत नव्हता. स्वतःच्या शरीराचं ओझं वाटण्याइतका जेव्हा तो दमला, तेव्हा त्यानं एक भाड्याची गाडी ठरवली.

''कुठं जायचं?'' गाडीवानानं विचारलं.

''खास असं कुठं नाही. या मैदानाभोवती हवा खात फिरायचं,'' हरलालनं उत्तर दिलं.

गाडीच्या खिडकीवर डोकं टेकून हरलालनं डोळे मिटले...

...हळूहळू त्याच्या साऱ्या वेदना नाहीशा होऊ लागल्या. शरीर, मनाला अपार शांतता लाभली. आता तो अवहेलना, दुःख, भीती या सर्वांच्या पार गेला होता. आता त्याला कोणीच, कोणत्याच बंधनात बांधून ठेवू शकणार नव्हतं. अधूनमधून डोळ्यापुढे साकार होणारी आईची मूर्ती इतकं विराट

रूप धारण करत होती की, कलकत्याचे रस्ते, घाट, घरंदारं, दुकानं एकामागून एक सारं तिच्यात गडप होत होतं. ती मूर्ती आभाळात भरून राहिली. हळूहळू त्यात नक्षत्रं वितळून गेली. हरलालच्या साऱ्या वेदना, जाणिवा, भावना, चेतना त्यात निःशेष होत होत पाण्याचा बुडबुडा फट्कन फुटावा तशा विरून गेल्या.

चर्चच्या घड्याळात एक वाजला. मैदानाभोवती गाडी फिरवता फिरवता गाडीवान थकून गेला आणि म्हणाला, ''बाबू, जनावर थकलं, त्याचं पाऊल उचलत नाही. तुम्हांला नक्की कुठं जायचंय सांगा.''

प्रश्नाला उत्तर मिळालं नाही म्हणून गाडीवान खाली उतरला. हरलालला हलवत त्यानं पुन्हा तेच विचारलं. काहीच उत्तर मिळालं नाही, तेव्हा गाडीवान घाबरला. त्यानं निरखून पाहिलं, हरलालचं शरीर थंड पडलं होतं. श्वासोच्छ्वास बंद झाला होता.

# ७. नवीन बाहुली

शिल्पकार गुणी केवळ मातीच्या बाहुल्या बनवत असे; आणि त्याही फक्त राजवाड्यातल्या मुलामुलींसाठी!

कित्येक वर्षं राजवाड्याच्या प्रांगणात बाहुल्यांची जत्रा भरत असे. त्यात अनेक कलावंत येत. सारे गुणीला मान देत असत.

शिल्पकार गुणी ऐंशी वर्षांचा झाला, त्याच वर्षी जत्रेत एक नवा कलावंत आला. त्याचं नाव किशनलाल! तो वयानं तरुण होता आणि बाहुल्या करण्याची त्याची पद्धतही नवीन होती.

तो ज्या बाहुल्या बनवत असे, त्यातल्या काही तो पूर्ण करत असे, तर काही अर्धवटच ठेवत असे. काहीना रंग देत असे, तर काही तशाच ठेवत असे. त्याच्याकडे बघताना वाटे, बाहुल्या बनविण्याचं या कलाकाराचं काम कधी संपणारच नाही; ते अव्याहत चालूच राहणार.

वयस्क कलावंत म्हणत, 'हे कसलं कौशल्य! ही स्पर्धा आहे की उद्धटपणा?'

परंतु नवीन काळात नावीन्याला मागणी असते. छोटी राजकन्यासुद्धा म्हणे, 'मला त्याचीच बाहुली हवी.'

'छीः! ती कसली बाहुली!' तिचा वृद्ध नोकर म्हणे. मग तर तिचा हट्ट वाढतच जाई.

म्हाताऱ्या गुणीच्या दुकानात आता पहिल्यासारखी गर्दी नसे. त्याच्या जुन्यापुराण्या बाहुल्या म्हणजे पैलतीरी जाण्यासाठी होडीच्या आशेनं घाटावर टक लावून बसलेल्या माणसांसारख्या असहाय्य वाटत.

एक वर्ष उलटलं, दोन वर्षं उलटली आणि मग म्हाताऱ्या गुणीचं नावसुद्धा सगळे विसरून गेले. राजप्रांगणात भरणाऱ्या बाहुल्यांच्या जत्रेत तो तरुण शिल्पकार किशनलाल आता प्रमुख ठरला.

म्हाताऱ्याचं मन मोडून गेलं. त्याचा वेळही जाता जाईना.

म्हाताऱ्याला एक विवाहित मुलगी होती. एके दिवशी ती त्याला म्हणाली, "बाबा, आता तुम्ही माझ्या घरी चला."

म्हाताऱ्या गुणीची मुलगी अष्टौप्रहर कामात व्यग्र असे. त्याचा जावई मातीचे दिवे बनवी आणि होडीत घालून ते शहरात विकायला घेऊन जाई.

काळ बदलला आहे, नवीन काळ आला आहे, ही गोष्ट म्हाताऱ्या गुणीला पटत नसे.

आपली नात वयानं वाढली, सोळा वर्षांची झाली हे तरी त्याला कुठे पटत होतं?

झाडाखाली बसून शेताची राखण करता करता म्हाताऱ्या गुणीला झोप लागे. अशा वेळी नात येऊन त्याच्या गळ्यात पडे. असं झालं की त्याचा आनंद गगनात मावेनासा होई. तो नातीचे हात हातात घेऊन म्हणे,

''माझे बाई, तुला काय पाहिजे?''

नात म्हणे, ''दादाजी, मला बाहुली करून द्या ना! मी तिच्याशी खेळेन.''

वृद्ध गुणी विचारी, ''अगं बाई, मी केलेली बाहुली तुला आवडेल का?''

नात म्हणे, ''तुमच्यापेक्षा चांगल्या बाहुल्या करणारा आहेच कोण?''

म्हातारा म्हणे, ''किशनलाल नाही का?''

नात उत्तर देई, ''छट्! किशनलालजवळ कुठं आहे एवढी कुशलता?''

त्या दोघांत असा संवाद कितीतरी वेळा होई. मग म्हातारा गुणी आपल्या झोळीतून माती बाहेर काढी. डोळ्यांवर चष्मा चढवे आणि नातीला म्हणे, ''बघ हं, शेताकडे लक्ष दे; नाहीतर पाखरं कणसं खाऊन जातील.''

नात म्हणे, ''काळजी करू नका दादाजी, मी लक्ष ठेवते.''

काळ जात असायचा. दूरच्या ओढ्याचं पाणी खळखळत असायचं. त्यातून जणू शब्द यायचे, 'नात पाखरं हाकलते, आजा बाहुली बनवतो'.

त्या दिवशी म्हातारा मन लावून बाहुली बनवत होता. मागून त्याची मुलगी त्याच्या दिशेनं हात ओवाळत आली. जवळ येऊन तिनं वडिलांना



हाक मारली. तशी डोळ्यांवरचा चष्मा काढून एखाद्या अजाण मुलासारखा म्हातारा लेकीकडे नुसता बघत राहिला.

मुलगी म्हणाली, ''बाबा, गाईची धार काढायची बाकी आहे आणि तुम्ही खुशाल सुभद्राबरोबर वेळ फुकट घालवत आहात. एवढ्या मोठ्या मुलीचं काय बाहुलीशी खेळायचं वय आहे?''

म्हातारा पटकन म्हणाला, ''सुभद्रा बाहुलीबरोबर खेळणार नाही. ती बाहुली राजवाड्यात नेऊन विकेल. तिचा नवरा तिला न्यायला येईल, तेव्हा तिच्या गळ्यात पुतळ्यांची माळ तर घालायला हवी ना! मी त्यासाठी पैसे जमवणार आहे.''

मुलगी हताशपणे म्हणाली, ''बाबा, ही बाहुली राजवाड्यात विकली जाईल का?''

म्हाताऱ्याच्या कपाळावर आठ्या चढल्या. तो चुपचाप बसला.

सुभद्रा आईकडे बघत काहीशा रोषानं म्हणाली, ''राजवाड्यात का म्हणून कोणी विकत घेणार नाही दादाजींची बाहुली?''

दोन दिवसांनंतर आईपुढे एक सोन्याची मोहर धरत सुभद्रा म्हणाली, ''हे दादाजींच्या बाहुलीचं दाम!''

आईनं विचारलं, ''सुभद्रा, तुला पुतळी कुठे मिळाली?''

सुभद्रा म्हणाली, ''राजवाड्यात जाऊन बाहुली विकून आले.''

म्हातारा म्हणाला, ''बाई! विकली गेली ना बाहुली? ... तरी तुझा आजा डोळ्यांनी नीट बघू शकत नाही; आणि अलीकडे त्याचे हातही कापतात.''

सुभद्राची आई खूश होऊन म्हणाली, ''सोळा मोहरा जमल्या की, सुभद्रासाठी माळ होईल पुतळ्यांची.''

म्हातारा म्हणाला, ''त्या लबाडीला तरी दुसरं काय हवंय?''

सुभद्रा म्हाताऱ्याच्या गळ्यात पडत म्हणाली, ''दादाजी, नवऱ्यासाठी नाही मी हे करत.''

म्हाताऱ्याला हसू आवरेना. हसता हसता त्याच्या डोळ्यांतून पाणी आलं.

जणू काही म्हाताऱ्याचं तरुणपण परतून आलं होतं! तो झाडाखाली बसून बाहुल्या बनवू लागला आणि सुभद्रा पाखरांना हाकलत शेताची राखण करू लागली.

विहिरीत खळखळणाऱ्या पाण्यातून शब्द येत, 'नात पाखरं हाकलते, आजा बाहुली बनवतो.'

एक एक करता करता सोळा पुतळ्या जमा झाल्या. माळ तयार झाली, तेव्हा सुभद्राची आई म्हणाली, ''आता हिच्यासाठी नवरा बघितलाच पाहिजे.''

सुभद्रा म्हाताऱ्याच्या कानात बोलली, ''दादाजी, नवरा चांगला आहे!''

म्हातारा अधीरपणे म्हणाला, ''सांग बाई, कुठं आहे तो?''

सुभद्रा सांगू लागली, ''त्या दिवशी मी तुम्ही केलेली बाहुली घेऊन राजवाड्यात गेले. तिथं द्वाररक्षकानं मला अडवलं. तो दरडावत म्हणाला, 'ए पोरी! काय पाहिजे तुला?' हातातली बाहुली दाखवत मी म्हटलं, 'मला ही बाहुली राजकन्येला विकायची आहे.' त्यावर तो म्हणाला, 'आता ही जुन्या पद्धतीची बाहुली राजकन्या घेणार नाही.' त्याचं बोलणं ऐकून मला रडूच कोसळलं. मी रडते आहे, असं पाहून एक माणूस जवळ आला आणि माझ्यापुढे हात करत म्हणाला, 'दे पाहू तुझ्या हातातली बाहुली! तिच्यात जरा फेरफार केले तर ती नक्कीच विकली जाईल.' दादाजी, तुम्ही जर त्या माणसाला पसंत केलंत तर मी त्याच्या गळ्यात माळ घालीन.''

म्हातारा उत्सुकतेनं म्हणाला, ''अगं, तो आहे तरी कुठे?''

नात म्हणाली, ''तो काय बाहेर पेरूच्या झाडाखाली उभा आहे.''

सुभद्रा आणि दादाजी बाहेर आले. बाहेर सुभद्राची आई होती; आणि पेरूच्या झाडाखाली किशनलाल उभा होता.

दादाजी आलेले पाहून किशनलालनं त्यांना नमस्कार केला.

सुभद्रा लाजून पदरानं तोंड झाकून उभी होती.

किशनलालला आशीर्वाद देत दादाजी म्हणाले, ''पोरा, तू मला नवी बाहुली दिलीस, पण माझी ही लाख मोलाची पुतळी घेऊन चाललास!''

दादाजींच्या गळ्यात हात टाकत सुभद्रा म्हणाली, ''दादाजी, मी एकटी नाही जाणार, तुम्हांलाही घेऊन जाणार!''



# ८. नयनजोडचे ठाकूर

नयनजोडचे जमीनदार एके काळी बाबू म्हणून विशेष प्रख्यात होते. मात्र ही बाबूगिरी त्यांना सहजासहजी मिळत नसे. राजा किंवा रायबहादूर किताब मिळवण्यासाठी जसा मेजवान्या, नाचगाणी, घोडदौडी यासाठी सढळ हातानं पैसा खर्च करावा लागतो, तसाच 'बाबू' ही उपाधी सर्वसाधारण लोकांकडून मिळविण्यासाठी करावा लागे.

नयनजोडचे हे जमीनदार त्यांच्या चैनी, विलासी राहणीबद्दल फार प्रसिद्ध होते. त्यांची मिजास एवढी की, ढाक्क्याच्या मलमलीचे काठ त्यांना टोचत, म्हणून ते काठ फाडून टाकत. लाख रुपये खर्च करून ते आपल्या मांजरांचा लग्नसमारंभ साजरा करत. एकदा म्हणे कुण्या एका बाबूनं कुठल्याशा उत्सवात रात्रीचा दिवस करण्यासाठी हजारो दिवे पाजळले आणि आकाशात चांदीच्या जरीचे तंतू उधळून सूर्यकिरणांचा भास निर्माण केला.

एवढं करूनही त्यांची ही बाबूगिरी वंशपरंपरेने टिकून राहत असे असं मुळीच नव्हे! अनेक वातींच्या समईतलं तेल समईनंच पिऊन अंधकार व्हावा, तशी या लोकांची गत होती.

आमचे कैलासचन्द्र रायचौधुरी हे या नयनजोडच्या जमीनदारांचा शेवटचा तंतू. ते जन्माला आले तेव्हाच समईतलं तेल पार तळाशी गेलेलं. पुढे त्यांचे वडील वारल्यानंतर त्यांचा श्राद्धविधी त्यांनी इतक्या धामधुमीनं आणि बडेजावानं साजरा केला, की लगेचच लोकांत जाहीर झाली ती नयनजोडच्या जमीनदारांची दिवाळखोरी!



सगळी इस्टेट त्यांना कर्जापायी विकावी लागली. जी काय थोडीफार शिल्लक राहिली तिच्यावर पूर्वीच्या वैभवाचा देखावा करणं कठीण होतं.

त्यामुळे कैलासबाबू नयनजोड सोडून, आपल्या मुलाला घेऊन कलकत्त्याला राहायला आले. त्यानंतर तो मुलगाही एका मुलीला मागे ठेवून कैलासवासी झाला. आता कैलासबाबू आणि ती नात असे दोघंच उरले.

कलकत्त्यात कैलासबाबू आमचे शेजारी होते. आमच्या कुटुंबाची हकिगत त्यांच्या अगदी उलट होती. माझ्या वडिलांची सगळी संपत्ती स्वकष्टार्जित होती आणि गरज असल्याशिवाय आपण एकही पैसा खर्च करत नाही याचा त्यांना अभिमान वाटत असे. ते कष्टकरी माणसासारखे कपडे करत आणि त्यांचे हातही कष्टकरी माणसाचेच होते. 'बाबू' ही उपाधी आपल्या नावामागे लावण्याची लालसा त्यांनी कधीच धरली नव्हती. आणि त्याबद्दल मला त्यांचा नेहमी अभिमानच वाटत असे. मी त्यांचा एकुलता एक मुलगा होतो. त्यांनी मला चांगलं शिक्षण दिलं होतं. आयुष्यभर मानानं जगता येईल एवढा पैसा मला कष्टाविना आयता मिळाला, हे मी माझं भाग्य समजत होतो. गेलेल्या दिवसांतील वैभवाच्या पोकळ आठवणी पेटीत जपून ठेवण्यापेक्षा कामाचे कागद जपून ठेवणं मला जास्त महत्त्वाचं वाटत होतं.

आणि म्हणूनच, आपल्या पूर्वीच्या वैभवाच्या बुडालेल्या बँकेच्या नावावर कैलासबाबू लंबेचवडे चेक चालवायचा प्रयत्न करत तेव्हा मला अतिशय राग येत असे. माझे वडील शारीरिक कष्ट करून पैसे मिळवत असल्यानं कैलासबाबू आम्हांला कमी लेखतात, ही गोष्ट तर मला असह्य होत असे.

माझ्याखेरीज कैलासबाबूंचा कोणीच एवढा तिरस्कार करत नसे. खरं म्हणजे इतका निरुपद्रवी आणि सीधासाधा माणूस सापडणं कठीणच! ते लोकांच्या सुखदुःखाच्या प्रसंगी नेहमी उपस्थित राहत. शेजाऱ्यांच्या सर्व समारंभांत सहभागी होत. लहानापासून म्हाताऱ्यांपर्यंत सर्वांची ते अगदी आस्थेनं, हसतमुखानं विचारपूस करीत. कोणीही भेटलं, की त्यांची प्रश्नांची सरबत्ती चालू– 'ठीक आहात ना? शशी ठीक आहे ना? आमचे दादा कसे आहेत? मधुच्या मुलाला ताप आल्याचं ऐकलं होतं, आता कसं आहे त्याचं? आणि हरीचरणबाबू? त्यांना तर फार दिवसांत पाहिलं नाही. ते ठीक आहेत ना? आणि राखालचं काय चाललंय? आणि हो तुमच्या घरातली बायकामंडळी?' – वगैरे वगैरे.

कैलासबाबूंना स्वच्छतेची आणि नीटनेटकेपणाची मोठी आवड. त्यांच्याकडे कपडेलत्ते फारसे नव्हते, तरीही त्यांचा पोशाख अगदी नीटनेटका असे. ते रोज आपले भारी कपडे उन्हात घालत असत. अंथरुणावरील चादरी, बसायच्या सतरंज्या, गालिचे साऱ्यांना ऊन दाखवत आणि सगळे कपडे ब्रशनं साफसूफ करून घडी करून ठेवत. आपल्या छोट्याशा खोलीत त्यांनी होत्या त्या वस्तूंची घासूनपुसून अशी छान मांडणी केली होती, की ते पाहून वाटे, त्यांच्याजवळ सजावटीसाठी अजून बरंच काही असावं.

नोकरचाकर नसल्यामुळे पुष्कळ वेळा ते घराचं दार बंद करून स्वतःच आपल्या हातानं धोतर चुणून ठेवीत आणि उपरणं व सदऱ्यांच्या चापूनचोपून घड्या करीत. जमीनदारीच्या काळातील अनेक मौल्यवान वस्तू घराबाहेर गेल्या होत्या; पण चांदीची गुलाबदाणी, अत्तरदाणी, सोन्याची थाळी, चांदीचा हुक्का, भारीपैकी शाल, त्या काळातले भरजरी अंगरखे आणि पगडी अशा काही वस्तू त्यांनी प्रयत्नपूर्वक वाचवून ठेवल्या होत्या. वेळप्रसंगी ते त्या वापरत; त्यामुळे नयनजोडच्या जमीनदारांची अब्रू राखली जाई.

कैलासबाबू एरवी अगदी साधा माणूस होता. कधीमधी त्यांच्या बोलण्यात जो अभिमान डोकावत असे, तो त्यांच्या वाडवडिलांबद्दलच्या कर्तव्यबुद्धीमुळे आहे हे ओळखून, तो सहन करतच अनेकदा लोक त्यांची स्तुतीही करत.

गावातले लोक त्यांना 'ठाकूरदा' म्हणत. त्यांच्या घरी लोकांची नेहमी ये-जा असे. गरिबीमुळे त्यांना हुक्क्यासाठी लागणाऱ्या तंबाखूचा खर्च झेपत नसे. मग गावातले लोक त्यांच्यासाठी एक-दोन शेर तंबाखू घेऊन जात आणि म्हणत, 'ठाकूरदा, जरा या तंबाखूची परीक्षा करा. गयेचा अस्सल तंबाखू आहे.' अशा वेळी एक-दोन झुरके मारून, 'छान आहे! छान आहे!' म्हणत कैलासबाबू विचारत, 'मी तुम्हांला साठ-पासष्ट रुपये शेराच्या तंबाखूची गोष्ट सांगतो, तुम्हांला त्याचा आस्वाद घ्यायचाय का?'

सगळे जाणून होते की, आपण जर तंबाखू ओढण्याची इच्छा दर्शवली, तर ह्यांना कपाटाच्या किल्ल्या सापडणार नाहीत किंवा मग बरीच शोधाशोध करून ते सांगणार, की त्यांचा जुना नोकर– गणेश– वस्तू कुठं ठेवतो त्याचा पत्ताच नसतो! आणि गणेशलाही ते सर्व मान्य असणार– त्यामुळे सगळे म्हणत, 'ठाकूरमहाशय, राहू दे! नाहीतरी आम्हांला तो तंबाखू सोसणार नाही. आम्हांला हाच बरा.'

यावर ठाकूरदा किंचित हसत. मंडळी जायला निघाली की त्यांचा निरोप घेताना म्हणत, 'अरे, तुम्ही आमच्याकडे जेवायला केव्हा येणार भाई?'

जायला निघालेली माणसं म्हणत, 'एकदा केव्हा तरी ठरवून कळवू तुम्हांला.'

मग ठाकूरदा म्हणत, 'हो, तेही बरोबरच! जरा पाऊस पडून थंडावा येऊ दे... अशा उकाड्यात जड जेवण पचणार नाही.'

पाऊस पडायला लागला तरी ठाकूरदांना त्यांच्या आमंत्रणाची कोणी आठवण करून देत नसे आणि दिलीच कोणी करून तर बाकीचे म्हणत, 'छे! छे! पाऊस थांबल्याशिवाय काही जमणार नाही.'

छोट्या घरात राहणं त्यांच्या इभ्रतीला शोभणारं नव्हतं. त्यांना ते त्रासदायक होत होतं हे तर सगळ्यांना कळत होतं. भाड्याचं चांगलं घर कलकत्त्यात कुठं शोधूनही मिळत नव्हतं, याबद्दलही कोणी शंका घेत नसे. मग ठाकूरदाच म्हणत, 'जाऊ दे भाई, तुमच्याजवळ राहण्यातच मला आनंद आहे! नयनजोडचा मोठा वाडा आहेच की! पण तिकडे जावंसं वाटत नाही.'

ठाकूरदा सगळं जाणून होते. पूर्वीचं

नयनजोडचं वैभव ते वर्तमानकाळात असल्याचा भास निर्माण करत होते. इतरांनाही ते समजत होतं. जणू काही उभयपक्ष परस्परांची फसवाफसवी करत होते! पण हे सारं स्नेहाचं आणि प्रेमाचं लक्षण आहे, हेही साऱ्यांना कळत होतं.

मला मात्र या साऱ्या प्रकाराचा राग येई! मी लहान असूनही त्यांचं हे ढोंग एकदा उघडकीला आणावं, असं मला फार वाटे. वास्तविक कैलासबाबू काही तसे मूर्ख, निर्बुद्ध नव्हते. कामकाजात, व्यवहारात लोक त्यांचा सल्ला आवर्जून घेत; पण नयनजोडच्या वैभवाबद्दल बोलताना मात्र त्यांना ताळतंत्र राहत नसे. त्यांनी कितीही अतिरंजित गोष्टी सांगितल्या, तरी सारे ऐकून घेत. त्यामुळे त्यांच्या बढायांना सीमाच राहत नसे. त्यांची गंमत करण्यासाठी कुणी नयनजोडचं अतिशयोक्त वर्णन करू लागलंच, तर तेही ते खरं मानत! आपल्यावर कुणाचा विश्वास बसत नसेल असा संशय त्यांना स्वप्नातसुद्धा येत नसे.

कधी कधी मला वाटे, की या म्हाताऱ्यानं स्वतःभोवती गतवैभवाचा एक कोट उभा केला आहे. मनात येई की, तोफा डागून हा कोट उद्ध्वस्त करावा! मला कैलासबाबूंबद्दल असं वाटण्यालाही काही कारण होतं.

मी श्रीमंताचा मुलगा असून विद्यासंपन्न म्हणजे एम. ए. होतो. मी तरुण असून मला कोणतंही व्यसन नव्हतं, की वाईट सवयी जडल्या नव्हत्या. वडिलांच्या मृत्यूनंतर सगळा कारभार हाती येऊनही मी सरळमार्गी होतो. दिसायला असा होतो, की स्वतःला सुंदर म्हटलं तर त्यात कुणाला बढाई वाटू नये, की पोकळ अहंकार वाटू नये!

एकूण काय तर बंगालमध्ये लग्नाच्या बाजारात माझा भाव चांगलाच होता आणि त्याला अनुसरूनच पुरेपूर वागायचं असं मी ठरवलं होतं. श्रीमंत बापाची, सुंदर, शिकलेली मुलगी वधू म्हणून मी पसंत करणार होतो. पुष्कळ वधुपिते माझ्या मागे लागले होते, पण अजून माझ्या पसंतीला कोणतीच मुलगी उतरलेली नव्हती.

ठाकूरदांना एक नात होती. मी तिला खूप वेळा पाहिली होती. ती सुंदर आहे असं मला कधीच वाटलं नाही. तिच्याशी लग्न करण्याचे विचारही कधी माझ्या मनात आले नाहीत आणि तरीही ठाकूरदांनी कुणाच्यातरी मध्यस्थीनं, अर्थात स्वतः येऊन आपल्या नातीसाठी मला विचारावं, विनंती करावी अशी सुप्त इच्छा माझ्या मनात होती.

ठाकूरदा आपल्या कोणा मित्राकडे बोलल्याचं माझ्या ऐकण्यात होतं की, नयनजोडचे जमीनदार आपल्या मुलीसाठी मुलाकडे आपणहून प्रस्ताव घेऊन जात नाहीत. मग भले मुलगी आजन्म अविवाहित राहिली तरी आपणहून हा कुळाचार ते मोडणार नाहीत!

हे ऐकून तर मला ठाकूरदांच्या वृथाभिमानाचा भयंकर राग आला आणि त्यांना एकदा चांगला धडा शिकवावा, असं वाटलं.

आमच्या माहितीत एक निवृत्त डेप्युटी मॅजिस्ट्रेट होते. ते ठाकूरदांना चढवून सांगत की, जेव्हा जेव्हा ते गव्हर्नरना म्हणजे छोट्या

लाटसाहेबांना भेटतात, तेव्हा तेव्हा लाटसाहेब आवर्जून सांगतात की, 'या बंगाल प्रांतात वर्धमानचे राजे आणि नयनजोडचे जमीनदारबाबू ही दोनच काय ती खानदानी घराणी आहेत!'

हे ऐकून ठाकूरदा खूश होत असत. जेव्हा जेव्हा माझी किंवा डेप्युटीबाबूंची ठाकूरदांशी भेट होई, तेव्हा तेव्हा ते चौकशी करत, 'छोटे लाटसाहेब कुशल आहेत ना? मेमसाहेब नि त्यांची मुलं कशी आहेत?' ...लवकरच लाटसाहेबांना भेटायला जायचं आहे, असंही ते म्हणत; पण ही गोष्ट कधीच प्रत्यक्षात येणार नाही, हे आम्हांला माहीत होतं.

एके दिवशी सकाळीच मी ठाकूरदांकडे गेलो आणि त्यांना हळूच सांगितलं की, 'मी काही कामासाठी गेलो असता मला लाटसाहेब भेटले. त्यांनी नयनजोडच्या जमीनदारबाबूंची गोष्ट काढली, तेव्हा तुम्ही कलकत्त्यात असल्याचं मी त्यांना सांगितलं. इतक्या जवळ असूनही तुमची भेट नाही याचं त्यांना फार दुःख झालं! ते आज दुपारी गुपचूप तुम्हांला भेटायला येणार आहेत.'

दुसऱ्यासंबंधीची अशी एखादी गोष्ट कैलासबाबूंना अशक्य वाटली असती आणि त्यांनी ती हसण्यावारी नेली असती. पण हे सारं स्वतःबद्दल असल्यामुळे त्यांना ते अजिबात खोटं वाटलं नाही. ते खूश झाले, तसेच अस्वस्थही झाले. लाटसाहेबांना कुठं बसवायचं, त्यांना काय द्यायचं, नयनजोडच्या जमीनदारीचा आब कसा राखायचा, काही सुचेनासं झालं. शिवाय त्यांना इंग्रजी येत नव्हतं; त्यामुळे संवाद कसा साधायचा हा एक मोठा प्रश्न होताच.

मी म्हटलं, ''त्याची तुम्ही काळजी करू नका. त्यांच्याबरोबर एक दुभाष्या असतोच, पण त्यांची खरीखुरी इच्छा अशी आहे की, तुमच्या दोघांच्या भेटीच्या वेळी तिथं कोणी उपस्थित नसावं.''

दुपारच्या वेळी बहुतेक लोक ऑफिसला गेले होते आणि घरी होते ते वामकुक्षी घेत होते. सर्वत्र सामसूम होती. अशा वेळी कैलासबाबूंच्या घराशी एक घोडागाडी येऊन थांबली. जरतारी पोशाख केलेल्या एका चपराशानं येऊन सांगितलं, ''लाटसाहेब आले आहेत.''

जुन्या काळातले कपडे आणि पगडी घालून कैलासबाबू लाटसाहेबांच्या स्वागताच्या तयारीतच होते. गणेशलाही त्यांनी आपले कपडे घालायला देऊन व्यवस्थित सजवलं होतं. लाटसाहेब आल्याचं ऐकताच ते धापा टाकत, धावतच दाराशी आले; आणि इंग्रजी पद्धतीचा वेश परिधान केलेल्या माझ्या एका मित्राला लाटसाहेब समजून अदबीनं घरात घेऊन गेले.

घरात खुर्चीवर एक भारी शाल टाकली होती, त्यावर त्यांनी त्या खोट्या लाटसाहेबाला नेऊन बसवलं; आणि उर्दू भाषेतलं एक लांबलचक मानपत्र स्वतः वाचून दाखवलं. लाटसाहेबांना नजराणा म्हणून त्यांनी सोन्याच्या थाळीतून पराकाष्ठेनं जतन करून ठेवलेला वडिलार्जित अश्रफींचा हार अर्पण केला. गणेश गुलाबदाणी, अत्तरदाणी घेऊन हजर होताच.

कैलासबाबू परत परत काकुळतीला येऊन सांगत होते, ''आपण नयनजोडच्या वाड्यात आला

असतात तर आपलं यथायोग्य स्वागत करता आलं असतं. इथे कलकत्त्यात मीच नवखा! पाण्याबाहेर फेकल्या गेलेल्या माशासारखीच माझी अवस्था!...'' वगैरे वगैरे.

इंग्रजी पद्धतीची भलीमोठी टोपी घातलेला माझा मित्र परत परत माना डोलावत बसला होता. घरात गेल्यावर डोक्यावरची टोपी काढायची हा इंग्रजी रिवाज; पण आपलं सोंग उघडकीला येईल या भयानं त्यानं ती काढली नव्हती. ठाकूरदा आणि



त्यांचा वृथाभिमानी नोकर गणेश यांच्याशिवाय आणखी कुणी असतं, तर हे ढोंग त्याच्या नक्की लक्षात आलं असतं!

माझा मित्र दहा मिनिटं मान हलवत राहिला. मग मात्र तो उठला. ठरल्याप्रमाणे सोन्याची थाळी, अश्रफींचा हार, खुर्चीवरची शाल, गणेशच्या हातातील अत्तरदाणी, गुलाबदाणी सारं पट्टेवाल्याकरवी गाडीत नेऊन ठेवण्यात आलं. लाटसाहेबांची ही प्रथा कैलासबाबूंना परिचितच होती. मी जवळच्या खोलीत लपून बसून सारं काही पाहत होतो. हसू दाबून धरणं मला आता अगदी अशक्य झालं होतं.

शेवटी पोटभर हसून घेण्यासाठी मी जरा दूरच्या खोलीत पळालो. समोर पाहिलं तर एका चौपाईवर आडवी पडून एक मुलगी स्फुंदून स्फुंदून रडत होती. मला अचानक हसत हसत आत आलेला पाहून ती रुद्ध कंठानं पण रागारागानं म्हणाली, "माझ्या आजोबांनी तुमचं काय वाईट केलं होतं? तुम्ही त्यांची का म्हणून फसवणूक करताय? का आलात तुम्ही?" शेवटी बोलणं अशक्य झालं, तेव्हा आपल्या तोंडात पदराचा बोळा कोंबून ती रडू लागली.

माझं हसू कुठल्या कुठे गेलं. मी जे काय केलं होतं, त्यात निव्वळ थट्टा नव्हती हे त्या क्षणी माझ्या ध्यानात आलं. मी अगदी नाजूक ठिकाणी घाव घातला होता. मी शरमिंदा झालो. पश्चात्तापानं अर्धमेला झालो. पेकाटात लाथ बसलेल्या कुत्र्यासारखा मी मुकाट्यानं खोलीबाहेर गेलो! खरोखरच त्या वृद्धानं माझं काय वाकडं केलं होतं? त्याचा अहंकार तसा कोणालाच त्रासदायक नव्हता! माझ्या उद्धटपणानं मात्र चांगलंच हिंसक रूप घेतलं होतं!

आणखी एका बाबतीतही माझे डोळे चांगलेच उघडले. वराची वाट पाहत थांबलेली एक मुलगी एवढीच माझी तिच्याकडे पाहण्याची दृष्टी होती. आज प्रथमच मला सुखदुःखांनी ओढाताण झालेल्या तिच्या कोमल हृदयाची जाणीव झाली.

सबंध रात्रभर मला नीटशी झोप लागली नाही. दुसऱ्या दिवशी सकाळीच ठाकूरदांच्या सगळ्या वस्तू घेऊन मी गुपचूप त्यांच्या घरी गेलो. नोकराच्या हातात सर्व जिन्नस ठेवण्याचा माझा विचार होता.

नोकर दिसला नाही म्हणून मी चाहूल घेऊ लागलो. शेजारच्याच खोलीत ठाकूरदा आणि कुसुम यांच्यात गप्पागोष्टी चालल्या होत्या. कुसुम मोठ्या प्रेमानं विचारत होती, "आजोबा, काल लाटसाहेब तुम्हांला काय म्हणाले?" ठाकूरदा लाटसाहेबांनी न केलेली नयनजोडच्या जमीनदारांची स्तुती मोठ्या खुशीत येऊन कुसुमला ऐकवीत होते आणि कुसुमही ते ऐकून खोटा आनंद दाखवीत होती.

आपल्या वृद्ध आजोबांचं मन सांभाळण्याची ती करुण धडपड पाहून मला अतिशय दुःख झालं. माझ्या डोळ्यांत अश्रू आले. मी बराच वेळ नुसताच उभा राहिलो. ठाकूरदा तेथून निघून गेल्यावर मी कुसुमजवळ आलो व सर्व वस्तू मुकाट्यानं तिच्यापुढे ठेवल्या.

एरवी ठाकूरदा समोर आले असते, तर माझ्या नेहमीच्या रिवाजाप्रमाणे मी त्यांना बिलकूल प्रणाम केला नसता. परंतु आज मी त्यांना प्रणाम केला. हा लाटसाहेबांच्या आगमनाचा प्रभाव असावा, असंही त्यांना वाटलं असण्याची शक्यता आहे. त्यादिवशी ठाकूरदा लाटसाहेब काय काय बोलले ते अगदी रंगवून सांगत होते. तेही मी मुकाट्यानं ऐकून घेतलं.

सगळीजणं तिथून गेल्यानंतर मी लाजत लाजत कुसुमशी लग्न करण्याची इच्छा प्रदर्शित केली. मी म्हटलं, ''नयनजोडच्या घराण्याशी माझ्या घराण्याची तुलना होणार नाही, पण...''

ठाकूरदांनी आनंदातिशयानं मला मिठी मारली. ते म्हणाले, ''मी गरीब माणूस...! माझं भाग्य एवढं थोर असेल असं मला वाटलं नव्हतं! कुसुमचं नशीब थोर म्हणून तुम्ही आपणहून लग्नाचं विचारलंत.'' बोलता बोलता त्यांच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रू ओघळू लागले.

आपल्या घराण्याचा मोठेपणा विसरून ठाकूरदांनी आज प्रथमच आपली गरिबी बोलून दाखवली होती. माझ्या घराण्याशी नातं जोडण्यात त्यांना मुळीच कमीपणा वाटला नाही.

# ९. अतिथी

काठालियाचे जमीनदार मतिलालबाबू होडीतून सहकुटुंब आपल्या गावी चालले होते. वाटेत मध्यान्हीच्या वेळी एका धान्याच्या कोठाराजवळ होडी बांधून स्वयंपाकाची व्यवस्था करीत असता पंधरा-सोळा वर्षांचा एक ब्राह्मणाचा मुलगा आला आणि त्यानं विचारलं, ''बाबू, तुम्ही कोठे जात आहात?''



मतिबाबू म्हणाले, ''काठालियाला.''

''मला वाटेत नंदीग्रामला सोडू शकाल का?'' मुलानं विचारलं.

''हो! सोडतो,'' मतिलालबाबू म्हणाले.

''तुझं नाव काय बाळ?'' त्यांनी विचारलं.

''माझं नाव तारापद,'' मुलानं उत्तर दिलं.

मुलगा दिसायला अगदी गोरापान आणि देखणा होता. मोठे मोठे डोळे आणि हसतमुख चेहरा. एकंदरीत मुलगा मोठा राजस दिसत होता. एका मळकट धोतराशिवाय त्याच्या अंगावर दुसरं वस्त्र नव्हतं. परंतु एखाद्या कुशल शिल्पकारानं घडवावं इतका तो रेखीव आणि डौलदार होता. जणू तेजस्वी रूप धारण करून आलेला पूर्वजन्मीचा कुणी तपस्वीच!

मतिलालबाबूंनी मोठ्या प्रेमानं त्याला सांगितलं, ''बाळा, तू स्नान करून ये. तुझं जेवण वगैरे सारं इथेच होईल.''

तारापद 'बरं' म्हणाला आणि लगेचच त्यानं पुढे होऊन स्वयंपाकाच्या कामात मदत करायला सुरुवात केली. मतिलालबाबूंचा नोकर होता उत्तर हिंदुस्थानी. मांसमच्छी बनविण्याचं काम त्याला तितकंसं जमत नसे. तारापदनं ते काम आपल्या हाती घेऊन पुरं करून टाकलं. एवढंच नव्हे, तर त्यानं एक-दोन भाज्याही बनवल्या. स्वयंपाकाचं काम संपल्यावर तारापदनं नदीत स्नान केलं आणि

आपल्या जवळच्या गाठोड्यातील एक शुभ्र वस्त्र तो नेसला. एक फणी घेऊन त्यानं आपले केस विंचरून मानेपर्यंत सोडले, छातीवर रुळणारं जानवं स्वच्छ पुसलं आणि तो मतिलालबाबूंकडे आला.

मतिलालबाबू त्याला नौकेत घेऊन गेले. तिथे त्यांची पत्नी आणि नऊ वर्षांची मुलगी बसली होती. तारापदसारख्या सुंदर मुलाला पाहून मतिलालबाबूंची पत्नी अन्नपूर्णा हिला मोठं आश्चर्य वाटलं! तिच्या मनात आलं, 'अहाहा! कोणाचा असेल हा मुलगा? कुठून आला असेल? आणि याच्या आईनं याला एकट्याला सोडलं तरी कसं?'

जेवणाच्या वेळी मतिलालबाबू आणि तारापद दोघांची पानं जवळजवळ मांडली होती. तो मुलगा फारसा भोजनप्रेमी दिसत नव्हता. अन्नपूर्णाला वाटलं तारापद लाजत असेल, म्हणून ती त्याला जेवायचा आग्रह करू लागली. पण पोट भरल्यावर तो तिच्या आग्रहाला बळी पडला नाही. तारापद प्रत्येक गोष्ट स्वतःच्या इच्छेनुसार करणारा होता. मात्र कोणतंही काम करताना तो त्याचं अवडंबर न माजवता अगदी सहजपणे करत होता. तसंच त्याच्या स्वभावात नसता लाजरेपणाही नव्हता.

जेवणं आटोपल्यावर अन्नपूर्णानं त्याला जवळ बसवलं आणि चौकशी करून त्याची हकिगत जाणून घेण्याचा प्रयत्न केला; पण तिला फारशी माहिती मिळू शकली नाही. फक्त तिला एवढंच समजलं की, सात-आठ वर्षांचा असतानाच तो घरातून पळाला होता.

अन्नपूर्णानं विचारलं, ''तुला आई नाही का?''

''आहे,'' तारापदनं उत्तर दिलं.

अन्नपूर्णानं प्रश्न केला, ''तिला तू आवडत नाहीस का?''

तारापदला हा प्रश्न विचित्र वाटला. तो हसत हसत म्हणाला, ''का नाही आवडणार?''

अन्नपूर्णानं विचारलं, ''मग तू तिला सोडून कसा आलास?''

तारापद म्हणाला, ''तिला आणखी चार मुलं आणि तीन मुली आहेत.''

अन्नपूर्णा आश्चर्य वाटून म्हणाली, ''अगंबाई! मग काय झालं! हाताला पाच बोटं असतात म्हणून काय एक बोट कापून टाकायचं?''

तारापद वयानं लहान होता. त्याचा पूर्वेतिहासही त्रोटक होता. पण लहान वयातच तो काहीसा प्रौढ झालेला होता. एकंदरीत हा मुलगा काही वेगळाच होता. तो आईवडिलांचा चौथा मुलगा. बालपणात वडिलांचं छत्र हरवलेलं, घरात भावंडं खूप. पण तारापद सगळ्यांचा आवडता. आई, भाऊ, बहिणी, शेजारीपाजारी सर्वांचा त्याच्यावर लोभ होता. इतकंच काय, त्याचे शिक्षकही कधी त्याला मारत नसत; आणि कधी मारलंच तर सगळ्यांनाच फार वाईट वाटत असे. असं असताना त्याला घर सोडून जाण्याचं काही कारणच नव्हतं. पण तरीही हा सगळ्यांचा आवडता मुलगा जात्रावाल्यांत सामील होऊन गाव सोडून गेला होता.

सर्वांनी शोधाशोध करून परत त्याला गावी आणलं. त्याच्या आईनं त्याला हृदयाशी कवटाळून

अश्रूंनी न्हाऊ घातलं. बहिणी रडू लागल्या. त्याच्या मोठ्या भावाला, घरातला कर्ता पुरुष या नात्यानं त्याला छोटीशी शिक्षा करावीशी वाटत होती, पण त्याला स्वतःलाच पश्चात्ताप होऊन उलट त्यानं तारापदला काही बक्षीस दिलं. शेजारपाजारच्या, घराघरांतल्या स्त्रियांनी त्याला बोलावून त्याचं कौतुक केलं, अनेक आमिषं दाखवून त्याला घरी डांबून ठेवण्याचा प्रयत्न झाला. पण त्या प्रेमाच्या बंधनालाही तो बधला नाही. त्याच्या जन्मनक्षत्रानंच त्याला गृहहीन करून सोडलं होतं.

तो जेव्हा नदीकाठी जाई, तेव्हा त्याला नदीतून परगावच्या होड्या जाताना दिसत. परप्रांतातून आलेला एखादा संन्यासी गावाबाहेर अश्वत्थ वृक्षाखाली आश्रय घेऊन बसलेला दिसे, किंवा लमाणी लोक नदीतीरावर मोकळ्या जागी चटयांचे तंबू उभे करताना दिसत. अशा वेळी अनोळखी बाह्य जगातल्या स्नेहहीन स्वातंत्र्याच्या ओढीनं त्याचं चित्त भडकून उठे.

त्यानंतर त्यानं दोन-तीनदा पळून जायचा प्रयत्न केला, आणि अखेर त्याच्या नातेवाईकांनी त्याची आशाच सोडून दिली.

प्रथम तो गावोगावी उघड्यावर संगीतिकेचे प्रयोग करणाऱ्या एका जात्रावाल्यांच्या दलात सामील झाला. दलाचा प्रमुख त्याच्यावर पुत्रवत प्रेम करू लागला. टोळीतल्या लहानमोठ्या सगळ्यांना तो फार प्रिय झाला. ज्या घरी जात्रेचा प्रयोग होई, त्या घरचे यजमान आणि विशेषतः बायकामंडळी त्याला परत परत बोलावून त्याचं कौतुक करायला लागली, तेव्हा एके दिवशी तो कोणाला न सांगता कुठे तरी निघून गेला.

तारापद एखाद्या हरिणशावकासारखा होता. त्याला कुठलंही बंधन रुचत नसे. तसंच तो हरिणासारखा संगीतवेडाही होता. जात्रेतल्या गाण्यामुळेच तो घरापासून दूर खेचला गेला होता. संगीताच्या सुराबरोबर त्याच्या देहातली नस न् नस थरारू लागे आणि त्याचं सर्वांग त्या तालावर डोलू लागे. अगदी लहान असल्यापासून तो ज्या तऱ्हेनं मैफलीत बसून संगीत ऐकत असे व संगीताच्या तालावर डोलत असे, ते पाहून मोठ्या मंडळींना हसू आवरेनासे होई. केवळ संगीतच नव्हे, तर दाट वृक्षांवर जेव्हा श्रावणसरी वर्षाव करीत, आकाशात मेघांचा गडगडाट होई, सोसाट्याच्या वाऱ्याचे विचित्र आवाज होत, तेव्हा तो अतिशय बेचैन होई. घारीचा आवाज, बेडकांचं ओरडणं, कोल्ह्याची कोल्हेकुई हे सारं ऐकून त्याचं चित्त व्याकूळ होत असे.

संगीताच्या आकर्षणापायीच तो त्यानंतर गायकांच्या एका दलात सामील झाला. दलाच्या म्होरक्यानं त्याला प्रयत्नपूर्वक गाणं शिकवलं. त्यानंही अनेक गीतं पाठ केली. तो म्होरक्या त्याच्यावर आपल्या हृदयपिंजऱ्यातल्या पाखराप्रमाणे प्रेम करू लागला, परंतु एक दिवस हे पाखरू पिंजऱ्यातून उडून गेलं.

शेवटी तो एका कसरतवाल्यांच्या टोळक्यात गेला. ज्येष्ठापासून आषाढापर्यंत वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या जत्रा भरत. यासाठी गायक,

कवी, नर्तक असे अनेक प्रकारचे लोक होडीत बसून छोट्या नद्यांतून, या जत्रेतून त्या जत्रेत ये-जा करत. गेल्या वर्षापासून कलकत्त्याच्या कसरतकारांचा एक जथा या फिरत्या मंडळींत सामील झाला होता. तारापद त्यात सामील होऊन सुरुवातीला पानपट्ट्या विकण्याचं काम करू लागला. तारापद स्वभावतःच फार जिज्ञासू होता. कसरतवाल्यांच्या विविध व्यायामकौशल्याचं कुतूहल वाटूनच तो त्यांच्यात सामील झाला होता. तिथे तो आपला आपणच बासरी वाजवायला शिकला, आणि कसरतीचे खेळ चालू असताना बासरी वाजवू लागला. तेवढंच एक काम त्याला मिळालं होतं.

त्यानंतर या कसरतवाल्यांच्या जथ्यातूनही तो पळून गेला. नंदीग्रामचे जमीनदारबाबू एक नाटकमंडळी सुरू करत असल्याचं त्यानं ऐकलं होतं. त्याला त्यात सामील व्हायचं होतं, म्हणून तो आपलं छोटंसं बोचकं घेऊन तिकडेच निघाला होता. त्याच वेळी त्याची आणि मतिलालबाबूंची गाठ पडली.

तारापद अनेक जथ्यांत सामील झाला, पण कोणत्याच जथ्यात तो स्वतःला विसरून गुंतून पडू शकला नाही. तो सर्वत्रच मनानं अलिप्त आणि वृत्तीनं मुक्त होता. त्यानं अनेक वाईट गोष्टी ऐकल्या, पाहिल्या. पण त्यातली एकही गोष्ट त्याच्या मनाला चिकटून राहिली नाही. त्याचं मन कोणत्याच गोष्टीत अडकणारं नव्हतं.

त्याच्या चेहऱ्यावर एक स्वाभाविक उत्फुल्लता दिसे, जी पाहूनच मतिलालबाबूंनी त्याला कोणताही प्रश्न न विचारता, कोणतीही शंका न घेता आपल्याजवळ ठेवून घेतलं होतं.

तारापदनं जेवणं उरकल्यावर बांधून ठेवलेली होडी सोडली. अन्नपूर्णा तारापदला त्याचं घर, नातेवाईक यांच्यासंबंधी माहिती विचारू लागली. तारापद काहीतरी तुटक उत्तरं देऊन वेळ मारून नेऊ लागला.

वर्षाऋतुतील नदी अगदी तुडुंब भरली होती. निसर्गदेवतेला आपल्या बेफाम अवखळपणामुळे जणू ती उद्विग्न करून सोडत होती. मेघ विरळ झाले होते. गवतावर, उसाच्या शेतांवर उन्हाचे किरण चमकत होते. सारं चराचर सजीव, चैतन्यपूर्ण आणि प्रकाशानं उजळलेलं वाटत होतं.

तारापद आता नौकेच्या छतावर जाऊन बसला होता. त्यामुळे हिरवी कुरणं, नुकतीच अंकुरलेली शेतं, वाऱ्यावर झुळझुळणारी धान्याची शेतं, गावाकडे जाणाऱ्या पायवाटा, गर्द झाडीत लपलेलं गाव हे सारं त्याला सहजपणे दिसू लागलं होतं. त्या साऱ्याबद्दल त्याच्या मनात जिव्हाळा होता. नदीकाठी एक वासरू शेपूट उभारून पळत होतं, दोरीनं बांधलेले पाय झाडत घोड्याचं शिंगरू गवत खात हिंडत होतं, कुणी नदीच्या पाण्यात मासे धरत होते, तर गावातली पोरं पाण्यात डुंबत मस्ती करत होती. गावातल्या बायका पाण्यात डुंबत, आपल्या साडीचा पदर पाण्यावर पसरत स्नान करत होत्या, कोळणी मच्छीमारांकडून मासे विकत घेऊन टोपलीत ठेवत होत्या. तारापद हे सारं नवीनच पाहत असल्याप्रमाणे उत्सुकतेनं बघत होता; पण कितीही पाहिलं तरी त्याचं समाधान होत नव्हतं.

तारापदनं नौकेच्या नावाड्यांबरोबर बातचीत सुरू केली. मधूनच तो त्यांच्या हातातलं वल्हं घेऊन स्वतः होडी वल्हवे. नावाड्यांना तंबाखू ओढायची लहर आली की, तो स्वतःच्या हातात होडीचं सुकाणू घेई आणि वाऱ्याचा झोत बघून मोठ्या दक्षतेनं ते फिरवत असे.

संध्याकाळच्या स्वयंपाकाच्या वेळी अन्नपूर्णानं तारापदला हाका मारून विचारलं, ''रात्री तू काय खाशील?''

''जे असेल ते खाईन,'' तारापद म्हणाला, ''नेहमी काही खातोच असं नाही.''

पाहुणचार स्वीकारण्याविषयीची त्या सुंदर मुलाची उदासीन वृत्ती पाहून अन्नपूर्णाच्या हृदयात कालवाकालव झाली. घर सोडून आलेल्या त्या मुलाला भरपूर खायलाप्यायला देऊन तृप्त करण्याची तिची फार इच्छा होती, परंतु त्याला संतुष्ट कसं करावं हेच तिला कळेना. अन्नपूर्णानं गडबडीनं नोकरांना गावात पाठवून दूध, मिठाई आणवली. तारापदनं थोडंसं खाल्लं, पण त्यानं दुधाला हात लावला नाही. अबोल स्वभावाच्या मतिलालबाबूंनीही तारापदला दूध पिण्याचा आग्रह केला, तेव्हा तो फक्त एवढंच म्हणाला, ''मला आवडत नाही दूध.''

नदीवर दोन-तीन दिवस असेच गेले. तारापद स्वयंपाक करणं, बाजारहाट करणं ते नौका चालवणं ही सर्व कामं स्वतःहून आणि अतिशय तत्परतेनं करत असे. प्रत्येक दृश्याकडे तो अतिशय उत्सुकतेनं पाहत असे. तसंच हाताशी येईल ते काम पटकन उरकून टाकीत असे. त्याची दृष्टी सतत काहीतरी पाहत असे व हात सतत काही करत असत. त्यामुळे एकाच वेळी तो निश्चिंत, अलिप्त आणि कोणत्यातरी कामात गढलेला असे. जणू काही तारापद या विश्वप्रवाहात उसळलेला एक आनंदतरंग होता. भूत-भविष्याशी संबंध नसलेला, एका दिशेनं वाहत राहणारा.

अनेक लोकांत वावरल्यामुळे लोकांची करमणूक करण्याची विद्या त्याला अवगत झाली होती. कोणत्याही काळजीचं दडपण नसल्यामुळे त्याच्या मनावर प्रत्येक गोष्टीचा ठसा चटकन उमटत असे. अनेक प्रकारची गाणी, भजनं, जात्रेतली नाटकं सारं त्याला पाठ होतं.

मतिलालबाबू एके दिवशी नेहमीप्रमाणे आपल्या पत्नीला व मुलीला रामायण वाचून दाखवत होते. कुश-लवांचा संदर्भ आलेला पाहून तारापदला राहवलं नाही. मोठ्या उत्साहानं तो नौकेच्या छतावरून उतरून खाली आला आणि म्हणाला, ''पोथी राहू दे. मी तुम्हांला कुश-लवाचं गाणं म्हणून दाखवतो, ते आपण ऐका.''

तारापदनं गाणं सुरू केलं. त्याचा आवाज बासरीसारखा गोड होता. नावाडी येऊन दारापाशी डोकावू लागले. संध्याकाळच्या वेळी हास्य आणि करुण रसाचा संमिश्र स्रोत त्या नदीतीरावर वाहू लागला. नदीच्या दोन्ही तीरावरची माणसं उत्सुकतेनं पाहू लागली. बाजूनं जाणाऱ्या नौकेतील माणसंही उत्कंठेनं ऐकू लागली. गाणं संपलं तेव्हा सर्वांचं अंतःकरण जड झालं होतं.

अन्नपूर्णाचे डोळे भरून आले. त्या मुलाला छातीशी कवटाळावं असं तिला तीव्रतेनं वाटलं. मतिलालबाबूंच्या मनात आलं, हा मुलगा आपल्यापाशीच राहिला तर पोटच्या मुलाचा अभाव भरून निघेल.

मात्र छोट्या चारुशशीच्या मनात रागाच्या आणि मत्सराच्या भावनेनं फणा काढला. चारुशशी आपल्या आईवडिलांची एकुलती एक मुलगी; त्यामुळे आईवडिलांच्या प्रेमाची संपूर्ण अधिकारी. तिच्या लहरी आणि जिद्दी स्वभावाला सीमाच नव्हती. खाणं, कपडे घालणं, वेणीफणी साऱ्यात ती आपलाच हेका चालवी. कुठे कधी समारंभाचं निमंत्रण आलं की, तिची आई घाबरून जाई; कारण तयार होताना मुलगी काय हट्ट करील याचा नेम नसे. घातलेली वेणी तिला आवडली नाही तर ती वेणी परत बांधायला लावी. पण तेही तिला पटत नसे. मग तिची आदळआपट, आरडाओरडा सुरू होई. मात्र जेव्हा ती खुशीत असे तेव्हा सारं गाडं छान चाले. मग ती कसलाही हट्ट करत नसे. उलट लाडात येऊन आईचे पापे घेई. बोलून बोलून आईला भंडावून सोडी. सगळ्यांना चारुशशी म्हणजे एक कोडंच वाटत होतं.

ही हट्टी मुलगी मनातल्या मनात तारापदचा द्वेष करू लागली. आईवडिलांनाही त्रास देऊ लागली. जेवणाच्या वेळी तोंड रडकं करून ताट भिरकावून देऊ लागली. कोणाचाच स्वयंपाक तिला आवडेनासा झाला. ती दाईला मारी आणि प्रत्येक बाबतीत काही ना काही खोड काढत राही. तारापद जसजशी इतरांची अधिकाधिक करमणूक करू लागला, तसतसा तिचा राग जास्तच भडकू लागला. तारापदच्या अंगात अनेक गुण आहेत हे तिला कबूल करायचं नव्हतं. परंतु जसजसं त्याच्या गुणांचं प्रत्यंतर येऊ लागलं, तसतशी ती जास्तच असंतुष्ट होऊ लागली.

तारापदनं ज्या दिवशी कुश-लवांचं आख्यान म्हटलं, त्या दिवशी अन्नपूर्णाच्या मनात आलं, संगीतानं वनातील पशू वश होतात; मग माझ्या मुलीचं मन का पाझरत नाही? तिनं चारुशशीला विचारलं, ''कसं वाटलं तुला गाणं? आवडलं?'' चारुशशीनं काहीच उत्तर न देता आपली मान नकारार्थी हलवली – म्हणजे आपल्याला गाणं आवडलं नाही आणि कधी आवडणारही नाही!

चारूच्या मनात तारापदबद्दल मत्सर निर्माण झाला आहे, हे लक्षात आल्यामुळे चारूच्या आईनं तिच्यापुढे तारापदचं कौतुक करणं सोडून दिलं.

संध्याकाळी लवकर जेवून चारुशशी झोपून जाई. अशा वेळी अन्नपूर्णा नौकेतल्या खोलीच्या दारात येऊन बसे. मतिलालबाबू आणि तारापद बाहेरच्या बाजूला बसलेले असत. मग अन्नपूर्णा सांगेल ते गाणं तारापद गाऊ लागे. नदीच्या दोन्ही काठांवर विश्रांती घेत असलेले गावकरी दाटत चाललेल्या अंधारात गाणं ऐकून मुग्ध होऊन जात. अन्नपूर्णाचं कोमल हृदय प्रेमभावनेनं, कौतुकानं भारावून जाई. अशा वेळी अचानक चारुशशी बिछान्यातून उठून पाय आपटत येई आणि रागावून

म्हणे, "काय गोंधळ चाललाय हा आई! मला मुळीच झोप लागत नाही." आईवडील आपल्याला एकटीला झोपायला पाठवून तारापदचं गाणं ऐकत बसतात, हे तिला असह्य होई.

मात्र चारू होती मोठी गोड! मोठमोठ्या काळ्याभोर डोळ्यांच्या या मुलीच्या स्वभावातली ही गंमत पाहून तारापद मोहून जात असे. तो तिला गोष्टी सांगून, गाणं गाऊन, बासरी वाजवून आपलंसं करण्याचा खूप प्रयत्न करी. पण त्याला कशातही यश येत नसे. फक्त जेव्हा तो अंघोळीसाठी नदीत उतरे आणि पाण्यात उलट्यासुलट्या सुळकांड्या मारू लागे, तेव्हा हलणाऱ्या पाण्यात त्याचा गोरा गोरा देह बघताना तिला तो एखाद्या जलदेवतेप्रमाणे वाटे. तिची नजर त्याच्यावर खिळून राही. ती रोज त्या क्षणाची वाट पाहत असे, पण आपल्या मनातील गोष्ट कोणाला कळू नये म्हणून, वर वर गळपट्टा विणण्याचं नाटक करत, तारापदच्या पाण्यातील क्रीडा ती चोरून बघत राही.

नंदीग्राम केव्हा गेलं त्याचा तारापदला पत्ताच लागला नाही. कधी शीड उभारून तर कधी वल्हं मारून काठावर झुकणाऱ्या झाडांच्या फांद्यांतून होडी हळूहळू चालली होती. होडीतले प्रवासीही आजूबाजूची वनश्री आणि सौंदर्य न्याहाळत आनंदानं जात होते. कोणालाच लवकर जायची घाई नव्हती. स्नानाला आणि दुपारच्या जेवणाला नेहमीच उशीर होत होता. संध्याकाळ होताच कुठल्यातरी गावाचा घाट बघून होडी बांधली जाई. तिथे काजव्यांच्या दिपत्कारात, रातकिड्यांच्या किरकिरीत प्रवासी विश्रांती घेत.

प्रवास करत करत ते काठालियाला पोचले. गावचे जमीनदारबाबू आले हे कळताच मेणा, सजवलेले घोडे, बांबूच्या काठ्या हातात घेतलेले शिपाई, बंदुकीचे बार काढणारे बरकंदाज असा सगळा इतमाम हजर झाला. बंदुकीच्या आवाजाने कावळे काव काव करू लागले आणि सारा गाव गजबजून गेला.

हा सारा समारंभ चालू असताना तारापद पटकन नावेतून उतरून सारा गाव फिरून आला. तेवढ्या वेळात कुणाला दादा, कुणाला काका, कुणाला मावशी, कुणाला दीदी म्हणून त्यानं सगळ्यांशी प्रेमाचं नातं जोडलं. त्याला कसलंच बंधन नसल्यामुळे त्यानं पटकन ओळखी करून घेऊन सगळ्यांची मनं जिंकली.

सगळ्यांशी तारापदचा इतक्या झटपट परिचय होण्याचं कारण असं, की तारापद माणूस पाहून वागत असे. तो कोणत्याच संस्कारांच्या पगड्याखाली नव्हता आणि कुठल्याही कामात तो तरबेज होता. तो मुलांबरोबर किंवा वृद्धांबरोबरही त्यांच्यासारखाच वागे. मात्र दोन्ही ठिकाणी आपलं वय आणि स्वातंत्र्य तो विसरत नसे. तो सर्वांना मदत करायला सरसावे. मिठाईवाल्यानं जर त्याला, 'जरा दुकानाकडे पाहा, मी घरी जाऊन येतो–' असं सांगितलं तर जरासुद्धा नाराजी न दर्शविता ताडाचा पंखा हलवत तो मिठाईवरच्या माशा हाकलत राही. त्याला माग चालवता येई. सूत काढण्याची विद्याही

त्याला थोडीशी अवगत होती, तसंच कुंभाराचं चाकही फिरवता येत असे.

तारापदनं थोड्याच अवधीत सगळा गाव आपलासा केला, परंतु एका छोट्या मुलीचं मन मात्र तो जिंकू शकला नाही. तारापद या गावातून दूर निघून जावा, असं तिला वाटत असल्यामुळेच की काय तारापद तिथं गुंतून राहिला होता.

अन्नपूर्णाच्या स्वयंपाकीणबाईंची मुलगी सोनामणी वयाच्या पाचव्या वर्षीच विधवा झाली होती. ती चारुशशीएवढीच होती आणि चारुशशीची मैत्रीणही होती. आजारी असल्यामुळे प्रवासाहून आलेल्या आपल्या मैत्रिणीला– चारुशशीला भेटायला ती आली नव्हती. पण ज्या दिवशी भेटायला आली, त्या दिवशी काहीही कारण नसताना दोघींचं भांडण झालं.

चारुशशीनं सोनामणीला प्रवासाची सविस्तर हकिगत सांगण्यास सुरुवात केली. तारापदबद्दलचे सर्व तपशील सविस्तर सांगून सोनामणीची उत्सुकता शिगेला पोहोचविण्याचा तिचा बेत होता; पण तारापद आणि सोनामणी यांची ओळख अगोदरच झालेली आहे आणि तो सोनामणीच्या आईला मावशी म्हणतो, सोनामणी त्याला दादा म्हणते, हे ऐकून तिला आश्चर्याचा धक्काच बसला. तारापद त्या मायलेकींना बासरी वाजवून दाखवतो, एवढंच नाही तर त्यानं सोनामणीला एक वेळूची बासरी बनवून दिली आहे, तो तिला उंच झाडावरून फळं काढून देतो, काटे टाळून गुलाब काढून देतो हे जेव्हा तिला समजलं, तेव्हा तर तिच्या अंगाचा भडका उडाला! तिला वाटत होतं की, तारापदवर केवळ आपलाच हक्क आहे. इतर लोकांनी त्याच्या रूपागुणांची स्तुती करावी, पण ती दुरूनच. असा मुलगा मिळविल्याबद्दल आपल्याला फक्त धन्यवाद द्यावेत! पण तिची ही केवळ कल्पनाच राहिली. 'सोनामणीशी तारापदची केवढी मैत्री झाली!' चारुशशीच्या मनात येई, 'आमची आणि तारापदची भेट झाली नसती, आम्ही त्याला आमच्याकडे ठेवून घेतलं नसतं तर सोनामणीला त्याचं कधी दर्शन तरी झालं असतं का? म्हणे सोनामणीचा दादा!'


ज्या तारापदचा चारुशशी मत्सर करत होती, त्याच्यावर आपल्या एकटीचा अधिकार प्रस्थापित करावा, असं तिला का बरं वाटावं?

त्या दिवशी एका क्षुल्लक कारणावरून चारुशशी आणि सोनामणीचं भांडण झालं. चारुशशी तरातरा तारापदच्या खोलीत गेली आणि त्याची आवडती बासरी पेटीतून बाहेर काढून ती तिनं लाथेनं तुडवून मोडून टाकली. नेमका त्याच वेळी तारापद खोलीत आला. चारुशशीचा अवतार पाहून तो आश्चर्यचकित झाला. त्यानं विचारलं, ''चारू, तू माझी बासरी का मोडलीस?'' त्यावर रागारागानं त्याच्याकडे पाहत ती म्हणाली, ''छानच केलं मी!'' मोडलेल्या बासरीवर लाथा मारत, ''ही बघ, आणखी फोडली–'' असं म्हणून रडत ती खोलीबाहेर पडली. तारापदनं बासरी उचलून उलटीसुलटी करून पाहिली. आपल्या जुन्या निरपराध बासरीची निष्कारण झालेली ही अवस्था पाहून त्याला वाईट वाटलं.

आता तर चारुशशी त्याच्या कुतूहलाचाच विषय होऊन बसली.

त्याच्या कुतूहलाचा आणखी एक विषय म्हणजे, मतिलालबाबूंच्या ग्रंथसंग्रहालयातील चित्रांचं इंग्रजी पुस्तक. बाकीच्या जगाशी त्याचा चांगला परिचय झाला होता, पण काही केल्या या चित्रांच्या जगात तो प्रवेश करू शकत नव्हता. तो कल्पनेनं खूप अंदाज बांधत होता, पण त्याचं समाधान होत नव्हतं.

चित्रांच्या पुस्तकाबद्दलचं त्याचं कुतूहल पाहून एक दिवस मतिलालबाबू त्याला म्हणाले, ''इंग्रजी शिकायचंय का तुला? इंग्रजी शिकलास तर या चित्रांचा अर्थ समजेल.'' ते ऐकून तारापद ताबडतोब म्हणाला, ''हो, शिकायचंय.''



मतिलालबाबू खूश झाले. त्यांनी एन्ट्रन्स स्कूलचे मुख्याध्यापक रामरतनबाबू यांची रोज संध्याकाळी येऊन तारापदला इंग्रजी शिकविण्यासाठी योजना केली.

तारापदची स्मरणशक्ती अत्यंत तल्लख होती. तो मन लावून इंग्रजी शिकण्याचा प्रयत्न करू लागला. जणू काही तो एका नव्या दुर्गम राज्यात प्रवेश करत होता. जुन्या जगाचा संबंध त्यानं तोडून टाकला होता. आता तो पूर्वीसारखा आजूबाजूच्या लोकांच्या नजरेस पडत नव्हता. अंधार पडण्यापूर्वी तो निर्जन नदीकाठावर येरझारा घालत आपले धडे पाठ करत राही. त्यावेळी त्याची आवडती बाळगोपाळ मंडळी मोठ्या आदरानं त्याच्याकडे पाहत असत. मात्र त्याच्या अभ्यासात व्यत्यय आणण्याचं धाडस कोणीही करत नसे.

चारूलाही हल्ली तो फारसा भेटत नसे. पूर्वी तो आतल्या घरात जाऊन अन्नपूर्णाच्या वात्सल्यपूर्ण देखरेखीखाली जेवत असे, पण आता जेवायला यायला अधूनमधूनं उशीर व्हायला लागल्यापासून मतिलालबाबूंच्या संमतीनं त्यानं आपल्या जेवणाची व्यवस्था बाहेरच करून घेतली होती. त्यामुळे अन्नपूर्णा नाराज झाली होती, परंतु अभ्यासातील तारापदचा उत्साह बघून मतिलालबाबूंनी ही व्यवस्था आनंदानं मान्य केली होती.

याचवेळी 'मीही इंग्रजी शिकणार' असा चारूनं हट्ट धरला. प्रथम चारुशशीच्या आईवडिलांनी तिची ही लहर हसण्यावारी नेली. पण शेवटी त्यांचा निरुपाय झाला, तेव्हा त्यांनी तिच्या म्हणण्याला संमती दिली. तारापदबरोबर तिच्याही इंग्रजी शिक्षणाला सुरुवात झाली.

अर्थात, अभ्यास करणं चारुशशीच्या स्वभावातच नव्हतं. ती स्वतः तर काही शिकत नव्हतीच, पण तारापदच्या शिक्षणात व्यत्यय मात्र आणत होती. ती मागचा अभ्यास करायला तयार नव्हती, पाठांतर करत नव्हती; असं असूनही तारापदच्या मागे राहणं तिला मान्य नव्हतं. तिला सोडून तारापद नवा धडा शिकू लागला की ती रागावून कधी कधी भोकाड पसरून रडायलाही कमी करत नसे. तारापदनं जुनं पुस्तक पूर्ण करून नवीन पुस्तक आणलं, की तिलाही नवीन पुस्तक आणून द्यावं लागे. रिकाम्या वेळी तारापद आपल्या खोलीत बसून लेखन-वाचन करू लागला, तर तेही तिला सहन होत नसे. ती गुपचूप त्याच्या वहीवर शाई सांडून ठेवी, त्याची लेखणी लपवून ठेवी किंवा पुस्तकातली तो वाचत असलेल्या धड्याची पानं फाडून ठेवी. तारापद तिच्या सगळ्या खोड्या कौतुकानं सहन करी; पण त्यानं तिच्यावर कधी हात उगारला नाही.

सुदैवानं त्याला एक उपाय सापडला. एक दिवस शाईनं माखलेल्या आपल्या वह्या फाडून टाकून तारापद उदासपणे बसून राहिला. चारू दारापर्यंत आली. त्याच्याकडे पाहून तिला वाटलं, आज आपल्याला मार बसणार; परंतु तिचा अंदाज खोटा ठरला. तारापद काहीही न बोलता गप्प बसून राहिला. चारू सारखी खोलीच्या आतबाहेर करत राहिली. अधूनमधून ती तारापदच्या इतकी जवळ

येत होती की, मनात आणलं असतं तर तारापदला तिच्या पाठीत धपाटा घालता आला असता. पण तसं काहीच न करता तो नुसताच गंभीर मुद्रा धारण करून बसला. चारू पेचात पडली. आजपर्यंत तिनं कोणाची क्षमा मागितली नव्हती. नव्हे, ती विद्याच तिला अवगत नव्हती. तिला पश्चात्ताप झाला. तारापदनं आपल्याला क्षमा करावी, यासाठी तिचं मन व्याकूळ झालं. शेवटी काही उपाय सुचेना, तेव्हा फाटलेल्या वहीच्या कागदाचा एक तुकडा घेऊन तारापदजवळ बसून त्यावर तिनं मोठमोठ्या अक्षरात लिहिलं, 'यापुढं मी पुस्तकांवर शाई ओतणार नाही.' तो कागद तारापदनं पाहावा म्हणून ती नाना प्रयत्न करू लागली, तेव्हा तारापदला हसू लोटलं. हे पाहून मात्र चारू लाजून, रागावून पळत खोलीतून निघून गेली. ज्या कागदाच्या तुकड्यावर तिनं माघार घेतल्याचं लिहिलं होतं, तो तुकडा जगातून नाहीसा झाला असता, तरच तिचा राग थंड झाला असता.

इकडे सोनामणी त्यांच्या अभ्यासाच्या खोलीत डोकावून शंकित मनानं निघून जाई. इतर सर्व बाबतींत ती चारुशशीशी मोकळेपणाने बोलत असे, पण तारापदच्या बाबतीत काही बोलायला मात्र तिला संकोच वाटे आणि भीतीही वाटे. चारुशशी आत गेलेली पाहिली की सोनामणी तारापदच्या खोलीच्या दारात उभी राही. तारापद पुस्तकातली दृष्टी काढून घेऊन सोनामणीची चौकशी करी, ''सोनामणी, कशी आहेस? मावशी कशी आहे?''

सोनामणी म्हणे, ''खूप दिवस आला नाहीस आमच्याकडे! आईनं तुला बोलावलंय. तिची कंबर दुखतेय, त्यामुळे ती येऊ शकली नाही.''

अशा वेळी अचानक चारुशशी येऊन हजर होई. मग सोनामणी अस्वस्थ होई. जणू काही ती आपल्या मैत्रिणीची एखादी मूल्यवान वस्तूच चोरायला आलेली असे. चारू आवाज चढवत, डोळे फिरवत म्हणे, ''सोनामणी, तू अभ्यासाच्या वेळी येऊन दंगा करतेस!... मी आत्ताच बाबांना जाऊन सांगते.'' जणू काही ती तारापदची पालक होती आणि त्याच्या अभ्यासात व्यत्यय येऊ नये म्हणून डोळ्यांत तेल घालून जपत होती! पण ती स्वतः कोणत्या उद्देशानं तारापदच्या खोलीत आलेली असे, ते एक तिला माहीत आणि तारापदलाही! तिच्या त्या अवताराला घाबरून सोनामणी काही बहाणा करू लागली की, चारू तिला खोटारडी म्हणे. मग सोनामणी शरमून, माघार घेऊन तिथून निघून जाई. तिला हाक मारून तारापद म्हणे, ''आज संध्याकाळी मी तुझ्या घरी येतो बरं सोनामणी!'' ते ऐकून नागिणीसारखा फुत्कार टाकत चारू म्हणे, ''जाशील की! तुला अभ्यास करायचा नाही ना? मी आता मास्टरबाबूंनाच सांगेन.''

चारूच्या या धाकाला न भिता तारापद एक-दोन दिवसांनी मावशीच्या घरी जाई. एक-दोन वेळा असे झाल्यानंतर, तारापदला नुसतीच बोलण्यातून भीती न दाखवता एक दिवस चारूनं तारापदच्या खोलीला बाहेरून कडी घातली आणि आईच्या मसाल्याच्या पेटीचं कुलूप आणून ते त्याच्या खोलीला लावून टाकलं. सबंध दिवस तारापदला

खोलीत बंद करून ठेवून तिनं जेवायच्या वेळेला खोलीचं दार उघडलं. तारापद चिडला. तो न बोलता न खाता निघाला, तेव्हा चारू हात जोडून त्याच्या विनवण्या करू लागली, ''मी तुझ्या पाया पडते, आता मी असं करणार नाही...'' इतकं करूनही तारापदचा राग गेला नाही, तेव्हा ती रडू लागली. ते पाहून तारापद पेचात पडला. बिचारा मुकाट्यानं जेवायला बसला.

चारू कितीतरी वेळा मनातल्या मनात तारापदशी चांगलं वागायचं ठरवत असे, पण सोनामणीसारख्या कोणी मध्ये आल्या की तिचा सारा नूर बदलून जाई. तिचा तिच्या मनावर ताबा राहत नसे. तारापदलाही माहीत असे की, ती वरवर चांगली वागली तरी तिची लहर केव्हा बिघडेल याचा नेम नाही! त्यामुळे तो खूप सावधपणे वागे. ती कुठून भांडायला सुरुवात करील याचा अंदाज करणं कठीण होतं. भांडणानंतर प्रचंड वादळ, मग जोरदार अश्रुपात आणि मग सारं शांत असा तिच्या वागण्याचा क्रम होता.

अशा प्रकारे दोन वर्षं उलटली. एवढ्या काळात तारापद कधीही कोणाच्याही फारसा जवळ गेला नाही. त्याला अभ्यासाचं मनापासून वेड लागलं होतं. त्याचं इतर गोष्टींकडे मुळीच लक्ष नसे. वयाबरोबर त्याच्या स्वभावातही बदल होत चालला होता. कुठंतरी स्थिर व्हावं आणि जीवनातील सुखदुःख अनुभवावं, असंही त्याला वाटू लागलं होतं. आपल्याबरोबर अभ्यास करणाऱ्या आणि वेळोवेळी भंडावून सोडणाऱ्या या मुलीमध्ये आपण विचित्रपणे गुंतत चाललो आहोत, याचीही त्याला जाणीव झाली होती.

चारू आता अकरा वर्षांची झाली होती. मतिलालबाबू तिच्या लग्नाचा विचार करू लागले होते. त्यांनी तिच्यासाठी दोन-तीन चांगली स्थळंही पाहून ठेवली होती. तिचं लग्नाचं वय झालं हे लक्षात घेऊन त्यांनी तिची इंग्रजीची शिकवणी आणि बाहेर येणंजाणंही बंद केलं होतं. अशा तऱ्हेनं घरात अडकून पडल्यामुळे चारू आणखीनच दांडगाई करू लागली होती.

एक दिवस अन्नपूर्णा मतिबाबूंना म्हणाली, ''वरासाठी तुम्ही एवढी शोधाशोध कशाला चालवली आहे? तारापद चांगला मुलगा आहे आणि मुख्य म्हणजे तुमच्या मुलीलाही तो पसंत आहे.''

हे ऐकून मतिबाबूंना खूप आश्चर्य वाटलं. ते म्हणाले, ''असं कधी झालंय! तारापदच्या कुळशीलाचा काही पत्ता नाही. आपली एकुलती एक मुलगी, तिला चांगल्या घरचा वर मिळायला हवा.''

एके दिवशी रायडांग्याच्या बाबूंच्या घरून काहीजण मुलगी पाहायला आले. चांगला पोशाख करून चारूला बाहेर आणण्याचा प्रयत्न केला गेला, पण ती खोलीत दार बंद करून जी बसली, ती काही केल्या बाहेर येईना. मतिबाबूंनी खोलीच्या दाराजवळ जाऊन आधी तिला खूप समजावलं, नंतर दम दिला; पण कशाचाच उपयोग झाला नाही. शेवटी आलेल्या माणसांना– मुलगी अचानक

आजारी झाली आहे, आज मुलगी दाखविण्याचा समारंभ करता येणार नाही, असं खोटंच सांगितलं. त्या माणसांना, मुलीत काही दोष असेल म्हणून हे सारं नाटक केलं असेल, असं वाटलं आणि ती निघून गेली.

विचार करता करता मतिलालबाबूंना वाटलं, तारापद सर्व दृष्टींनीच चांगला मुलगा आहे. त्याला आपण आपल्या घरी ठेवून घेतलं म्हणजे मग आपल्या एकुलत्या एका मुलीलाही लग्न करून आपल्यापासून दूर पाठवायला नको. या अवखळ, हट्टी मुलीला आपण सांभाळून घेत असलो, तरी तिची सासरची माणसं तिची दांडगाई सहन करणार नाहीत, याची त्यांना कल्पना होती.

अन्नपूर्णा आणि मतिलालबाबू दोघांनी विचारविनिमय करून तारापदच्या कुळशीलाची चौकशी करण्यासाठी त्याच्या गावी माणसं पाठवली. चौकशीअंती समजलं की, तारापदचं कुळशील चांगलं आहे, पण घरची फार गरिबी आहे. मतिलालबाबूंनी तारापदची आई व भाऊ यांना तारापदच्या लग्नाबद्दल विचारलं. त्यांनी आनंदानं लग्नाला संमती दिली.

मतिलालबाबू आणि अन्नपूर्णा लग्नाच्या तारखेकडे लक्ष देऊन बसले होते. पण स्वभावतःच अबोल असलेल्या मतिबाबूंनी लग्नाबद्दल गुप्तताच राखली होती.

चारूला आवरणं अजूनही कठीणच जात होतं. ती अधूनमधून तारापदच्या अभ्यासाच्या खोलीत जाऊन एखाद्या बंडखोरासारखा धिंगाणा घालत असे. कधी राग, कधी लोभ, कधी अलिप्तता– असं अनेक प्रकारे वर्तन करून ती त्याच्या अभ्यासाला आवश्यक असलेली शांतता ढवळून टाकत असे. तिचं हे वागणं बघून स्वतंत्र वृत्तीच्या, अलिप्त मनाच्या तारापदच्या मनात विजेच्या चमकाऱ्यासारखी अचानक चंचलता निर्माण होई. ज्यानं कशाचंच बंधन मानलं नव्हतं, तो आजकाल दिवास्वप्नं पाहू लागला होता. नुसता सुन्न बसून राहू लागला होता. कधीकधी अभ्यास करायचा सोडून, मतिलालबाबूंच्या ग्रंथालयात जाऊन तो चित्रांचं पुस्तक बघत बसे. चित्रं बघताना मनात येणारे विचार पूर्वीपेक्षा वेगळे आणि जास्त रंगतदार होते. चारूनं धिंगाणा केला तर आता त्याला राग येत नसे; तिला मार देण्याचे विचारही मनात येत नसत. आपल्यातला हा बदल, ही ओढ त्याला एका वेगळ्याच स्वप्नसृष्टीसारखी वाटू लागली.

श्रावण महिन्यात विवाहाचा दिवस निश्चित करून, मतिलालबाबूंनी तारापदच्या नकळत, त्याच्या आईला व भावंडांना आणण्यासाठी माणसं पाठवली; तसंच कलकत्त्यातील आपल्या मुनीमाकडे लग्नाच्या सामानाची यादी पाठवून दिली.

आकाशात नवीन वर्षाऋतूचे ढग यायला लागले होते. गावची नदी कोरडी पडली होती. अधूनमधून साचलेल्या डबक्यात छोट्या होड्या अडकून पडल्या होत्या. कोरड्या पडलेल्या नदीच्या पात्रातील चिखलात ये-जा करणाऱ्या बैलगाड्यांच्या धावा उठल्या होत्या. अशात एक दिवस माहेरी येणाऱ्या पार्वतीसारखी पावसाची सर

हसत खिदळत आली. नदीला पाणी चढलं. नागडीउघडी मुलं तीरावर येऊन आरडाओरडा करत नाचू लागली. पाण्यावर झेप घेत जणू काही पाण्याला मिठ्या मारू लागली. सबंध गावात एक जिवंतपणाची, चैतन्याची लाट आली. आजूबाजूच्या खेड्यापाड्यांतून माल घेऊन विक्रीसाठी छोट्या छोट्या होड्या येऊ लागल्या. नावाड्यांच्या गाण्याचे सूर ऐकू येऊ लागले. थांबून राहिलेले सर्व व्यवहार पूर्ववत होऊ लागले आणि विविध आवाजांचा एकच कल्लोळ उठला.

याच दिवसांत कुडुलकाट्याच्या नागबाबूंच्या प्रदेशात रथयात्रेचा मेळा भरत असे. एकदा तारापद रात्रीच्या चांदण्यात घाटावर जाऊन बसला असता मेळ्याच्या दिशेनं बऱ्याच होड्या जात असलेल्या त्याला दिसल्या. काहीत मुलांसाठी फिरते पाळणे होते, काही होड्यांत जात्रावाले, तर काही होड्यांत खाण्यापिण्याचे जिन्नस. कलकत्त्यात संगीत जलशासाठी निघालेले गायक-वादक गाण्याबजावण्याचा मोठा आवाज करत निघाले होते. लोक ढोलकी आणि करताल वाजवत आपल्या भसाड्या आवाजात गात जणू काही आभाळ फाडत होते. कुठेच उत्साहाला सीमा नव्हती.

बघता बघता पूर्वेकडून असंख्य मोठमोठ्या ढगांचा लोंढा काळं शीड उभारून आकाशाच्या मध्यभागी आला. त्यांच्या मागे चंद्र झाकला गेला. पूर्वेकडून वारा जोरात वाहू लागला. ढग एकामागून एक पळू लागले. नदीचं पाणी बेछूटपणे खिदळू लागलं. वाऱ्याने हालणाऱ्या नदीतीरावरील झाडांत अंधकार साठू लागला. बेडूक ओरडू लागले. रातकिड्यांच्या आवाजानं काळोख फाटू लागला. जणू काही सबंध विश्वाचीच रथयात्रा सुरू झाली होती. चाकं फिरत होती, ध्वज फडकत होते, पृथ्वी कापत होती, मेघ धावत होते, वारा घोंगावत होता, नदीचं पाणी उसळत होतं, नौका पळत होत्या, गाण्याचे सूर चढत होते. बघता बघता ढग गडगडू लागले. आकाश कापत विजेनं खाली झेप घेतली. दूरच्या अंधारातून मुसळधार पावसाचा गंध आला. अशा वेळी नदीकाठचं काठालिया गाव घरांचे दरवाजे बंद करून दिवे मालवून गाढ झोपी गेलं होतं.

दुसऱ्या दिवशी तारापदची आई व भाऊ गावात येऊन उतरली. कलकत्त्याहून सामानानं भरलेल्या तीन नौका काठालियाच्या जमीनदाराच्या घाटाला लागल्या. पहाटे सोनामणी कागदात आंब्याच्या वड्या आणि द्रोणात लोणचं घेऊन आली व तारापदच्या अभ्यासाच्या खोलीच्या दाराशी भीत भीत उभी राहिली. पण तारापद तिथे नव्हताच. प्रेम, बंधुभाव, स्नेह अशा बंधनांनी बांधला जाण्यापूर्वीच, सगळ्यांची मनं जिंकून घेणारा तो आसक्तिहीन, उदासीन मुलगा जणू विश्वजननीच्या पायाशी निघून गेला होता!

'उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती' व 'उत्कृष्ट कथाचित्रे'
असे दोन पुरस्कार मिळवलेले पुस्तक

# कालागढच्या अभयारण्यात

रणजित लाल यांच्या इंग्रजी पुस्तकाचा सुरेख अनुवाद



उन्हाळ्याच्या सुट्टीत गीतांजली आपल्या चुलत भावांबरोबर
कालागढच्या अभयारण्यात सहलीला जाते.
हत्तींवर मनापासून माया करणाऱ्या या गबदूल मुलीला
तिचे भाऊ 'हत्तीण' म्हणून चिडवत असतात,
आणि योगायोगानं कालागढला त्यांना भेटतात हत्तीच.
हत्तींच्या सहवासात त्यांची ही सफर
खूपच चित्तथरारक व उत्कंठावर्धक ठरते...



ज्योत्स्ना प्रकाशन

'धवलगिरी' ४३०-३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०
मोहन बिल्डिंग, १६२ ज. शंकरशेठ मार्ग, गिरगाव, मुंबई ४००००४
jyotsnaprakashan@vsnl.com